CMYK

सोलापूर **तरुण भारत**

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, १ ऑक्टोबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४० वे अंक ३३१ | पाने १२ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com

# देशी गायींना 'राज्यमाता-गोमाता' दर्जा

## राज्य मंत्रिमंडळाचा महत्त्वाचा निर्णय

**मुंबई, ३० सप्टेंबर**

देशी गायींचे भारतीय संस्कृतीत वैदिक काळापासून असलेले स्थान, देशी गायींच्या दुधाची मानवी आहारातील उपयुक्तता, आयुर्वेद चिकित्सा पद्धती, पंचगव्य उपचार पद्धती तसेच देशी गायींच्या शेण व गोमूत्राचे सेंद्रिय शेती पद्धतीत असलेले महत्त्व विचारात घेऊन राज्य सरकारने देशी गायींना 'राज्यमाता- गोमाता' म्हणून घोषित केले आहे. सोमवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेतला असून, पशुपालकांना देशी गायींचे पालनपोषण करण्यास प्रेरित करण्याचा सरकारचा उद्देश आहे.

प्राचीन काळापासून मानवाच्या दैनंदिन जीवनात गायीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. वैदिक काळापासून गायीचे धार्मिक, वैज्ञानिक व आर्थिक महत्त्व लक्षात घेऊन त्यांना 'कामधेनू' असे संबोधण्यात येते. राज्यातील वेगवेगळ्या भागात विविध प्रकारच्या देशी जातींच्या गायी आढळतात.

मराठवाडा विभागात देवणी, लालकंधारी, पश्चिम महाराष्ट्रात खिल्लार, उत्तर महाराष्ट्रात डांगी तर विदर्भात गवळाऊ जातीच्या गायी आढळतात.



### देशी गायींच्या पालनपोषणासाठी अनुदान

राज्यातील गोशाळांमधील देशी गायींच्या पालनपोषणासाठी प्रति दिन, प्रति गाय पन्नास रुपये अनुदान योजना राबवण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. गोशाळांना अत्यल्प उत्पन्न असल्याने आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने, त्यांना बळकट करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. या योजनेची अंमलबजावणी ऑनलाईन पद्धतीने महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडून करण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्यात गोशाळा पडताळणी समिती असेल. २०१९ मधील २० व्या पशुगणनेनुसार देशी गाईंची संख्या ४६ लाख १३ हजार ६३२ इतकी कमी असल्याचे आढळून आले आहे.

दिवसेंदिवस देशी गायींच्या संख्येत मोठ्या प्रमाणात घट होत आहे. देशी गायीच्या दुधाचे मानवी आहारात पौष्टिकदृष्ट्या अधिक मूल्य आहे. देशी गायीच्या दुधात मानवी शरीर पोषणासाठी महत्त्वाचे अन्नघटक उपलब्ध असल्याने ते पूर्णान्न आहे. देशी गायींच्या दुधाचे मानवी आहारातील स्थान, आयुर्वेद चिकित्सा पद्धतीत पंचगव्याचा वापर तसेच सेंद्रिय शेती पद्धतीत देशी गायींच्या शेण व गोमुत्राचे महत्त्व विचारात घेता, देशी गायींच्या संख्येत होणारी घट ही चिंताजनक बाब ठरत आहे. या पृष्ठभूमीवर पशुपालकांना देशी गायींचे पालनपोषण करण्यास प्रेरित करण्याच्या दृष्टीने देशी गायीस 'राज्यमाता- गोमाता' घोषित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. *(तभा वृत्तसेवा)*

## महत्त्वाचे

### शेअर बाजारांत मोठी घसरण



**मुंबई** : मध्यपूर्वेतील वाढता भूराजकीय धोका आणि जपानी बाजारांतील पडझड तसेच आघाडीच्या रिलायन्स इंडस्ट्रीज, आयसीआयसीआय व एचडीएफसी बँकेच्या समभागांवर निर्माण झालेल्या विक्रीच्या दबावामुळे मुंबई शेअर बाजार आणि राष्ट्रीय शेअर बाजारात सोमवारी मोठी घसरण झाली. या घसरणीला नफेखोरी आणि परतलेल्या विदेशी गुंतवणुकीच्या ओघाने हातभार लावला. मुंबई शेअर बाजराचा निर्देशांक १२७२ अंकांनी घसरून ८४,२९९ अंकांवर बंद झाला. दिवसभराच्या व्यवहारांदरम्यान ही घसरण १,३१४ अंकांपर्यंत पोहोचली होती. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ३६८ अंकांनी घसरून २५,८१० या पातळीवर बंद झाला. मुंबई शेअर बाजारातील ॲक्सिस बँक, नेस्ले, टेक महिंद्रा, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, मारुती, बजाज फिनसर्व्ह, भारतीय स्टेट बँक आणि टाटा मोटर्सला सर्वाधिक नुकसान झाले.

### पीपीएफ-एनएससीवरील व्याजदर 'जैसे थे'

**नवी दिल्ली** : १ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या सलग तिसऱ्या तिमाहीत केंद्र सरकारने सोमवारी पीपीएफ आणि एनएससीसह विविध लहान बचत योजनांवरील व्याजदर 'जैसे थे' ठेवले आहेत. १ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या आणि ३१ डिसेंबर रोजी संपणाऱ्या तिसऱ्या तिमाहीसाठी विविध लघुबचत योजनांवरील व्याजाचे अपरिवर्तित राहतील, असे केंद्रीय अर्थमंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटले आहे. सुकन्या समृद्धी योजनेंतर्गत ठेवीवर ८.२ टक्के व्याज मिळेल, तर तीन वर्षांच्या मुदत ठेवीवरील दर ७.१ टक्के राहील. पीपीएफ आणि पोस्ट ऑफिस बचत ठेव योजनांचे व्याजदर अनुक्रमे ७.१ आणि ४ टक्क्यांवर कायम राहील. किसान विकासपत्रावरील व्याजदर ७.५ टक्के आणि एनएससीचे व्याजदर ७.७ टक्के राहील.

### जम्मू-काश्मीर तिसऱ्या टप्प्याचे मतदान आज

**नवी दिल्ली** : जम्मू-काश्मीर विधानसभेच्या तिसऱ्या आणि अंतिम टप्प्यातील ४० जागांसाठी मंगळवारी मतदान होत आहे. यात जम्मू भागातील २४ तर, काश्मीर खोऱ्यातील १६ मतदारसंघांचा समावेश आहे. जम्मू-काश्मिरात विधानसभेच्या २४ जागांसाठी पहिल्या टप्प्यात १८ सप्टेंबरला, तर दुसऱ्या टप्प्यात २६ जागांसाठी २५ सप्टेंबरला मतदान झाले होते. हरयाणातील विधानसभा निवडणुकीचे मतदान ५ ऑक्टोबरला आटोपल्यानंतर हरयाणा आणि जम्मू-काश्मीरमध्ये ८ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे. तिसऱ्या टप्प्यातील निवडणुकीचा प्रचार २९ सप्टेंबरला संपला होता. ४० मतदारसंघांत ४१५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. ५,०६० मतदान केंद्रातून ३९ लाखांवर मतदार मतदानाचा अधिकार बजावणार आहेत.

### राज्यातील आणखी २६ आयटीआयचे नामकरण

**मुंबई** : राज्यातील २६ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना समाजसुधारक आणि सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांची नावे देण्याचा निर्णय सोमवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. मागील मंत्रिमंडळाच्या बैठकीत १४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे नामकरण करण्यात आले होते. या निर्णयानंतर त्यात आणखी २६ संस्थांची भर पडली असून एकूण ४० संस्थांची नावे बदलण्यात आली आहेत. यात विदर्भातील राणी दुर्गावती शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (महिला) चंद्रपूर, संत जगनाडे महाराज शासकीय अधिक प्रशिक्षण संस्था सेलू जि. वर्धा, चक्रवर्ती राजा भोज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था कारंजा (घा.) जि. वर्धा, क्रांतिकारी बाबुराव शेडमाके शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आदिवासी) गडचिरोली अशा नवीन नावांनी या संस्था ओळखल्या जाणार आहेत.

### मणिपुरात वाढवली आफ्स्पाची मुदत

**मणिपूर** : केंद्र सरकारने सोमवारी मणिपुरातील सशस्त्र दल विशेष अधिकार कायद्याची मुदत सहा महिन्यांनी वाढवली. यात इम्फाळ खोऱ्यात येणाऱ्या १९ पोलिस ठाण्यांचे क्षेत्र आणि आसामला लागून असलेला प्रदेश वगळला आहे. ही मुदत १ ऑक्टोबरपासून लागू होणार असल्याचे केंद्र सरकारच्या गृह विभागाने अधिसूचनेत म्हटले आहे.





# माझी वसुंधरा अभियानात सोलापूर महापालिकेला दोन कोटींचा पुरस्कार

## ● शहराच्या शिरपेचात रोवला मानाचा तुरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

माझी वसुंधरा ४.0 अभियानात सोलापूर महानगरपालिकेला भूमी या विभागात राज्यस्तरावरील ३ लाख ते १० लाख लोकसंख्याचा गटात एकमेव शहरास दोन कोटींचा विशेष पुरस्कार मिळाला आहे. यामुळे यंदाही सोलापूर शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

भूमी या घटका अंतर्गत मनपाने वन विभाग, पर्यावरण प्रेमी संस्था व महाविद्यालयांचा माध्यमातून वर्षभरात एकुण २.५ लाख देशी प्रजातीच्या झाडांची लागवड केली. मागील चार वर्षापासून लावलेल्या झाडाचे संगोपन करून त्यांना जगवले आहे. शहरात मनपाने रोपवाटिका तयार केल्या. नगर शहर हरित व सुंदर दिसण्यासाठी हरित अच्छादने तयार केली. कचऱ्याचे घरोघरी संकलन करून त्यावर प्रक्रिया करण्यात येत असुन त्यामधून विजनिर्मिती व खत निर्मिती करणेत येत असुन हरित ब्रॅण्ड प्रमाणपत्र मिळविले आहे. तसेच सिंगल युज प्लास्टिकचा वापर टाळण्यासाठी जनजागृती करण्यात येऊन दंडात्मक कारवाई देखील करण्यात आलेत. माझी वसुंधरा अभियान २.0 मध्ये देखील मनपाला पुणे विभागातील प्रथम क्रमांक प्राप्त झाला असता २ कोटीचे बक्षीस मिळाले होते. त्यामधून मनपाने ३ उद्याने व १६0किलोवॅट सोलर पॅनल बसविले आहेत.

हे अभियान यशस्वी करण्यासाठी आयुक्त शीतल तेली -उगले यांच्या मार्गदर्शनाखाली माजी उपायुक्त मच्छिंद्र घोलप, सहाय्यक आयुक्त ज्योती भगत, पर्यावरण विभागाकडील अधिकारी अक्षय मोरे, स्वप्नील सोलनकर, उद्यान विभागाकडील किरण जगदाळे, पशुवैद्यकीय अधिकारी सतीश चौगुले व तेजस्वी सवाई सर्जे, दिलीप यांनी काम पाहिले.

### ओडीएफ प्लस प्लसचा दर्जा ठेवला कायम

शहर हागणदारीमुक्त करून स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ओडीएफ प्लस प्लस चा दर्जा कायम ठेवला. तसेच अभियानाची जनजागृती होण्यासाठी मनपाने शहरातील अनेक ठिकाणी अभियानाची पंचतत्वे दर्शवणाऱ्या वास्तू उभारणी, कारंजे व चौक सुशोभीकरण करण्यात आले.

# कोतवालांचे मानधन दहा टक्क्यांनी वाढले

## अनुकंपा धोरणही लागू

### राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

**मुंबई, ३० सप्टेंबर**

राज्यातील कोतवालांच्या मानधनात दहा टक्के वाढ करण्याचा निर्णय सोमवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यावेळी कोतवाल संवर्गातील कर्मचाऱ्यांना अनुकंपा धोरण लागू करण्यासही मंजुरी देण्यात आली.

राज्यातील १२ हजार ७९३ कोतवालांना याचा लाभ मिळणार आहे. त्यांना मिळणाऱ्या १५ हजार रुपये इतक्या मानधनात ही वाढ देण्यात येईल. सेवेत असताना मृत्यू झाल्यास किंवा गंभीर आजार, अपघात यामुळे असमर्थ ठरल्यास शासनाच्या अनुकंपा धोरणानुसार त्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देण्यासही मंजुरी देण्यात आल्याने, हा निर्णय हा कोतवालांच्या कुटुंबासाठी मोठा लाभदायी ठरला आहे.

**ग्राम रोजगार सेवकांना दरमहा ८ हजार मानधन**

राज्यातील ग्राम रोजगार सेवकांना दरमहा आठ हजार रुपये मानधन तसेच प्रोत्साहन अनुदान देण्यात येणार आहे. ग्रामपातळीवर ज्या ग्रामरोजगार सेवकांनी २ हजार पेक्षा जास्त दिवस काम पूर्ण केले आहेत. त्यांना मजुरी खर्चाच्या एक टक्का प्रोत्साहन अनुदान देण्यात येईल. दोन हजार दिवसांपर्यंत काम केलेल्या ग्रामरोजगार सेवकांना दर महिना एक हजार रुपये व दोन हजार एक पेक्षा जास्त दिवस काम करणाऱ्या ग्राम रोजगार सेवकांना दरमहा दोन हजार रुपये प्रवास भत्ता व डेटा पॅककरिता अनुदान देण्यात येणार आहे. *(तभा वृत्तसेवा)*

# किमान देवाला तरी राजकारणात आणू नका

## तिरुपती प्रसाद वादावर 'सुप्रीम' संताप

### चंद्राबाबू नायडूंना मागितला पुरावा

**नवी दिल्ली, ३० सप्टेंबर**

आंध्रप्रदेशातील तिरुपती बालाजी मंदिरातील प्रसाद लाडूमध्ये मासळीचे तेल आणि प्राण्यांची चरबी मिसळवली जात असल्याच्या वाद प्रकरणात दाखल याचिकेवर सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. हा आरोप करणारे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी पुरावा सादर करावा, असा आदेश देताना, किमान देवाला तरी तुमच्या राजकारणापासून दूर ठेवा, असा संताप न्यायालयाने व्यक्त केला.

चंद्राबाबू नायडू यांनी तिरुपती मंदिरातील प्रसादाबाबतचा आरोप १८ सप्टेंबर रोजी केला आणि २५ सप्टेंबर रोजी एफआयआर दाखल झाला. त्याच्या दुसऱ्या दिवशी विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले, याकडे न्या. भूषण गवई आणि न्या.



के. व्ही. विश्वनाथन् यांनी लक्ष वेधले. एका राज्याच्या सर्वोच्च पदावरील व्यक्तीने कोट्यवधी नागरिकांच्या श्रद्धेला धक्का देणारे खळबळजनक वक्तव्य जाहीररीत्या करणे योग्य नाही, असेही न्यायालयाने नमूद केले.

विशेष तपास पथकाद्वारेच या प्रकरणाचा तपास सुरू ठेवायचा की स्वतंत्र तपास यंत्रणेकडे ते सोपविले जावे, यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन न्यायालयाने यावेळी उपस्थित महान्यायाधिकर्ता तुषार मेहता यांना केले.

चंद्राबाबू नायडू यांनी प्रसादाबाबत केलेल्या आरोपांची सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीत चौकशी केली जावी; कारण हा कोट्यवधी भाविकांच्या श्रद्धेचा विषय आहे आणि त्यांना तिरुपतीचा प्रसाद सर्वाधिक प्रिय आहे, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी केला. तिरुपती मंदिरातर्फे वरिष्ठ वकील सिद्धार्थ आणि राज्य सरकारच्या वतीने मुकुल रोहतगी यांनी बाजू मांडली.

मुख्यमंत्री नायडू यांनी हा आरोप कोणत्या आधारावर केला, त्याचे पुरावे सादर केले जावे, असा आदेश न्यायालयाने रोहतगी यांना दिला. तुम्ही एका राज्याच्या सर्वोच्च पदावर विराजमान आहात. त्यामुळे किमान देवाला तरी राजकारणात आणले जाऊ नये, अशी अपेक्षा तुमच्याकडून असायला हवी, असे स्पष्ट करीत न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी ३ ऑक्टोबर रोजी करण्याचे जाहीर केले. *(वृत्तसंस्था)*

# अमरप्रीत सिंग नवे वायुदल प्रमुख

**नवी दिल्ली, ३० सप्टेंबर**



पाच हजार तासांपेक्षा जास्त उड्डाणांचा अनुभव असलेले कुशल लढाऊ वैमानिक एअर चीफ मार्शल अमरप्रीत सिंग यांनी सोमवारी भारतीय वायुदलाचे नवीन प्रमुखपदाची सूत्रे मावळते प्रमुख विवेक राम चौधरी यांच्याकडून स्वीकारली. अमरप्रीत सिंग आतापर्यंत वायुदलाचे उपप्रमुख होते. तीन वर्षे सेवा दिल्यानंतर एअर चीफ मार्शल विवेक राम चौधरी आज वायुदल प्रमुख पदावरून सेवानिवृत्त झाले. २७ ऑक्टोबर १९६४ रोजी जन्मलेले अमरप्रीत सिंग वायुदलात लढाऊ वैमानिक म्हणून १९८४ मध्ये दाखल झाले. सुमारे ४० वर्षांच्या प्रदीर्घ आणि प्रतिष्ठित सेवेत त्यांनी विविध कमांड, कर्मचारी, निर्देशात्मक आणि विदेशी नियुक्तींमध्ये काम केले आहे.

# मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर

**नवी दिल्ली, ३० सप्टेंबर**

प्रसिद्ध चित्रपट अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना भारतीय चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर करण्यात आला.

माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज एक्सवर या आशयाची घोषणा केली. मिथुनदा यांचा चित्रपटसृष्टीचा उल्लेखनीय प्रवास प्रेरणादायी आहे, त्यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे, असे वैष्णव यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले. भारतीय चित्रपटसृष्टीतील गौरवास्पद योगदानासाठी निवड समितीने मिथुन चक्रवर्ती यांना २०२२ चा दादासाहेब फाळके पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला, असे वैष्णव यांनी म्हटले. ८ ऑक्टोबरला होणाऱ्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार वितरण समारंभात मिथुन चक्रवर्ती यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. विशेष म्हणजे, आधीचे दादासाहेब फाळके पुरस्कार प्राप्त अशा आशा पारेख, खुशबू सुंदर आणि चित्रपट निर्माते विपूल अमृतलाल शाह यांच्या निवड



समितीने फाळके पुरस्कारासाठी मिथुन चक्रवर्ती यांची निवड केली. मिथुन चक्रवर्ती यांनी ३५0 चित्रपटात काम केले. त्यांना तीनदा राष्ट्रीय चित्रपट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना पद्मभूषणने पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले. १९७६ मध्ये मृणाल सेन यांच्या मृगया चित्रपटापासून त्यांनी चित्रपट क्षेत्रातील कारकीर्दीचा प्रारंभ केला. त्यांच्या पहिल्याच चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यानी हिंदी, बंगाली, तमिळ, तेलुगू, कन्नड, पंजाबी, भोजपुरी अशा बहुभाषिक चित्रपटांतून काम केले.

# जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचा 'निवडणूक पॅटर्न' हटके!

● भारत निवडणूक आयोगाने केले नियोजनाचे कौतुक

● सोलापुरी पॅटर्न राज्यभर राबविण्याचे आयुक्त राजीव कुमार यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

राज्यात विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाचा महाराष्ट्र दौरा झाला. मुंबई येथे राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांनी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने केलेल्या व आचारसंहिता लागल्यानंतर करावयाच्या तयारीचा आढावा निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त राजीव कुमार यांनी घेतला.

यावेळी सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी महिला मतदान नोंदणी व मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी ग्रामसुरक्षा यंत्रणेचा वापर यासाठी केलेल्या हटके तयारी व नियोजनाची दखल घेऊन राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यातही सोलापूर प्रमाणे नियोजन करावे,



असे आयुक्त राजीव कुमार यांनी सुचित केल्याने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे जिल्हाभरात कौतुक होत आहे. सोलापूरचे जिल्हाधिकारी विधानसभा निवडणुकीच्या कामकाजात स्वतः लक्ष घालून मतदानाची टक्केवारी वाढवणे व सर्व मतदान प्रक्रिया व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी अत्यंत कुशलतेने सामाजिक जाणीव ठेवून पूर्वतयारी व नियोजन करत असल्याबद्दल मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी कौतुक केले. महिला मतदारांची नोंदणी व ग्राम सुरक्षा यंत्रणा मार्फत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी केलेल्या नियोजनाची दखल मुख्य निवडणूक आयुक्त यांनी घेतली. या कामासह अन्य निवडणुकीच्या अनुषंगाने कामकाजात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद लक्ष घालत असल्याने नियोजन चांगल्या प्रकारे झालेले आहे. प्रारंभी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्हा निवडणूक प्रशासनाने विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने केलेल्या विविध कामाचे सादरीकरण आयोगासमोर सादर केले.

**● महिला मतदान नोंदणी** : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी ज्या गावात महिला मतदान नोंदणी कमी आहे; जेंडर रेशो ९२७ पेक्षा अशा ठिकाणी तलाठी, ग्रामसेवक, आशा वर्कर आणि अंगणवाडी सेविका महिला बचत गट यांचे मार्फत शिबिरे घेतली. नवीन विवाह झालेल्या महिलांची गावात नोंद करून घेण्यासाठी ही नियोजन करण्यात आलेले आहे. प्रांताधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार संबंधित मतदान केंद्रावर भेटी देऊन जास्तीत जास्त महिलांची मतदार म्हणून नोंदणी होण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे मतदार यादीचा जनरल रेशो ९३१ वरून ९४८ पर्यंत वाढण्यास मदत झालेली आहे.

**● ग्रामसुरक्षा यंत्रणा** : मतदानाच्या दिवशी दर दोन तासांनी आकडेवारी येते; ज्या गावात आणि मतदान केंद्रावर जिथे मतदान कमी असेल त्या ठिकाणी जिल्हाधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी स्वतः ग्राम सुरक्षा यंत्रणेमार्फत मतदान करण्यासाठी फोन कॉल करून आठवण करून देणार आहेत. तसेच तलाठी ग्रामसेवक इडज मार्फत प्रत्यक्ष मतदार यांना मतदान करण्यासाठी आवाहन करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. प्रत्येक गावाच्या व्हाट्सअप ग्रुप वर मतदान करण्यासाठी मेसेज करण्यात येणार आहेत.

# गेल्या चार वर्षांपासून शाळकरी मुलीचा लैंगिक छळ

● दोघा कराटे प्रशिक्षकांवर सोलापुरात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर -**

कराटे प्रशिक्षण ॲकॅडमीमध्ये कराटेचे शिक्षण घेणाऱ्या शाळकरी मुलीचा गेल्या चार वर्षापासून लैंगिक छळ करून तिचा विनयभंग करणाऱ्या दोघां कराटे प्रशिक्षकांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीत मुलीच्या फिर्यादीवरुन सुरेश सोनवणे (रा. तळे हिप्परगा, ता. उत्तर सोलापूर) आणि श्रीकांत पुजारी (रा. शेटफळ, ता. मोहोळ) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीता ही सन २०२० मध्ये ९वी मध्ये शिक्षण घेत श्रीकांत पुजारी यांच्या ॲकॅडमीच्या मुलांमुलीसोबत नॅशनल ऑलम्पीक चॅम्पीयनशिप ही कराटे स्पर्धा खेळण्यासाठी गोवा येथे गेली होती. तिथे पिडीतेने सुवर्ण पदक जिंकल्याने पुजारी याने तिचे खूप कौतुक केले. त्यानंतर सायंकाळी पिडीता ही जिंकलेली ट्रॉफी बॅगेमध्ये व गाडीमध्ये ठेवण्यासाठी गेली असता श्रीकांत पुजारी याने तिच्या खांद्यावर हात ठेऊन तुझी परिस्थिती हालाकीची आहे, तुला खेळात करियर करायचे असेल तर मी तुला आर्थिक मदत करू शकतो, तु मला शारीरीक सुख दे असे म्हणाला. त्यावेळी पिडीता ही घाबरून रुममध्ये पळून गेली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी पिडीता ही रूमला लॉक करीत असताना श्रीकांत याने पुन्हा तिच्याजवळ येऊन तिचे दोन्ही हात पकडून तु शारीरीक संबंध ठेवण्यास तयार झाली तर मी तुला कराटे क्षेत्रात किती नामवंत करतो बघ असे म्हणाला. त्यावेळी पिडीतेने त्याला तुम्ही माझ्या वडीलासारखे आहात, असे का बोलता असे म्हणाली. त्यावेळी श्रीकांतने



पिडीतेशी अश्लिल वागून तिला मारहाण केली. घाबरून पिडीतेने हा प्रकार कोणालाही सांगितला नाही. त्यानंतर ९ जून २०२३ रोजी पिडीतेची किक बॉक्सींग या खेळाची पंच म्हणून एका कॉलेजमध्ये निवड झाली. तर श्रीकांत पुजारी याचा मित्र सुरेश सोनवणे याचीही पंच म्हणून निवड झाल्याने जिल्हा क्रीडा संकुल येथे दोघांचेही कौतुक झाले. त्याठिकाणी एकांतात सुरेश सोनवणे याने पिडीतेला श्रीकांत आणि तुझ्यात काय चालू आहे, खेळामध्ये व पंच म्हणून पुढे जायचे असेल तर माझ्यासोबत संबंध ठेव, माझ्या खूप ओळखी आहेत, तुला या क्षेत्रात पुढे नेतो असे म्हणाला. त्यावेळी पिडीता ही काहीही न बोलता निघुन गेली. त्यानंतर १६ नोव्हेंबर २०२३ रोजी पिडीता ही कस्तुरबा मार्केट येथे भाजी आणण्यासाठी गेली असता सुरेश सोनवणे याची दुचाकी आडवी लावून तिला अडवून शरीरसंबंधाची मागणी केली व हा प्रकार कोणाला सांगितला तर तुझे छत्तीस तुकडे करून आई वडीलांना ठार मारण्याची धमकी दिली. मी आत्ताच रेप केसमधून जामीन घेऊन बाहेर आलो आहे असेही सोनवणे म्हणाला. या सर्व प्रकारानंतर पिडीतेला मानसिक धक्का बसल्याने ती घरात कोणास काही बोलत नव्हती, कॉलेजला जात नव्हती, जेवण करीत नव्हती, सतत रडत बसायची, कराटे ॲकॅडमीला जात नव्हती म्हणून तिची आई तिला सतत विचारायची. शेवटी पिडीतेने आईला घडलेला सर्व प्रकार सांगितल्याने याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. पोलिस उपनिरीक्षक येळे पुढील तपास करीत आहेत.


## तातडीने पाहिजेत

सोलापूर, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यासह महाराष्ट्रातील लोकप्रिय दैनिक सोलापूर तरुण भारतमध्ये तातडीने खालील पदांची भरती करावयाची आहे.

१) डेस्क उपसंपादक — २ पदे
२) बातमीदार — ४ पदे
३) डिटीपी ऑपरेटर — २ पदे
३) मार्केटिंग प्रतिनिधी — ४ पदे

किमान तीन वर्ष कामाचा अनुभव आवश्यक आहे. संगणकावर स्वतंत्रपणे काम करता येणे आवश्यक आहे. आकर्षक पगार. इच्छुकांनी ७ दिवसांत अर्जासह कार्यालयात समक्ष भेटावे.

**संपर्क: ९८८११९१४४३**

पत्ता- १९/२०, दैनिक तरुण भारत कार्यालय, होटगी रोड, सोलापूर.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### सरपंच वनिता सुरवसे यांना राज्यस्तरीय यशवंत गौरव पुरस्कार

**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

अविष्कार सोशल अँड एज्युकेशन फाऊंडेशन इंडियाच्या जिल्हा शाखेच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त शिक्षक सरपंच आणि उद्योजक असलेल्या गोगावच्या सरपंच वनिता सुरवसे यांचा राज्यस्तरीय यशवंत गौरव पुरस्कार सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राचे प्रदेश उपाध्यक्ष अ‍ॅड. विकास जाधव, श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांच्या यांच्या हस्ते देण्यात आला. वनिता सुरवसे यांना सरपंच परिषदेच्या जिल्हा समन्वयक आहेत. त्यांनी आतापर्यंत विविध विकासकामे केली आहेत. या कामांची दखल घेऊन अविष्कार फाऊंडेशनने त्यांना पुरस्कार दिला आहे. यावेळी फाऊंडेशनचे अध्यक्ष संजय पवार, उमेश पाटील, अविष्कारचे जिल्हाध्यक्ष सात पटेल, जिल्हाध्यक्ष मनोज कंगळे, जिल्हा संघटक स्नेहल खंकाळ, मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे, ए. बी. शेख, जब्बार सिकलगार, शंकरराव देशमुख, संतोष गायकवाड यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन संजय घोडके यांनी केले.

### शेटफळच्या विद्यार्थ्याचा बारामतीत खून



**करमाळा, दि.३० सप्टेंबर-**

शेटफळ (ता. करमाळा) येथील विद्यार्थी ओंकार संतोष पोळ याची कोयत्याने निर्घृण हत्या करण्यात आली. ओंकार हा बारामती शहरातील नामांकित तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय (टीसी) कॉलेजमध्ये बारावीमध्ये शिकत होता. अचानक त्याच्यावर धारदार कोयत्याने हल्ला करण्यात आला. पोलिसांनी सखोल चौकशी करून कोयत्याने हल्ला करणाऱ्या कोयता गँगचा म्होरप्या पकडून त्याला कठोर शिक्षा देण्याची मागणी पालकांमधून होत आहे.



### बंगालमध्ये सांगोल्याच्या गलाई बांधवांचा नावलौकिक

**आ. अ‍ॅड. शहाजीबापू पाटील यांचे कोलकत्ता येथे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३० सप्टेंबर-**

सांगोला तालुक्यातील गलाई बांधवांनी बंगालमध्ये आपले अस्तित्व सिद्ध करीत नावलौकिक केला असे प्रतिपादन आ. अ‍ॅड. शहाजीबापू पाटील यांनी कलकत्ता येथे गलाई बांधवांशी हितगुज करताना केले.

गलाई बांधवांनी आ. शहाजीबापू पाटील यांचे स्वागत करून सत्कार केला. यावेळी शहाजी जाधव, शंकरशेठ, अजितभैय्या, उमेशभैय्या, उत्तम जरे, सूरज बिरजे, महादेव जरे, राम चव्हाण, संजय दिघे, दत्ता बुलबुले यांच्यासह प्रा. संजय देशमुख, दादासाहेब लवटे, धनंजय काळे, सागर पाटील, शहाजी दिघे उपस्थित होते. आ. शहाजीबापू पाटील यांनी गलाई बांधवांचे विशेष कौतुक करीत त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या.

पुढे बोलताना आ. पाटील म्हणाले, पाच वर्षांपूर्वी मी बंगालच्या भूमीमध्ये आलो होतो. त्यावेळी मी आमदार व्हावे यासाठी सांगोला तालुक्यातील गलाई बांधवांनी कालिकामातेस नवस केले होते. तुम्हा गलाई बांधवांची ईच्छा पूर्ण झाली व मी तालुक्याचा आमदार झालो.

माझ्या आमदारकीसाठी तुम्ही केलेले नवस उद्याच्या निवडणुकीपूर्वी फेडावे त्यामुळे पुन्हा आपणास कालिकामातेचे आशीर्वाद मिळणार आहेत.



### ज्ञानेश महाराव यांना तात्काळ अटक करा : महेश इंगळे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३० सप्टेंबर-**

श्री स्वामी समर्थ महाराजांबद्दल अपशब्द बोलून भावना दुखावल्याबद्दल ज्ञानेश महाराव यांच्या विरोधात वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या नेतृत्वाखाली कारवाई करण्यासंदर्भात अक्कलकोट उत्तर पोलिस स्टेशनमध्ये निवेदन देण्यात आले.

ज्ञानेश महाराव यांच्यावर अद्यापही कारवाई झाली नसल्याने महेश इंगळे यांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला. यावेळी वटवृक्ष देवस्थान मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाडगे, रामचंद्र समाणे, प्रा. शिवशरण अचलेर, बाळासाहेब एकबोटे, प्रथमेश इंगळे, ऋषिकेश लोणारी, सागर गँगडाळ, सुनिल पवार, श्रीकांत झिपरे, अंकुश केत, वरूण शेळके, शिवपुत्र हळगोदे, प्रा. सुरेश वाले, डॉ. एच. एस. पाटील, राजू एकबोटे, शिवसेना (उबाठा) जिल्हा उपप्रमुख सुनिल कटारे, सचिन किरनळ्ळी, प्रसन्न हत्ते, धनराज स्वामी, अनंत हिरेमठ, दर्शन घाडगे, किरण साठे, तुषार मोरे, संतोष पराणे, बिंदिगे, रवी कदम, ओंकारेश्वर उटगे, सोमनाथ, सुतार, राजू भोसले, बाबा सुरवसे, खाजप्पा झंपले, संतोष जमगे, मधुकर सदाफुले, अभिषेक झिपरे, युवराज सोनटक्के, नरसिंग क्षीरसागर, स्वप्निल सातपुते, अविनाश सातपुते, विश्वनाथ देवरमनी, स्वामीराव मुसळे, संभाजी निंबाळकर, चित्तरंजन आगरथडे, नरसोबा पवार, श्रीकांत मलवे, श्रीशैल गवंडी, मनोज जाधव, संजय पवार, सागर इंगळे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# माढ्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी विधानसभा लढवणार

## धनराज शिंदे : मानेगाव येथील जाहीर सभेत केला निर्धार

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. ३० सप्टेंबर-**

माढा तालुक्यातील अनेक प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी तसेच तालुक्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपण माढा विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचे प्रतिपादन माढा वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष धनराज शिंदे यांनी केले.

मानेगाव (ता. माढा) येथे आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेप्रसंगी ते बोलत होते. शिंदे म्हणाले की, माढा तालुक्याचे राजकारण हे फक्त कारखानदार भोवतीच फिरत असून यापुढे ही निवडणूक कारखानदार सोडून होणार आहे. कारखाना विरहित निवडणूक आपण लढवीत असून तालुक्याच्या अनेक प्रलंबित प्रश्न त्यामध्ये विविध गावांना जोडणारे रस्ते, वाड्या-वस्त्यांवरील रस्ते, सरकारी दवाखाने, शैक्षणिक सुविधा, आरोग्य सुविधा सर्व



बाबींची सोडवणूक करण्यासाठी आपण माढा विधानसभा निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्रजी पवार गटाकडून लढवण्यास इच्छुक असल्याचे त्यांनी जाहीर केले.

माझ्यावर अकलूजला गेल्यावर टीका करण्यात आली. परंतु या आधी पण प्रत्येक निवडणुकीमध्ये अकलूजकरांची मदत घेतली जात होती. आमच्या कुटुंबाला सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्यापासून आजपर्यंत मदत होत आली आहे. सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांनी कै. विठ्ठलराव शिंदे यांना इंदिरा गांधी यांच्या पक्षाकडून उमेदवारी मिळवून दिली होती. आज मी विद्यमान खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांची भेट घेऊन त्यांची निवड झाल्याबद्दल सत्कार केला तर माझ्यावर अनेक प्रकारचे आरोप करण्यात आले. एका पक्षामध्ये काम करत असताना भेट घेतली. त्यामध्ये मी काही वेगळे केले नसून मी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी मदत मागितल्याने वेगळे काही सिद्ध होत नसल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

यावेळी नितीन तळेकर, डॉ. आप्पासाहेब घाडगे, नानासाहेब देशमुख, मुन्नाराजे मोरे आदींनी सध्या जनतेच्या भावना परखड शब्दांत व्यक्त केल्या. यावेळी नानासाहेब देशमुख, मुन्नाराजे मोरे, वैभव महाडिक, सौरभ घाडगे, बाळासाहेब शेळके, बालाजी मोटे, सचिन पराडे, प्रमोद बेंदकर, आलम जमादार, शीतल जोकर, तानाजी पराडे, नितीन तळेकर, सतिश पवार, आप्पासाहेब घाडगे, गोपाळ घाडगे, बापूसाहेब गवळी, गौरव पाडुळे, तसेच मानेगाव परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**धनराज शिंदे यांचे ग्रामस्थांकडून कौतुक**

गावातील ज्येष्ठ नागरिकांनी धनराज शिंदे यांनी केलेल्या विविध विकासकामांचा गौरव केला आणि त्यांना भविष्यातील नेतृत्व म्हणून साथ देण्याचे आश्वासन दिले. मानेगावमधील ही सभा आगामी निवडणुकीच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली असून, यामुळे धनराज शिंदे यांच्या नेतृत्वाखालील विकासाचा अजेंडा स्पष्ट झाला आहे.

# बार्शीत शेतकरी संघटनेचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३० सप्टेंबर -**

शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली बार्शी ते धाराशिव रस्त्यावरील चिखर्डे येथील बसस्थानक चौकामध्ये सुमारे एक तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

यावेळी तालुकाध्यक्ष शरद भालेकर, रयत क्रांती संघटनेचे सचिन आगलावे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे रामराव काटे, जीवन गावडे, पोपट पवार, लक्ष्मण भोसले, छोटू कोंढारे, हनुमंत हाके, प्रदीप कोंढारे, दादा कुठले, अमर कोंढारे, बाप्पा कोंढारे, राहुल कोंढारे, स्वप्निल कोंढारे, नंदकुमार



> या आंदोलनातील मागण्यांची पूर्तता लवकरच केली नाही तर पीकविमा कंपनीसह कृषी आयुक्तालय व संबंधित मंत्र्यांच्या घरासमोर आंदोलन करणार आहोत.
> **- शंकर गायकवाड,** राज्याध्यक्ष, शेतकरी संघटना

गिरमकर, अमर पाटील आदींसह बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते. सन २०२३ खरीप व रब्बी उर्वरित तसेच चालू खरिपाचा पीकविमा द्या, पीकविमा सॅम्पल सर्वे न करता वैयक्तिक पंचनामे करून मिळावा, चालू खरिपाचे पावसामुळे नुकसान झाल्यामुळे फळबागेसह सर्व पिकांची उर्वरित सर्व मंडळांना सरसकट नुकसान भरपाई द्या, राहिलेले कांदा अनुदान द्या, शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र तात्काळ सुरू करावीत, सर्व शेतकरी नेत्यांच्या संपत्तीची चौकशी करावी इत्यादी मागण्यासाठी हा रस्ता रोको करण्यात आला. यावेळी आंदोलकांना शंकर गायकवाड, शरद भालेकर व रामराव काटे यांनी मार्गदर्शन केले. मागण्यांचे निवेदन बार्शी तहसीलचे प्रतिनिधी, नारी मंडळ अधिकारी मेघना राजपूत यांना देण्यात आले. या आंदोलनाचा चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



### पंढरपूर बेदाणा मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष सोमनाथ डोंबे यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० सप्टेंबर-**

सन २०२३-२४ मध्ये बेदाण्याची पंढरपूर बाजार समितीमध्ये सर्वाधिक उलाढाल केल्याबद्दल कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पंढरपूर बेदाणा मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष सोमनाथ डोंबे यांचा माजी आ. प्रशांत परिचारक यांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी त्यांनी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

बाजार समितीने सुरू केलेल्या उपक्रमातून बाजार आवारात जास्तीत जास्त शेतीमाल विकी केल्याबद्दल शेतकरी विक्रम डोंगरे (रा. आढेगांव, ता. मोहोळ), अभिमन्यू जाधव, (रा. जाधववाडी, ता. पंढरपूर), रेवणनाथ भुजंगराव पाटील (रा. घोटी, ता. करमाळा), हणमंत झगडे (रा. जळोली, ता. पंढरपूर), जालिंदर बनकर (रा. पिसेवाडी, ता. माळशिरस), सूरज दोशी (रा. गादेगांव, ता. पंढरपूर), मारूती रूपनर (रा. महिम, ता.सांगोला), आकाश थिटे (रा. भोसे, ता.पंढरपूर ) यांचा व जास्तीत जास्त बेदाणा शेतीमाल विक्री केल्याबद्दल बेदाणा असोसिएशन, पंढरपूरचे अध्यक्ष सोमनाथ डोंबे, आडते तुलसी ट्रेडिंग कंपनीचे विनीत बाफना, आशिष ट्रेडिंग कंपनीचे संजय मस्के, धनंजय गाडेकर, सोहम ट्रेडिंग कंपनीचे अशोक शिंदे, बालाजी फूट सेलचे सचिन गंगथडे, श्री विठ्ठल ट्रेडिंग कंपनीचे राहुल देवकर, राजकुमार फडे आणिअनिलकुमार फडे आदींचाही सन्मान करण्यांत आला.

## पीक नुकसानाची माहिती ७२ तासात विमा कंपनीस कळवा

**कृषी अधिकाऱ्यांचे शेतकऱ्यांना आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० सप्टेंबर-**

जिल्हयामध्ये सद्यस्थितीत परतीच्या पावसामुळे शेतीपिकाचे नुकसान झालेचे निदर्शनास आलेले असून, पिकांचे नुकसान झालेले असल्यास विमा संरक्षित क्षेत्राला नुकसान भरपाई मिळणेसाठी झालेल्या नुकसानीची पुर्वसुचना संबंधीत विमा कंपनीस ७२ तासामध्ये कळवावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०२४ या हंगामाकरीता अधिसुचीत क्षेत्रातील अधिसुचीत पिकांसाठी राबविण्यात येत आहे. जिल्ह्यासाठी खरीप २०२४ मध्ये ओरियंटल इन्सुरन्स कंपनी लिमिटेड या विमा कंपनीची नियुक्ती करण्यात आलेली आहे. पिक विमा योजनेतर्गत खरीपमध्ये ७ लाख ३३ हजार ३०३ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला आहे प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत शेती क्षेत्राचे नुकसान झाल्यास विमा कंपनीकडे नुकसान भरपाई दावा दाखल करता येतो, असेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.


## खडकी मिलिटरी कॅम्पमधून बार्शीत आला रणगाडा

**बलिदानाचे होणार स्मरण; ५१ लाख खर्च करुन बनविले स्मारक**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० सप्टेंबर-**

बार्शी नगरपालिकेच्यावतीने सुमारे ५१ लाख रुपये खर्च करुन तयार करण्यात आलेल्या बार्शीतील शहीद स्मारकात (अमर जवान) बसवण्यात येणाऱ्या रणगाड्याचे आज पुण्याहून बार्शीत आगमन झाले असून त्याचे शहरात उत्साहात स्वागत करण्यात आले.

उपळाई रोड आणि अलीपूर रोडला जोडणाऱ्या लिंक रोडवर (जुने गोळीबार मैदान) या ठिकाणी हे स्मारक उभारण्यात आले आहे. सैनिकांची आठवण देणारे प्रेरणास्थान ठरेल. येथे सुंदर गार्डन ही तयार करण्यात आली आहे. माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष चांगदेव सुरवसे म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपासूनची शहीद स्मारक व्हावे ही आमची मागणी होती. आमदार राजेंद्र राऊत यांनी मध्यवर्ती जागा देऊन तसेच त्यासाठी निधी देऊन ती पूर्ण केली आहे. या ठिकाणी आदर्श स्मारक उभे राहिले आहे. माजी सैनिकांसाठी आज अभिमानाचा दिवस आहे. १९६२, १९६५, १९७१ व १९९९ चे कारगिल युद्धात अनेक जवानांना प्राण गमवावे लागले. इतर चकमकी होतात त्यातही अनेकजण शहीद होतात. त्यांच्या आठवणी जाग्या राहाव्यात व त्यांच्या बलिदानाचे स्मरण व्हावे हा स्मारकाचा हेतू आहे.



**रणगाडा, शहिद स्मारकात ठेवणार...!**

पुणे शहरातील खडकी येथील सी.ए.एफ.व्ही.डी लष्करी विभागाकडून पाकिस्तानला १९७१ चा युद्धात धूळ चाळणारा ४० टनी टी-५५ विजेता टँक रणगाडा बार्शी शहरातील शहीद स्मारक (अमर जवान) या ठिकाणी दाखल झाला. आमदार राजेंद्र राऊत यांनी यावेळी त्याची पाहणी केली. युद्धातील स्मृती जपण्यासाठी या रणगाड्याला शहीद स्मारक (अमर जवान) या ठिकाणी ठेवण्यात येणार आहे.



## विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत डिकसळ आश्रमशाळा तिसरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३० सप्टेंबर-**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचलनालय आयोजित पुणे विभागस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत सांगोला तालुक्यातील डिकसळ आश्रमशाळेच्या १७ वर्षीय मुलींच्या संघाने तिसरा क्रमांक पटकाविला. या स्पर्धा सासवड येथे पार पडल्या.

पहिला सामना पिंपरी चिंचवड या संघाविरुद्ध झाला. यात डिकसळच्या संघाने २-० अशा सरळ सेटने विजयी संपादित केला. उपांत्य फेरीत बारामती विरुद्ध २-० गमावून तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या सामन्यात अहमदनगर शहरविरुद्ध २-० अशा फरकाने विजयी मिळवीत विभागात तिसरा क्रमांक पटकाविला.

संघाची कर्णधार कोमल व्हरगर हिने उत्तम खेळ करीत संघाला विभागीयस्तरावर यश मिळवून दिले. यावेळी प्राजक्ता करांडे, पायल गायकवाड, रुपाली वाघमोडे, साक्षी आटपाडकर, सृष्टी उजनीकर, पल्लवी कोरे, अंकिता भुसनर यांनी ही दमदार खेळी केली. यांना क्रीडाशिक्षक काकासाहेब करांडे, भारत यादव यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्वांचे मुख्याध्यापक तुकाराम भूसनर, जितेंद्र जगधने, राजेंद्र कांचनकोठी, संजय येडवे, शशिकला बाबर, आनंद निळे, आण्णासो चौगुले यांनी अभिनंदन केले.

**राज्य निवड चाचणीसाठी कोमल व्हरगर**

डिकसळ आश्रमशाळेची कोमल राजू व्हरगर हिची राज्य व्हॉलीबॉल चाचणीसाठी निवड झाली असून, हे सामने ४ ऑक्टोबर रोजी नागपूर येथे होणार आहेत. अत्यंत गरीब कुटुंबातील, डोंगर दऱ्यात राहणारी कोमल ही १० वीच्या वर्गात शिक्षण घेत असून, प्रशालेच्या १७ वर्षीय मुलींच्या टीमचे नेतृत्व करते. विभागीय स्पर्धेत चमकदार कामगिरी केल्याने हिची राज्य चाचणीसाठी निवड झाली आहे.

# मंदिर समितीच्या कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार मिळणार वेतन

## गहिनीनाथ महाराज औसेकर : राज्य शासनाने दिली अतिरिक्त खर्चाला मंजुरी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० सप्टेंबर-**

श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिर समितीच्या आस्थापनेवरील सर्व कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सातव्या वेतन आयोगानुसार वेतन देण्यास होण्याऱ्या अतिरिक्त खर्चास शासनाने मंजुरी दिल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

आस्थापनेवरील सर्व कर्मचाऱ्यांची सेवा मंजूर आकृतिबंधानुसार माहे जानेवारी २०१९ पासून संरक्षित केली आहे. तसेच जून, २०१९ पासून सहाव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी लागू केली आहे. मात्र, आस्थापनेवरील खर्चास १० टक्क्याची मर्यादा असल्याने ५० टक्के, ७५ टक्के व १०० टक्के महागाई भत्ता व ५ टक्के घरभाडे भत्ता देण्यात येत होता. तथापि, मंदिर समितीने सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षापासून आस्थापनेवरील सर्व कर्मचा-यांना २०३ टक्के महागाई



भत्ता व १० टक्के घरभाडे भत्ता लागू केला आहे. मात्र, ३ जानेवारी २०१९ ते ३१ माच २०२४ या कालावधीतील महागाई व घरभाडे भत्त्याच्या फरक दिलेला नव्हता. तसेच शासकीय कर्मचा-यांप्रमाणे वेतन व भत्ते देण्याबाबत कर्मचा-यांकडून वारंवार मागणी होत होती.

आषाढी एकादशी दिवशी म्हणजे १७ जुलै रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेची शासकीय महापूजा करण्यासाठी श्रीक्षेत्र पंढरपूरला आले होते. त्यावेळी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग मिळण्याबाबत चर्चा झाली होती. त्यावर त्यांनी प्रस्ताव तयार करून शासनास सादर करावा, शासन सकारात्मक निर्णय घेईल असे आश्वासित केले होते. त्यानुसार मंदिर समितीच्या सभेत निर्णय घेऊन धर्मादाय आयुक्त यांच्या मंजुरीने शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तद्नंतर सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी २० सप्टेंबर रोजी मंत्रालय येथे व२१ सप्टेंबर रोजी पुणे येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची समक्ष भेट घेऊन चर्चा केली होती. त्यास ३० सप्टेंबर रोजी शासनाने मंजुरी दिली आहे.

२२५ कर्मचारी कार्यरत आहे. या कर्मचाऱ्यांना सध्या सहावा वेतन आयोग लागू आहे. आता शासनाच्या मंजुरीने ७ वा वेतन आयोग लागू होऊन प्रतिमहा ७ ते १० हजार इतकी भरघोस वेतनवाढ होणार आहे. त्यासाठी मंदिर समितीचा प्रतिवर्षी एक ते दीड कोटी इतका अतिरिक्त खर्च वाढणार आहे. याशिवाय ३ जानेवारी २०१९ ते ३१ माच २०२४ या कालावधीतील सहाव्या वेतन आयोगातील भत्त्याच्या फरकाची रक्कम देखील कर्मचाऱ्यांना मिळणार आहे.

**यांनी केला होता पाठपुरावा**

सदर प्रस्ताव मंजुरीसाठी धर्मादाय आयुक्त कार्यालय व मंत्रालय स्तरावर मंदिर समितीचे सदस्य आ. रामचंद्र कदम, शकुंतला नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, हभप ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, अ‍ॅड. माधवी निगडे, हभप प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरूजी, हभप शिवाजीराव मोरे तसेच कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री व आस्थापना विभाग प्रमुख विनोद पाटील यांनी पाठपुरावा केला होता.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## क्राईम वृत्त

### कारंबा पंपगृहाच्या पाण्यात बुडून मृत्यू

**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

कारंबा शिवारातील उजनी कालवा उपविभागीय क्र. २७ कारंबा पंपगृह क्रेश रॅक पाण्यात वृध्दाचा बुडून मृत्यू झाला. गौरीशंकर



यशवंत पाटील (वय ८१, रा. भोगाव, ता. उत्तर सोलापूर) असे मरण पावलेल्या वृध्दाचे नाव आहे. सोमवारी दुपारी उजनी कालवा उपविभागीय क्र. २७ चे कारंबा पंपगृह क्रेश रॅक येथे पाण्यात गौरीशंकर पाटील हे पाण्यात तरंगताना मिळून आल्याने त्यांना नासीर लादेन याने बाहेर काढून सोलापूर तालुका पोलिस ठाण्यातील हवालदार एस डी मोरे यांनी बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. राजदिपक भिसे यांनी मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### पिठाच्या गिरणीला लागलेली आग विझवताना एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

पिठाच्या गिरणीला लागलेली आग विझविताना भाजून गंभीर जखमी झालेल्याचा उपचारावेळी मृत्यू झाला. दिगंबर नागप्पा कापसे (वय ५०, रा. खुदावाडी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. कापसे यांची खुदावाडी येथे पिठाची गिरणी आहे. सोमवारी पहाटेच्या सुमारास या पिठाच्या गिरणीत लागलेली आग विझविण्यासाठी गेल्यानंतर कापसे यांच्या अंगावरील कपड्यांनी पेट घेतल्याने त्यात भाजून गंभीर जखमी झाले. त्यामुळे कापसे यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असता सकाळी त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉ. किरण जमखंडी यांनी सांगितले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### जेसीबीने धडक दिल्याने जखमी झालेल्या दुचाकीस्वाराचा मृत्यू

**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर -**

जेसीबीने धडक दिल्याने जखमी झालेल्या दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. हजरत मकबुल मुलाणी (वय ३६, रा. पुळुज, ता. पंढरपूर) असे मरण पावलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. १८ सप्टेंबर रोजी दुपारी हजरत मुलाणी हे त्याच्या दुचाकीवरून पुळुज ते भिमा कारखान्याकडे जात होते. त्यावेळी ओव्हरटेक करून येणाऱ्या अज्ञात जेसीबीने मुलाणी याच्या दुचाकीस जोरदार धडक दिली. त्यामुळे मुलाणी गंभीर जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार सुरु असताना सोमवारी पहाटे मुलाणी याचा मृत्यू झाला. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### कुमठे गावातील मड्डी वस्ती येथे घरफोडी

**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर -**

कुमठे गावातील मड्डी वस्ती येथे चोरट्याने घरफोडी करून १ लाख १९ हजार ७०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. याबाबत मिनाक्षी सिद्राम कुदरे (वय ४२, रा. महालक्ष्मी नगर, कुमठेगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिनाक्षी कुदरे यांच्या घराच्या मागील कंम्पाऊंडवरून चोरट्याने उडी मारून २६ ऑगस्ट ते १८ सप्टेंबर या कालावधीत खोलीमध्ये प्रवेश करून सोने-चांदीचे दागिने चोरून नेले. यामध्ये सोन्याची पिळ्याची अंगठी, सोन्याचे मणी, कानातील गुंड साखळी, चांदीचे पैंजण, चांदीची समई, चांदीची पणतीचा समावेश आहे. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सहायक पोलिस निरीक्षक गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

# दुभाजकांमधील झाडे छाटली; पालापाचोळा जागेवरच

## स्मार्ट सिटीच्या स्मार्ट महापालिकेचा अजब कारभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

सोलापूर स्मार्टसिटीचा अजब कारभार सध्या व्ही.आय.पी रस्त्यांवर दिसून येत आहे. शहराच्या व्ही.आय.पी रस्त्याच्या मधोमध असणाऱ्या दुभाजकामधील विविध रोपांची गेल्या काही दिवसांमध्ये महापालिकेच्या वतीने छाटणी करण्यात आली. लांबलचक वाढलेली रोपांची छाटणी व्यवस्थित करण्यात आली खरी, परंतु छाटलेल्या रोपांचा पालापाचोळा त्याचं जागेवर टाकून देण्यात आला आहे. पडलेला पालापाचोळा उचलण्याची तसदी न घेता, महापालिका प्रशासनाने जीवावर उदार होऊन सदरचे काम केले आहे का?




असा प्रश्न आता नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. स्मार्टसिटीत विविध रस्त्यांच्या दुभाजकांमध्ये वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. सदरचे वृक्ष मोठ्या प्रमाणात वाढल्याने, वाहन चालवताना वाहकधारकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. झाडांच्या फांद्या लांबचलांब वाढल्याने त्या महापालिका प्रशासनाच्या उद्यान विभागाकडून छाटण्यात आल्या. मात्र छाटलेल्या झाडांच्या फांद्या रोडवरच टाकून देण्यात आल्या. तोडलेली वृक्षांच्या फांदे उचलून रस्ते स्वच्छ करण्याचे काम मात्र प्रशासन विसरले की काय? असे प्रश्न निर्माण होत आहे. शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या प्रमुख व्हीआयपी रस्त्यावर असे चित्र दिसून येत असल्याने वाहनधारकांमधून आश्चर्य व्यक्त होत आहे.

रस्त्यावरील दुभाजकामध्ये लावलेली मोठमोठी जंगली वृक्ष काही कालावधीतच मोठी होतात. त्यामुळे वाहन चालवताना वाहनधारकांच्या डोळ्यासमोर झाडांच्या फांद्या येतात. वळण घेताना प्रमुख व्हीआयपी रस्त्यावर असे घटना घडतात. त्यामुळे महापालिका प्रशासनाने तत्काळ झाडांची छाटणी केली खरी, परंतु छाटलेल्या झाडांच्या फांद्या आहे त्याचठिकाणी टाकून दिल्याने शहरात इतरत्र कचरा वाढत आहे. पडलेला पालापाचोळा काढण्याची तसदी महापालिका प्रशासनाने घेतली नाही.

**- समीर पाटील, वाहनधारक**

### पालापाचोळा उचलण्याचे कामकाज सुरू

शहराच्या प्रमुख व्हीआयपी रस्त्यांवरील झाडांची छाटणी केली आहे. मात्र, पडलेल्या फांद्या लागलीच उचलण्यात आल्या नाहीत. त्या फांद्या वाळल्यानंतर उचलण्याचे नियोजन केले असल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्याने सांगितले.

# राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाच्या तज्ज्ञ सल्लागार समिती सदस्यपदी पराग शहा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

शैक्षणिक, सामाजिकस्तरावर मनापासून सेवा देणारे उद्योजक पराग शहा यांची अल्पसंख्यंक समुदायाच्या समस्यांनिवारणासाठी राष्ट्रीय अल्पसंख्यंक आयोगाच्या तज्ज्ञ सल्लागार समितीचे सदस्य म्हणून नामांकन करण्यात आले आहे. अल्पसंख्यंक समाजाप्रती केलेल्या कामाची दखल घेऊन, भारत सरकार अल्पसंख्यंक वाणिज्य मंत्रालय, राष्ट्रीय अल्पसंख्यंक आयोग सदस्य धन्यकुमार जिनाप्पा गुंडे यांच्या शिफारसीने श्री पराग शहा यांची ही नेमणूक झाली आहे. राष्ट्रीय अल्पसंख्यंक आयोगाच्या धोरणात्मक निर्णयाद्वारे अल्पसंख्यंक समाजास शिक्षण, सामाजिक सेवा मिळण्यास समस्या उद्भवूनये यासाठी श्री पराग शहा यांचे मोठे योगदान ठरणार आहे. अल्पसंख्यंक समुदाय आणि राष्ट्रीय अल्पसंख्यंक आयोग यांच्यातील सेतू बनून अल्पसंख्यंकांचे सर्वांगीण विकासकार्य पुढे नेण्यासाठी महत्त्वपूर्ण जबाबदारी श्री पराग शहा यांच्यावर असणार आहे. या निवडीबद्दल खा. प्रणिती शिंदे, वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी यांनी अभिनंदन केले.





# पंढरीत देशी बनावटीच्या रिव्हॉल्व्हरसह आरोपी जेरबंद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० सप्टेंबर-**

पंढरपुरात कमरेला रिव्हॉल्व्हर लावून फिरणाऱ्या एकाला पोलिसांनी घेराव घालून शनिवारी रात्री पावणेदहाच्या सुमारास पकडले. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव योगेश मारुती खंडागळे (वय २६, रा. खंडाळी, ता. माळशिरस) असे आहे.

इसबावी परिसरात एक इसम अवैध शस्त्र घेऊन फिरत असल्याची माहिती सपोनि आशिष कांबळे यांना शनिवारी मिळाली. त्यांनी सपोफौ राजेश गोसावी, सपोफौ शरद कदम, पोहेको सूरज हॅबाडे, सचिन हॅबाडे, पोकों समाधान माने या पोलिस पथकासह इसबावी परिसरात त्या इसमाचा शोध सुरू केला. यावेळी दूध पंढरी डेअरीच्या मेन गेटच्या सुरक्षा भिंतीलगत असलेल्या मोकळ्या जागेत एक जण संशयितरित्या फिरताना दिसला. पोलिसांनी शनिवारी रात्री पावणेदहाच्या त्या इसमाला घेराव घातला. त्याची माहिती घेतली त्यावेळी त्याचे नाव योगेश खंडागळे असे त्याने सांगितले. त्याची अंगझडती घेतल्यानंतर त्यांच्या कमरेला देशी बनावटीचे रिव्हॉल्व्हर मिळून आब त्यास विचारले असता त्या उडवाउडवीची उत्तरे दिली. त्याच्याक रिव्हॉल्व्हर बाळगण्याचा कोणता परवाना नसल्याने त्याच्याविरु पंढरपूर शहर पोलिस ठाण्यात गुन् दाखल करण्यात आला आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेने केली असून या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष कांबळे हे करीत आहेत.

# वाडिया हॉस्पिटल, उलन मार्केट रस्त्यालगतचे अतिक्रमण काढले





## चारचाकी पाच हात गाड्या, टपरीसह खेळणी केले जप्त

## भाजी विक्रेत्या महिलांचा पालिकेसमोर ठिय्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने आज पुन्हा फॉरेस्ट येथील वाडिया हॉस्पिटल परिसरातील रस्त्यावरील भाजी विक्रेत्यांवर पुन्हा कारवाई केली. या कारवाई विरोधात भाजी विक्रेत्या महिलांनी महापालिका मुख्य प्रवेशद्वारासमोर येऊन ठिय्या आंदोलन केले. रेल्वे लाईन जुना एम्प्लॉयमेंट चौक आणि श्री सिद्धेश्वर मंदिराजवळील उलन मार्केट रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यात आले.

पालिका आयुक्त शितल तेली -उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. नियमितपणे कारवाई सुरू आहे. शहरात दोन ठिकाणी कारवाई करण्यात आली. फॉरेस्ट येथील वाडिया हॉस्पिटलसमोरील रस्त्यावर अनधिकृत भाजी विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली. अनधिकृतपणे भाजी विक्री करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे रहदारीस अडथळा होत आहे. तीन दिवसांपासून प्रशासनाकडून ही कारवाई करण्यात येत आहे.

रेल्वे स्टेशन रोडवरील मंडईमध्ये जुने विक्रेते बसू देत नाहीत तर महापालिका प्रशासन सतत कारवाई करत असल्याने आम्ही जगायचं कसं असा प्रश्न उपस्थित करत येथील भाजी विक्रेत्या महिलांनी महापालिका मुख्य प्रवेशद्वारासमोर येऊन ठिय्या आंदोलन केले. आम्हाला तिथेच जागा द्यावी अशी मागणी केली. महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून अखेर त्या महिला परतल्या असल्याचे सांगण्यात आले. अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आज सकाळच्या सत्रात रेल्वे लाईन जुना एम्प्लॉयमेंट चौक येथील डॉ. आंबेडकर मेमोरियल हायस्कूलसमोरील लोखंडी टपरीचे अतिक्रमण काढण्यात आले. या मोहिमेत तीन चार चाकी गाड्या, एक लोखंडी टपरी व इतर सामान जप्त करण्यात आले. तर दुपारच्या सत्रात महापालिकेच्या पथकाने श्री सिद्धेश्वर मंदिरा जवळील उलन मार्केट समोरील रस्त्यावरील खाद्यपदार्थांच्या गाड्या जप्त केल्या. येथील चार चाकी २ हात गाड्या व दोन लोखंडी खेळणी, सामान जप्त करण्यात आले आहे. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे, मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते. सोलापूर शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.

# काँग्रेसकडून आजपासून इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती

## १० ऑक्टोबरला प्रदेश काँग्रेसला अहवाल

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. ३० सप्टेंबर-**

विधानसभेच्या निवडणुकीची तयारी म्हणून काँग्रेस पक्षाकडे उमेदवारी मागितलेल्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती मंगळवारी दि. १ ऑक्टोबरपासून घेतल्या जाणार आहेत. ज्येष्ठ नेत्यांवर या मुलाखतीची जबाबदारी सोपवण्यात आली असून हे नेते आपल्याला नेमून दिलेल्या जिल्ह्यात जाऊन मुलाखती घेऊन आपला अहवाल देणार आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी प्रदेश काँग्रेस कमिटीकडे एकूण १६८८ इच्छुकांनी उमेदवारी मागितलेली आहे. महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या निर्देशानुसार व प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या मान्यतेने सर्व इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींसाठी काँग्रेस पक्षाने ज्येष्ठ नेत्यांवर जबाबदारी सोपवली आहे. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे पुणे शहर व पुणे ग्रामीण, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान यांच्याकडे नागपूर शहर व ग्रामीण, खा. चंद्रकांत हंडोरे यांच्याकडे ठाणे जिल्हा, खा. प्रणिती शिंदे यांच्याकडे सांगली व सातारा जिल्हा, मुजफ्फर हुसेन यांच्याकडे अहमदनगर आ. कुणाल पाटील यांच्याकडे नाशिक, माजी मंत्री विधान परिषदेतील गटनेते सतेज पाटील यांच्याकडे मुंबई शहर, अमित देशमुख यांच्याकडे सोलापूर व कोल्हापूर, डॉ. नितीन राऊत यांच्याकडे वर्धा व यवतमाळ, यशोमती ठाकूर यांच्याकडे परभणी व हिंगोली, डॉ. विश्वजीत कदम यांच्याकडे नांदेड, प्रा. वसंत पुरके यांच्याकडे अकोला, खा. नामदेव किरसान यांच्याकडे वाशीम, खा. डॉ. कल्याण काळे यांच्याकडे लातूर व बीड, खा. डॉ. शोभा बच्छाव यांच्याकडे जालना, आ. संग्राम थोपटे यांच्याकडे मुंबई उपनगर, डॉ. वजाहत मिर्झा यांच्याकडे संभाजीनगर, एम.एम. शेख यांच्याकडे धाराशिव, हुसेन दलवाई यांच्याकडे पालघर, शिवाजीराव मोघे यांच्याकडे धुळे व नंदुरबार, सुरेश शेट्टी यांच्याकडे सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड, आ.अभिजीत वंजारी चंद्रपूर व गडचिरोली, सतीश चतुर्वेदी भंडारा व गोंदिया, प्रदेश उपाध्यक्ष नाना गावंडे यांच्याकडे बुलढाणा व अमरावती, ची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. हे नेते १ ते ८ ऑक्टोबरपर्यंत संबधित जिल्ह्यात जाऊन इच्छुकांच्या मुलाखती घेतील. १० ऑक्टोबर पर्यंत गोपनीय अहवाल प्रदेश काँग्रेसला सादर करतील, अशी माहिती प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे यांनी दिली.

# केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा आज मुंबई, नवी मुंबईत पदाधिकाऱ्यांशी संवाद मेळावा

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.३० सप्टेंबर-**

भाजपचे ज्येष्ठ नेते व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे मंगळवारी दि .१ ऑक्टोबरला मुंबईत येत आहेत. मुंबई व कोकण विभागातील पक्षाच्या निवडणूक तयारीचा आढावा घेणार असून त्यासाठी मुंबईत दादर येथे व नवी मुंबईत वाशी येथे कार्यकर्ता संवाद मेळावा घेणार आहेत.

यामध्ये ते मुंबई आणि कोकणातील विधानसभा मतदार संघनिहाय आढावा घेणार आहेत. यावेळी ते निवडणूका जिंकण्यासाठी पदाधिकारी व इच्छूक उमेदवारांनी कोणता कानमंत्र देतात?, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. अमित शाह यांचे सकाळी मुंबईत आगमन होणार आहे. दुपारी १२.३० वाजता दादर येथील योगी सभागृहात पक्षाच्या मेळाव्यात पदाधिकारी व नेत्यांना मार्गदर्शन करणार आहेत.त्यानंतर त्यांची दुसरी बैठक सायंकाळी ४.३० वाजता वाशीतील सिडको कनवेनशन सेंटर, गेट क्र. १, येथे होणार आहे. लोकसभेत च्या निवडणुकीत भाजपाचे महाराष्ट्रात दारू पराभव पत्करावा लागला त्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीची सर्व रणनीती आखण्याची जबाबदारी गृहमंत्री अमित शाह यांनी हातात घेतली आहे. महायुतीतील शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या बरोबर जागा वाटप, निवडणूक प्रचार निती आदी सर्व बाबतीत राज्यातील नेत्यांना मार्गदर्शन करणार आहेत.



शाह यांनी अलीकडेच विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रात भाजपच्या बैठका घेतल्या होत्या. आता त्यांनी मुंबईवर लक्ष केंद्रित केले आहे. सोबतच ठाण्यासह कोकणात भाजपची काय परिस्थिती आहे, हेदेखील ते जाणून घेणार आहेत. लोकसभेत भाजपला मुंबईत एकच जागा जिंकता आली. त्यामुळे मुंबई भाजपमध्ये अंतर्गत मतभेदा ची चर्चा आहे. यासंदर्भात शाह काय कानपिचक्या देतात? याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# राज्यातील ४९ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात २३९८ कोटी मदत जमा

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३० सप्टेंबर -**

गत वर्षी भाव पडल्याने नुकसान झालेल्या सोयाबीन व कापूस उत्पादकांना हेक्टरी पाच हजारांप्रमाणे अर्थसहाय्य करण्याच्या योजनेतून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते ऑनलाईन वितरण प्रणालीची कळ दाबून शेतकऱ्यांना अर्थसहाय्य वितरणाची सुरुवात केली.

एका क्लिकवर सुमारे ४९ लाख ५० हजार हेक्टरी पाच हजार रुपये प्रमाणे दोन हेक्टरच्या मर्यादेत रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर २३९८ कोटी ९३ लाख रुपये वर्ग करण्यात आली. २०२३ च्या खरीप हंगामात एकूण ९६ लाख ७८७ खातेदार शेतकरी हे सोयाबीन व कापूस उत्पादक होते. त्यानुसार त्यांना मदत करण्यासाठी राज्यशासनाच्या कृषी विभागाने एकूण ४१९४ कोटी रुपये इतका निधी डीबीटी प्रणालीवर उपलब्ध करून दिलेला आहे. त्यापैकी १५४८ कोटी ३४ लाख कापूस तर सोयाबीनसाठी २६४६ कोटी ३४ लाख रुपयांची तरतूद केली आहे. अनुदान स्वतंत्ररीत्या वितरण करण्यासाठी लेखाशीर्षासह महाआयटीद्वारे स्वतंत्र पोर्टल तयार करण्यात आले होते.

# शरद पवारांमुळे धनगरांचे वाटोळे

## आ. गोपीचंद पडळकर यांची टीका

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ३० सप्टेंबर-**

खऱ्या औरंग्याच्या पिलावळीला यामध्ये औरंगजेब दिसतोय आणि धनगरांचे वाटोळे करायचं तर सगळ्यात बेस्ट पर्याय हा पवार आहेत म्हणूनच शरद पवार यांच्याकडे चौंडीचे पुन्हा अहमदनगर नाव करा अशी मागणी झाली असावी अशी टीका आ. गोपीचंद पडळकर यांनी केली.



आ. गोपीचंद पडळकर हे टेंभुर्णी येथे जय मल्हार क्रांती संघटनेच्या वतीने आयोजित जनसंवाद यात्रा सांगता समारंभ व आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या २३३ व्या जयंती सोहळ्यानिमित्त कार्यक्रमास आले होते, यावेळी ते बोलत होते. जय मल्हार क्रांती संघटना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष दौलत शितोळे यांची टेंभूर्णी शहरातून घोड्यावरुन मिरवणूक काढण्यात आली. राज्य उपाध्यक्ष अंकुश जाधव यांनी प्रस्ताविक केले. यावेळी प्रवक्ते विष्णू चव्हाण, दिग्विजयसिंह, शहाजी पाटील, अशोक वाघमोडे, माजी सभापती विक्रम शिंदे, शिला पाटील, शिवाजी पाटील-चांदजकर, खरेदी-विक्री संघांचे संचालक नागेश खटके-पाटील, योगेश बोबडे, सूरज देशमुख, सतिश नेवसे, दादा कळसाईत, नागननाथ वाघे, वाघे, तुकाराम डोके, गौतम कांबळे, पै. राहुल टिपाले, गणेश कोकीळ उपस्थित होते.

# मुंबईत सांगोलकरांना हक्काचे घर देणार

## दीपकआबा साळुंखे-पाटील यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.३० सप्टेंबर-**

पिढ्यान्पिढ्या दुष्काळी तालुका अशी ओळख असलेल्या सांगोला तालुक्यातून पोटाची खळगी भरण्यासाठी मुंबईची वाट धरणाऱ्या सांगोलकरांना मुंबई आणि परिसरात सुमारे १०० एकरावर घरकुल योजना राबवून हक्काचे घर मिळवून देण्यासाठी तसेच आपल्या अडीअडचणी व व्यथा मांडण्यासाठी २४ तास तत्पर असणारे कार्यालय आणि नागरिकांसाठी नवी मुंबई परिसरात सांगोला भवन उपलब्ध करून देण्यासाठी मी कटिबद्ध असल्याचे अभिवचन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी दिले.



वाशी येथील सिडको एक्जीबिशन अँड कॉन्वेंशन हॉल येथे माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सांगोला तालुक्यातील नागरिकांचा स्नेह मेळावा संपन्न झाला, यावेळी ते बोलत होते. पुढे दीपकआबा साळुंखे पाटील म्हणाले, मुंबईत सांगोलकर बांधवांनी केलेल्या भव्य दिव्य स्वागताने मी अक्षरशः कृतार्थ झालो आहे. आजवर केलेल्या निस्वार्थ आणि निरपेक्ष कामाचीही मी पोहोच पावती आहे असे मानतो. मुंबईतील बांधवांनी केलेल्या सत्कारामुळे यापुढील काळातही आणखी जोमाने काम करण्याची ऊर्जा मिळाली.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# स्वकुळ तारक सुता...

लोकसभा निवडणुकीच्या काळात ज्या ज्या राजकीय पक्षांना आपल्या भविष्याच्या भीतीने पछाडले होते, त्या पक्षांमधील अस्वस्थता पुन्हा एकदा नव्याने बळावू लागली आहे. नरेंद्र मोदी यांची १० वर्षांची सत्ता संपुष्टात येणार आणि देशात इंडिया नावाच्या कडबोळ्याचे सरकार येणार, अशी स्वप्ने पाहत विरोधकांतील जे चाणक्य नव्या राजकीय मांडणीची भाकिते वर्तवत होते, त्यामध्ये शरद पवार यांचे नाव पहिल्या क्रमांकावर होते. पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील मर्यादित ताकदीचे नेते असल्याचे वारंवार सिद्ध झाले असले, तरी आपल्या प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीच्या बळावर राष्ट्रीय पातळीवर बिगरभाजपा पक्षांच्या राजकारणात त्यांनी आपले बस्तान व्यवस्थित बसविलेले असल्याने त्यांनी वर्तविलेली भाकिते सहसा फोल ठरत नाहीत, अशी अंधश्रद्धा असलेल्या राजकीय निरीक्षकांनी तेव्हा त्यांच्या भाकितावर भाष्य करणारे माध्यमांचे रकानेही भरले होते. पण लोकसभा निवडणुकीच्या निकालांनी सर्वांनाच धक्का दिला आणि पवारांचे भाकीतच चुकल्यामुळे त्यांच्या भाकितावर भाष्य करणाऱ्यांचे आडाखेही चुकत गेले. असे असले तरी विरोधकांच्या मागे लागलेले प्रतिकूल राजकीय परिस्थितीचे शुक्लकाष्ठ अजूनही सरलेले नाही; भाकिताचे भय मात्र सर्वांच्या मानगुटीवर बसलेले असावे, असेच दिसत आहे. खुद्द पवारांचेच भाकीत सातत्याने चुकत गेल्याने, राजकीय भविष्याचे भय अधिक गडद झालेल्या नेत्यांपैकी एक म्हणून आता उद्धव ठाकरे स्वतःच पुढे येत असल्याचे दिसू लागले आहे. आपला पक्ष पुरता संपविण्यासाठी राजकारणात सर्वत्र कारस्थाने सुरू आहेत आणि असे झालेच तर आपण त्याचा मुकाबला करू शकतो किंवा नाही, याची त्यांना खात्री राहिलेली दिसत नाही. महाविकास आघाडीचा प्रयोग करून पाच वर्षांपूर्वी शरद पवार यांनी अनैतिक मार्गाने यशस्वी केलेला सत्तेचा प्रयोग म्हणजे ठाकरे यांच्या पक्षास राजकारणाच्या पटलावर केंद्रस्थानी आणण्याची सर्वात मोठी खेळी होती, असे त्यावेळी ज्यांना वाटले होते, त्यांचा आज पाच वर्षांनंतर पूर्ण भ्रमनिरास झाला आहे. उद्धव ठाकरे यांनाही आता आपली चूक उमगू लागली आहे. उद्धव ठाकरे हे बंद दरवाजाआडचे राजकारण करत नाहीत, असे ते स्वतःच सांगतात. काही महिन्यांपूर्वी शरद पवार यांच्या भेटीसाठी ते गेले असता, पवार यांनी त्यांना बंद दरवाजाआड सुरू असलेल्या बैठकीत सामील करून न घेता बाहेर थांबण्याची सूचना केली व ठाकरे यांनीही बाहेर थांबणेच पसंत केले, हे समाजमाध्यमांवरून फैलावलेल्या एका चित्रफितीतून महाराष्ट्रास उमगले होते. त्यामुळे आता जेव्हा आपला पक्ष संपविण्यासाठी भाजपासारखे पक्ष सरसावल्याची जाहीर भीती त्यांच्या मनात बळावत चालली आहे. भाजपाचे नेते आपला पक्ष संपविणार आहेत, असा आक्रमक कांगावा त्यांनी सुरू केला आहे. वस्तुतः शिवसेनेत पडलेल्या फुटीची नेमकी कारणे लपून राहिलेली नाहीत. शिवसेनेतील पहिल्या ऐतिहासिक फुटीपासून सुरू झालेल्या पक्ष संपण्याच्या प्रक्रियेचे नेमके मूळ उद्धव ठाकरे हे स्वतःच होते, हे इतिहासातून उघड झाले आहे. त्यांच्या नेतृत्वाशी जुळवून घेणे शक्य नसल्यामुळेच व त्यांची नेतृत्वशैली मान्य नसल्यामुळेच छगन भुजबळ, राज ठाकरे, नारायण राणे, गणेश नाईक यांच्यापासून ते एकनाथ शिंदे यांच्यासह सारे नेते पक्षातून बाहेर पडले होते, हे स्पष्ट असताना पक्ष संपविण्याच्या कारस्थानाचे खापर भाजपावर फोडत जनतेची सहानुभूती मिळविण्याचा त्यांचा केविलवाणा राजकीय प्रयत्न सुरू आहे आणि शरद पवारांसारख्या नेत्याने पक्ष वाचविण्यासाठी आपल्याला मदत करावी, अशा छुप्या अपेक्षेची किनारही आहे. पण पवार हे ठाकरे यांचा पक्ष वाचविण्यासाठी राजकारण करीत नसून आपल्या पक्षाला राज्याच्या सत्तेच्या केंद्रस्थानी राखण्याकरिता प्रयत्न करीत आहेत, हे स्पष्ट झाल्यामुळे ठाकरे अस्वस्थ आहेत.

रविवारी नागपूरमधील एका कार्यक्रमात त्यांनी धारण केलेले बेगडी उग्ररूप हा स्वतःच्या आणि गेल्या अनेक दशकांपासून सुरू असलेल्या गळतीनंतर उरलेल्या पक्षास वाचविण्याचा आक्रमक बचाव होता, हे उघड आहे. ही सत्तेची लढाई नाही असे उद्धव ठाकरे या सभेत म्हणाले, तेव्हा त्यांच्या भाषणाचा संपूर्ण रोख हा स्वपक्षाच्या बचावाचाच होता, हेही स्पष्ट झाले. आपला पक्ष संपविण्यास निघालेल्यांना शरद पवारांचा पक्षदेखील संपवायचा आहे, असा आरोप करून पक्ष बचावाच्या मोहिमेत पवार यांनाही सहभागी करून घेण्याचा त्यांचा हेतू लपून राहिलेला नाही. शरद पवार हे राजकीय चाणक्य असल्याची अनेकांची भावना आहे, तर आपण धूर्त राजकारणी आहोत, असे उद्धव ठाकरे मानतात. तसे त्यांनी बोलूनही दाखविले आहे. त्यामुळे पक्ष बचावाच्या या मोहिमेत पवारांची चाणक्य नीती वापरली जाणार की ठाकरेंचा धूर्तपणा कामी येणार, याविषयीची एक अनाम स्पर्धा त्यांनी स्वतःच उभी केलेली दिसते. काहीही झाले तरी पक्ष वाचविणे हेच त्यांच्यासमोरील आव्हान आहे, ही बाब उघड आहे. त्याचे आणखीही एक कारण आहे. लोकसभा निवडणुकीनंतर लहान-मोठे पक्ष एक तर काँग्रेसमध्ये विलीन होतील किंवा अशा पक्षांना काँग्रेसच्या झेंड्याखाली एकत्र येणे भाग पडेल, असे एक भाकीत शरद पवार यांनी लोकसभा निवडणुकीच्या निकालांआधी वर्तविले होते. ते तंतोतंत खरे ठरले नसले, तरी सध्याची विरोधकांची राजकीय परिस्थिती पाहता, अशी वेळ भविष्यात केव्हाही ओढवू शकते, याचीही जाणीव या पक्षांच्या नेत्यांना आहे आणि त्यामध्ये उद्धव ठाकरेंचा समावेश आहे. आगामी विधानसभा निवडणुका स्वबळावर लढविण्याची कोणत्याच विरोधी पक्षाची मानसिकता नाही किंवा स्वबळावरील विजयाचा या पक्षांचा इतिहासदेखील नाही. महाराष्ट्राची जनता महाविकास आघाडीतील कोणाही एका पक्षास बहुमताचा कौल देईल, अशी शक्यता नसल्याने, मतभेद असतानाही एकत्र राहणे ही अपरिहार्यता उद्धव ठाकरे यांच्यासह सर्वच नेते जाणतात. महाविकास आघाडीचा भावी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून उद्धव ठाकरे यांचे नाव पुढे रेटण्याचा त्यांच्या पाठीराख्यांचा प्रयत्न आणि त्यासाठी खुद्द ठाकरे यांनी केलेली मोर्चेबांधणी पुरती फसल्यानंतर आता सत्तेच्या गणितात महाविकास आघाडीमध्ये त्यांच्या पक्षाचे महत्त्व जेमतेम संख्याबळाच्या जुळणीपुरतेच उरले आहे, याचीही त्यांना जाणीव असावी. त्यामुळेच पक्ष बचाव मोहिमेस पुन्हा नव्याने जोर देऊन, शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस व नाना पटोलेंच्या काँग्रेससह आघाडीतील अन्य पक्षांना आपल्या मोहिमेत जोडून घेण्याची धूर्त राजकीय खेळी त्यांनी आघाडीसमोर उभी केली आहे. भाजपा ही त्यांची खरी भीती नाही तर शरद पवार हेच त्यांना स्वपक्षाच्या अस्तित्वापुढील आव्हान वाटते, ही बाब लपून राहिलेली नाही. महाविकास आघाडीसोबत असतानाही पवार यांच्यासोबत सावलीसारखे राहण्याच्या त्यांच्या राजकारणाचा अन्वयार्थ तोच असावा. कारण आघाडीत नसताना त्यांनी याच शरद पवार यांच्यावर टीकास्त्रही सोडले होते. पवार यांच्या राजकारणावर सर्वाधिक तीव्रपणे टीका करण्यात आघाडीपूर्व काळात उद्धव ठाकरे हेच अग्रेसर होते आणि पवार यांच्या राजकारणातील विश्वासार्हतेविषयी सातत्याने शंका घेणारेही तेच होते. पवार यांनी आपल्या आत्मकथनपर पुस्तकातून उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर उमटविलेली काही प्रश्नचिन्हे अजूनही ठाकरे यांच्या नजरेसमोरून दूर झालेली नाहीत. तरीही पवार यांच्यासोबत राहणे ही अपरिहार्यता ओळखूनच, तुम्ही आम्हाला संपू द्याल का, असा सवाल करून त्यांनी पवार यांचे पाठीराखेपण कायम करून घेतले असावे.

ठाकरे यांच्या राजकारणाचे एक वेगळेपण आहे. निवडणुकांच्या काळातही ते राज्याच्या किंवा देशाच्या हिताची आपल्या पक्षाची नेमकी भूमिका काय ते स्पष्ट करत नाहीत. त्याऐवजी प्रतिपक्षावर टीका करणे, हिंमत असेल तर समोर लढा अशी आव्हाने देणे ही त्यांची राजनीती आहे. जनतेला आता अशा राजनीतीमध्ये रस राहिलेला नाही आणि गेल्या १० वर्षांपासून, म्हणजे केंद्रात मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून देशात सुरू असलेल्या विकासाच्या राजनीतीची जनता साक्षीदार झाली आहे. त्यामुळे ठाकरे यांचे पक्ष बचाव रुदन त्यांना किती तारणार आणि आघाडीतील अन्य पक्ष स्वबळ वाढविण्याआधी ठाकरेंच्या पक्षास बळ देण्याकरिता किती पुढे येणार, हा प्रश्न नक्कीच कायम राहणार आहे.

## आंतरराष्ट्रीय

**वसंत गणेश काणे**

# मोदींचा ब्रुनेई आणि सिंगापूर दौरा

सुमारे सहा हजार चौ.कि.मी. क्षेत्रफळ (म्हणजे सिक्कीमपेक्षा लहान आणि गोव्यापेक्षा मोठा) आणि चार लाख लोकसंख्या असलेला ब्रुनेई दारूसलाम (पूर्ण नाव) हा एकेकाळी बौद्ध व हिंदू धर्मीयांचा देश होता. या छोट्याशा देशाचे शेजारी कंबोडिया, इंडोनेशिया, मलेशिया आणि सिंगापूर हे देश आहेत. सिरी बेगावन हे बंदराचे शहर ब्रुनेईची राजधानी असून या देशात मलय भाषा बोलली जाते. ब्रुनेई हे 'वरुण' या संस्कृत नावाचे रूपांतरित स्वरूप आहे. १९५९ मध्ये ब्रुनेईने आपल्या राज्यघटनेत इस्लामचा अधिकृत धर्म म्हणून स्वीकार केला आहे. आज या देशात ८२ टक्के मुस्लिम आहेत. फक्त ६ टक्के बौद्ध उरले आहेत. खनिज तेल आणि नैसर्गिक इंधन वायू यांच्या भरवशावर हा देश कमालीचा श्रीमंत झाला होता. ना शिक्षणासाठी खर्च, ना उपचारांसाठी वैद्यकीय खर्च, ना आयकर! अर्थात हेअर कटिंगचा खर्च मात्र होता, १६ लाख रुपये! पण केवळ खनिज तेलापासून मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून असलेल्या या देशाच्या वैभवाला आता उतरती कळा लागली आहे.

३ आणि ४ सप्टेंबर २०२४ ला मोदी यांनी ब्रुनेईचा दौरा पूर्ण केला आणि नंतर ते सिंगापूरला गेले. ब्रुनेईला भेट देणारे नरेंद्र मोदी हे पहिले भारतीय पंतप्रधान ठरले आहेत. या देशांमधील हिंदी महासागरातील भागीदारी आणि व्यापार वाढवण्यावर या दोघांत भेटीदरम्यान चर्चा झाली. चर्चेत संरक्षण आणि अवकाश (स्पेस) क्षेत्रात परस्परांना सहकार्य करण्याच्या विषयावर चर्चा झाली. टेलिमेट्री (दूर अंतरावरून प्रक्षेपित होणाऱ्या संदेशांचा अभ्यास) सॅटेलाईटचा व प्रक्षेपण केलेल्या उपग्रहाचा मागोवा घेणे याबाबत तर निश्चित कार्यपद्धती आखण्यासंदर्भातही निर्णय घेतले गेले. ब्रुनेईकडून याबाबत मिळत असलेल्या सहकार्यासंबंधी मोदींनी समाधान व्यक्त केले आहे. मोदींनी ब्रुनेईत राहात असलेल्या भारतीय वंशाच्या लोकांची नेहमीच्या रीतीप्रमाणे भेट घेतली. ब्रुनेईत राहणारे भारतीय लोक या दोन्ही देशांना जोडणाऱ्या सेतूची भूमिका पार पाडत असल्याचे पंतप्रधान मोदींनी सांगितले.

१९२० नंतर कच्च्या तेलाच्या शोधात भारतीय लोक ब्रुनेईत पोहोचले होते. जवळपास चार लाख लोकसंख्या असलेल्या या देशात आज १४ हजार भारतीय राहतात. ब्रुनेईतील शिक्षण आणि वैद्यकीय क्षेत्रातील भारतीयांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते. भारत आणि ब्रुनेईमध्ये जवळपास २५ कोटी डॉलरचा व्यापार खनिज तेलाच्या बाबतीत होतो. १९६३ मध्ये ब्रुनेईने फेडरेशन ऑफ मलेशियाचा भाग म्हणून न राहण्याचा निर्णय घेतला आणि तो मलेशियापासून वेगळा झाला. २०१४ मध्ये शरिया कायदा लागू होणारा ब्रुनेई हा आशिया खंडातील पहिला देश ठरला आहे. स्वतंत्र झाल्यापासूनच ब्रुनेईत विरोधी पक्षांना परवानगी देण्यात आलेली नाही. त्यामुळे तिथे लोकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाही, असे म्हटले तर ते चूक ठरणार नाही. त्यामुळे प्रसारमाध्यमे मोकळेपणाने बातम्या छापू शकत नाहीत किंवा वार्तांकन करू शकत नाहीत. कच्च्या तेलाच्या जोरावर ब्रुनेई हा देश संपन्न झाला होता. मात्र, आता परिस्थिती बदलते आहे. खनिज तेलाच्या व्यापारात नवीन स्पर्धक उभे राहिले आहेत. त्यामुळे तेलाच्या किमती घसरल्या. मागील काही वर्षांमध्ये ब्रुनेईला तोटा सहन करावा लागतो आहे. देशाची अर्थव्यवस्था सुस्तावली आहे, विकासाचा दर घटला आहे. ब्रुनेई सरकारच्या तोट्यातदेखील वाढ झाली आहे. आज रोजगार ही या देशातील मोठी समस्या आहे.

ब्रुनेई एसियन संघटनेचा सदस्य आहे. एसियनची स्थापना १९६७ साली थायलंडमधील बँकॉक येथे झाली होती. सुरुवातीला १) थायलंड, २) इंडोनेशिया, ३) मलेशिया, ४) फिलिपाईन्स आणि ५) सिंगापूर हे पाचच सदस्य होते. सहावा ब्रुनेई १९८४ मध्ये, सातवा व्हिएतनाम १९९५ मध्ये, आठवा लाओस १९९७ मध्ये आणि नववा म्यानमार आणि दहावा कंबोडिया १९९९ मध्ये एसियनमध्ये सामील झाले. आज असे १० देश एसियनचे सदस्य आहेत. मोदींच्या तिसऱ्या कारकीर्दीत आतापर्यंत मोदींनी चार देशांना भेटी दिल्या आहेत. त्यातले ब्रुनेई आणि सिंगापूर एसियनचे सदस्य आहेत. या दोन्ही देशांचे सामरिकदृष्ट्या भारतासाठी खूप महत्त्व आहे. याच काळात व्हिएतनाम आणि मलेशिया यांचे नेतेही भारताला भेट देऊन गेले आहेत. या सर्वांना दक्षिण चिनी समुद्रातील चीनच्या वाढत्या हस्तक्षेपाचा त्रास होतो आहे. चिनी विस्तारवाद आणि दंडेली यामुळे हे आणि असे अन्य देश त्रस्त झाले आहेत. साहजिकच एक मोठा आणि शक्तिशाली देश म्हणून हे देश भारताकडे मोठ्या अपेक्षेने पाहत आहेत. या दृष्टीने विचार करता भारतावर दुहेरी जबाबदारी आली आहे. एक म्हणजे स्वत:च्या हितसंबंधांची जपणूक करणे आणि दुसरे म्हणजे इंडो-पॅसिफिक विभागातील व्यापारी जा-ये सुरक्षित राहील, याकडे लक्ष पुरविणे. ही जबाबदारी मोदींनी उत्तमरीतीने पार पाडली आहे. पण मोदींनी कोणत्याही मुस्लिम देशाला भेट दिली, काही करारमदार केले की, पाकिस्तानचा तीळपापड होत असतो. आता हे देश काश्मीरप्रश्नी आपल्यापासून दूर जाणार या शंकेने पाकिस्तान अस्वस्थ होत असतो.

ही मोदींची ब्रुनेई दारूसलामला पहिलीच भेट होती तर सिंगापूला ही पाचवी भेट होती. या भेटीमागे पूर्वेकडील देशांशी संपर्क वाढवा, हा उद्देश होता. इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील चिनी सरकारचा वाढता उपद्रव हा तर महत्त्वाचा मुद्दा होताच; त्याचबरोबर दुसरा व्यापारविषयक मुद्दाही काही कमी महत्त्वाचा नव्हता म्हणून व्यापार, संरक्षण, अवकाश हे या दोघांनी निवडलेले विषय महत्त्वाचे ठरतात.

सिंगापूरमध्ये सेमीकंडक्टर, आरोग्य आणि कौशल्य विकास हे अतिशय महत्त्वाचे मुद्दे चर्चेत हाताळले गेले, हे विशेष म्हटले पाहिजे. म्हणून भारत आणि सिंगापूर यातील सेमीकंडक्टर इको सिस्टिम पार्टनरशिप, विशेष उपयोगाची आहे. आता एकूण एक प्रकारची चिप तयार करण्याची क्षमता भारतात निर्माण व्हावी या प्रयत्नाला बळ मिळेल. कोविड काळात चीनच्या कावेबाजपणामुळे जगभर चिपचा तुटवडा निर्माण झाला होता. शिवाय जगातील मोजक्या देशातच चिप निर्मिती तंत्रज्ञान पूर्णत्वापर्यंत विकास पावले आहे. सिंगापूरचे व्यापारजगत भारतात लवकरच एकूण पाच लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याच्या विचारात आहे.दहशतवादाचे कोणत्याही निमित्ताने समर्थन करता येणार नाही, अशी अतिस्पष्ट भूमिका सिंगापूरचे नव्याने निवडून आलेले पंतप्रधान लॉरेन्स वोंग यांनी जाहीरपणे मांडली आहे. शांतता आणि स्थैर्य हवे असणाऱ्यांनी ही भूमिका संयुक्त राष्ट्र संघाच्या नेतृत्वात घेतली पाहिजे, यावर भारत आणि सिंगापूर यांचे एकमत झाले. यासाठी या नेत्यांनी कॉम्प्रिहेन्सिव्ह कनव्हेन्शन ऑन इंटरनॅशनल टेररिझम आयोजित करून उपाययोजना करावी, असे सुचविले आहे. भारत आणि सिंगापूर हे देश संयुक्त राष्ट्र संघटना, जागतिक आरोग्य संघटना आणि इंडियन ओशन रिम असोसिएशन यात काम करीत असताना सहकार्य आणि शाश्वत विकास यावर भर देतील, असा निश्चय या देशांनी व्यक्त केला आहे. यासाठी ते असोसिएशनचे २३ सदस्य आणि ९ डायलॉग पार्टनर्स यांच्यासोबत एकजुटीने प्रयत्न करतील, असेही ठरले आहे.

९४२२८०४४३०

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# फडणवीसांचा झंझावात अन् विरोधकांची हतबलता

राज्यामध्ये विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला असून, युती सरकारच्या धडाकेबाज निर्णयाने विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. आगामी काळात देवेंद्र फडणवीसांना कसे थोपवायचे, या एका प्रश्नाने विरोधकांची झोप उडाली आहे. अभद्र आघाडी आणि युती या दोघांमधील फरक जनतेला लक्षात आल्याने त्यांची पंचाईत झाली आहे. देवेंद्र फडणवीस नावाचा हा झंझावात राज्यामध्ये आपल्याला एवढा भारी पडेल, याची विरोधकांनी झोपेतही कल्पना केली नसेल. प्रत्यक्षात ज्यावेळी या झंझावाताशी विरोधकांचा सामना झाला त्यावेळी अराजकतेचे त्यांचे सर्व मनसुबे धुळीस मिळाले. त्यानंतर राज्याला अस्थिर करण्याचा विरोधकांचा डाव युती सरकारने त्यांच्यावरच परतवून देवेंद्र फडणवीसांनी धमाल केली. उद्धव ठाकरे यांनी भाजपाच्या पाठीत खंजीर खुपसून अडीच वर्षे राज्याची धुरा आपल्या हाती घेतली होती. मात्र, औटघटकेचे हे फेसबुक लाईव्ह



सरकार आपला कार्यकाळ पूर्ण करू शकले नाही. याउलट राज्यामध्ये अडीच वर्षांनंतर सत्तांतर झाल्यावर युती शासनाने लावलेला कामाचा धडाका डोळे दीपविणारा आहे. राज्यामधील जी कामे पाच वर्षांच्या कार्यकाळात पूर्ण होऊ शकली नसती, ती कामे देवेंद्र फडणवीस यांनी अवघ्या अडीच वर्षांत पूर्ण करून दाखविली. दिलेल्या वचनाची पूर्तता आणि आपल्या धडाकेबाज कामगिरीमुळे राज्यामध्ये आजमितीस तरी देवेंद्र फडणवीस यांच्या उंचीचा दुसरा नेता राज्यामध्ये नाही, ही वस्तुस्थिती आहे. राज्यामधील रस्ते, महामार्ग, उड्डाणपूल, मेट्रो, बोगदे, वाढवण बंदर, नवे विमानतळ अशी कितीतरी दळणवळणाची साधने राज्यामध्ये देवेंद्र फडणवीसांच्या दूरदर्शी आणि जलद निर्णय क्षमतेमुळे महाराष्ट्रामध्ये तयार होत आहे. भारतामधील एकूण परकीय गुंतवणुकीपैकी ५३ टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्र राज्याने खेचून आणली. देशामधील सर्व राज्यांतील एकूण गुंतवणकीपेक्षाही ही गुंतवणूक ३ टक्के अधिक आहे. राज्यातील ग्रामीण भाग प्रमुख केंद्राशी जोडणे, नवीन नगरांची निर्मिती, बेरोजगारीशी लढण्यासाठी विविध प्रकारच्या उत्पन्नाची साधने निर्माण करणे, गावागावांमध्ये आधुनिक सेवा, रोजगार निर्मितीला प्रथम प्राधान्य असे अनेक लोकाभिमुख कार्यक्रम फडणवीस यांनी पूर्ण करून विकासाची परिभाषा राज्यामध्ये प्रत्यक्षात उतरविली आहे. यासाठी लागणाऱ्या वीज आणि पाणी या सुविधा पुरविण्याचा आटोकाट प्रयत्न युती सरकार करीत आहे. शेतीसाठी लागणारा सर्व वीजपुरवठा महाराष्ट्रामध्ये पूर्णपणे सौर ऊर्जेवर केला जाणार आहे. त्यामुळे विजेचा अनुशेष पूर्णपणे भरून निघणार असून, त्यानंतर कायमस्वरूपी प्रचलित किमतीपेक्षाही कमी दराने विक्रीयोग्य वीज उपलब्ध होणार आहे. भविष्यामध्ये ही वीज उद्योगांना पुरविली जाणार आहे. या एकमेव कारणाने भविष्यात अनेक उद्योग महाराष्ट्रात येतील, अशी अपेक्षा आहे. गेल्या अडीच वर्षांतच राज्यात हजारो नव्या रोजगारांच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. जवळपास पाच लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आली आहे. युती सरकारची ही घोडदौड डोळे दीपविणारी असून, अभद्र आघाडी त्यामध्ये खोडा घालण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहे. २०१९ मध्ये राज्यात भाजपा बहुमतात असतानाही भाजपाला सत्तेबाहेर ठेवण्याचा डाव शरद पवारांनी आखला आणि उद्धव ठाकरे त्यामध्ये अलगद अडकले. त्यामुळे अखेरच्या घटका मोजणाऱ्या काँग्रेसलाही जीवदान मिळाले, हा इतिहास आहे. त्यांच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळामध्ये महाराष्ट्राची अस्मिता रसातळाला गेली. युवक बेरोजगार राहू लागले, शेतकरी आणि कष्टकऱ्यांचा कोणीही वाली राहिला नाही. राज्यातील जनता आघाडी सरकारला कंटाळली होती. त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या सहकार्याने राज्यामध्ये युती सरकार पुन्हा एकदा आरूढ झाले. नेमकी हीच सल विरोधकांना अजूनही बोचत आहे. एकटा देवेंद्र काय करू शकतो, अशा फुशारक्या मारणारे आता मात्र या वादळासमोर आपल्या अस्तित्वाच्या लढाईसाठी लढत आहेत.

९८८१७१७८५६

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# स्त्री शक्तीच्या सामर्थ्याची कंपन्यांना मोहिनी

आजकाल महिला पुरुषांच्या खाद्यांला खांदा लावून काम करतात. स्त्री शक्तीच्या सामर्थ्याचे पूजन करण्याचा सण म्हणजेच नवरात्र अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपला आहे. स्त्रियांना त्यांच्यातील सामर्थ्याची जाणीव झाली असून, त्या आता बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या व्यवस्थापनाची धुराही समर्थपणे सांभाळत आहेत. कंपनीतील प्रत्येक विभागात आज महिलांचा समावेश अधिक करण्यासाठी कंपन्या प्रयत्नशील आहेत.

कंपनी व्यवस्थापन क्षेत्रात महिलांची अधिक प्रमाणात निवड करून आपल्या कर्मचाऱ्यांमध्ये महिला कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याचे आव्हान आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वच कंपनी व्यवस्थापनांपुढे उभे आहे. या पृष्ठभूमीवर भारतातील कंपन्यांनी गेल्या काही वर्षांत विशेष प्रयत्न केले आहेत. या संदर्भात नव्यानेच प्रकाशित झालेल्या संशोधन अभ्यासानुसार, भारतीय व्यवस्थापन कंपन्यांपैकी सुमारे ६३ टक्के कंपन्या कर्मचाऱ्यांची निवड करताना, महिला उमेदवारांना धोरणात्मक स्वरूपात प्राधान्य देण्यावर भर देतात. सुमारे पाच वर्षांपूर्वी हे प्रमाण ४१ टक्क्यांवर होते.

राजधानी दिल्लीतील वुईएस या कर्मचाऱ्यांचा कौशल्य विकास, प्रशिक्षण-मार्गदर्शन क्षेत्रात विशेष स्वरूपात काम करणाऱ्या व्यवस्थापन सल्लागार कंपनीने केलेल्या अभ्यासावर आधारित अहवाल प्रकाशित झाला आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत देशातील उद्योग-व्यवसायांतील अधिकांश म्हणजे, ६३ टक्के कंपन्या, आपल्या कर्मचाऱ्यांमध्ये महिला कर्मचाऱ्यांची संख्या वाढण्यासाठी व त्यांनी अधिक जबाबदारीच्या पदांवर काम करण्याची संधी देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. याच संशोधनात सहभागी झालेल्या ८६ टक्के कंपन्यांनी त्यांच्या भविष्यकालीन गरजा लक्षात घेता, महिला-कर्मचाऱ्यांमध्ये व्यवस्थापकीय गुण व नेतृत्व विकासासाठी विशेष प्रशिक्षणासारखे प्रयत्न सुरू केले आहेत, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे.

आज एकीकडे प्रगत तंत्रज्ञान-संशोधन व प्रक्रियेचा अवलंब करण्यावर कंपन्यांचा भर असतानाच नव्या बदल प्रक्रियेमध्ये महिला कर्मचारी व व्यवस्थापकांना अधिकाधिक प्रमाणात सामावून घेण्यावर कंपन्यांचा भर दिसून येतो. या क्षेत्रांत महिलाही पुरुषांच्या बरोबरीने पुढाकार घेत असून, उत्पादन क्षेत्रापासून अनुसंशोधन क्षेत्रापर्यंत महिला उमेदवार सहज उपलब्ध होतात. ही बाब व्यवस्थापक आणि व्यवस्थापन क्षेत्रात सकारात्मक परिणामांसह दिसून येते.

याचाच परिणाम म्हणून प्रमुख कंपन्यांच्या मुख्याधिकाऱ्यांसाठी महिला कर्मचाऱ्यांच्या निवडीच्या संदर्भात मार्गदर्शक तत्त्व प्रसारित-प्रचारित करण्यात येतात. सर्वेक्षणात नमूद केल्याप्रमाणे महिला कर्मचाऱ्यांची निवड आणि विकास या मुद्यावर कंपनी स्तरांवर व कंपनी अंतर्गत अनुभवांवर आधारित मार्गदर्शनपर सत्रांचे आयोजन करण्यात येते. अशा सत्रांचासुद्धा सकारात्मक परिणाम दिसून येतो आहे, असे मत वुईएसच्या सहसंस्थापक अनुरंजिता कुमार यांनी व्यक्त केले आहे.

सर्वेक्षणात नमूद केल्यानुसार, आज व्यवस्थापन पद्धती स्वरूपात महिला कर्मचाऱ्यांच्या समावेशकतेचा स्वीकार करण्यात आला आहे. सर्वेक्षणाला प्रतिसाद देणाऱ्या सुमारे ५१ टक्के कंपनी-व्यवस्थापनांनी, आपल्या व्यवस्थापन स्तरावरील एक प्रमुख व्यावसायिक उद्दिष्ट म्हणून कर्मचाऱ्यांमध्ये विविध स्तरांवर महिलांच्या संख्यावाढीला प्रोत्साहन देणे, कर्मचारी निवडीच्या संदर्भात स्त्री-पुरुष उमेदवारांमध्ये भेदभाव न करणे, कामाच्या ठिकाणी समावेशकता या मुद्यांचा समावेश केला आहे. या नव्या वैचारिक कार्यशैलीचा कंपनीच्या सर्व स्तरांवर प्रसार-प्रचार करण्यासाठी, अधिकांश कंपन्या या व्यवस्थापक व व्यवस्थापन स्तरावर विशेष संवादसत्र व प्रशिक्षणाचे आयोजन करीत आहेत.

त्याचसोबत कंपनी अंतर्गत महिला कर्मचाऱ्यांनी अधिक मोठी, अधिकार व जबाबदारीची कामे करण्यासाठी, प्रशिक्षित व अनुभवी महिला कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण दिले जात आहे. या विशेष प्रशिक्षण सत्रांमध्ये व्यवस्थापन शैली, व्यवसायवृद्धी, प्रभावशाली संवाद, निर्णयक्षमता, नेतृत्व विकास, परस्पर संबंध इत्यादींचा समावेश केला जातो. या प्रशिक्षणाचा महिला कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाठी उपयोग होतो, असा अनुभव आहे. एकीकडे नव्याने कर्मचाऱ्यांची निवड करताना, महिला उमेदवारांचा त्यांच्या कौशल्य व गुणवत्ता आणि योग्यतेच्या आधारेही विचार केला जातो. हे करत असतानाच आज वाढत्या संख्येत कंपनी-व्यवस्थापनांद्वारा महिला कर्मचाऱ्यांच्या संदर्भात विविधता, समानता व समावेशकता या व्यवस्थापन त्रिसूत्रीचा अवलंब केला जात आहे. या प्रयत्नांना अधिक गतिमान करण्यासाठी सुमारे पाच वर्षांपूर्वी ३४ टक्के कंपन्या प्रयत्नशील होत्या; आज हे प्रमाण सुमारे ५१ टक्क्यांवर गेले आहे. यावरून या विषयातील व्यवस्थापनांद्वारा घेतलेले गांभीर्य सहजपणे लक्षात येते.

महिला कर्मचाऱ्यांच्या संदर्भात प्रामुख्याने नमूद करण्यासारखी बाब म्हणजे, सध्या डीबीएस बँक अंतर्गत जागतिक स्तरावर महिला कर्मचाऱ्यांची टक्केवारी ५० असून, त्यापैकी उच्च व्यवस्थापन श्रेणीतील महिला व्यवस्थापकांचे प्रमाण सुमारे ४० टक्के आहे हे विशेष. बँकेच्या व्यवस्थापनाच्या निर्णयानुसार, भारतात सध्या डीबीएस बँकेत महिला कर्मचाऱ्यांचे प्रमाण सुमारे ३० टक्के असून आगामी तीन वर्षांत महिलांची टक्केवारी ३५ वर नेण्यासाठी योजनाबद्ध प्रयत्न सुरू आहेत. या प्रयत्नांच्या पूर्ततेसाठी बँकेतर्फे एका उच्चस्तरीय कार्यकारी समितीची स्थापना केली असून, या उच्चस्तरीय समितीतर्फे यासंदर्भात विशिष्ट कालावधीनंतर आढावा घेतला जातो. बँकेचे व्यवस्थापकीय संचालक व मानव-संसाधन विभाग प्रमुख किशोर पोदुरी यांच्यानुसार, त्यांच्या या प्रयत्नांचे सकारात्मक परिणाम बँकेच्या व्यवस्थापनापासून व्यवसायापर्यंत सर्वदूर दिसू लागले आहेत.

अशाच प्रकारचे प्रयत्न आणि उपक्रम डीसीएम-श्रीराम उद्योग समूहांतर्गत केले जात आहेत. कंपनीने नव्या कर्मचाऱ्यांची निवड करताना विशिष्ट धोरणात्मक निर्णय घेत नव्या-जुन्या महिला कर्मचाऱ्यांचा प्रशिक्षणाद्वारे विकास करण्यासाठी विशेष उपक्रम हाती घेतले आहेत. या संदर्भात आपला अनुभव नमूद करताना डीसीएम-श्रीरामचे व्यवस्थापकीय संचालक संदीप गिरोत्रा यांनी म्हटले आहे की, महिलांच्या संदर्भातील धोरणांची निश्चिती करण्यापासून त्याच्या अंमलबजावणीच्या कामापर्यंतची जबाबदारी, उच्च व्यवस्थापनावर सुरुवातीपासूनच ठेवण्यात आली आहे. त्याचा परिणाम अल्पावधीत व स्पष्टपणे दिसून येत आहे. याबाबत आपापला व्यवसाय, त्याचे स्वरूप व गरजांच्या प्राधान्यांसह प्रयत्न केले जात आहेत. यातून कर्मचाऱ्यांचे प्रमाण व त्यांच्या कामकाजाचा समतोल राखण्यात या कंपन्यांना यश येत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### नवरात्री : स्त्री शक्तीचा जागर

३ ऑक्टोबरपासून नवरात्रीला सुरुवात होत आहे. त्यानिमित्ताने समाज माध्यमातून नऊ दिवसांच्या नऊ रंगांचे संदेश फिरायला सुरुवात होईल; पण कोणाच्याही मनात असा विचार कसा येत नाही की, या सर्व प्रकाराला सुरुवात होऊन तर केवळ सात-आठ वर्षेच झाली. यापूर्वी देवीला प्रसन्न करण्यासाठी उपाय नव्हते का? मुळात नऊ दिवसांच्या नऊ रंगांचे खूळ ही एक व्यावसायिक संकल्पना म्हणून अंमलात आणली गेली आणि त्याला देवीशी पद्धतशीरपणे जोडण्यात आले. त्यामुळे आपण भारतीय स्त्रिया काही विचार न करता या प्रकारात ओढल्या गेलो. अनेक स्त्रिया त्या त्या दिवसानुसार रंग घालताना आढळून येतात. यामुळे झाले काय तर विविध कपडे, साड्या, घागरे, त्याला शोभेसे अलंकार याच्या व्यापाराला चालना मिळाली. काही ठिकाणी तर मुली केवळ रंगाच्या मागे लागल्या. त्यातून तोकडे वस्त्र परिधान करणे, अमली पदार्थांचे सेवन करणे सुरू झाले. अशा वागणुकीमुळे हिंदू धर्माचेच नाव बदनाम होते. त्याचबरोबर नवरात्रीकडे एक इव्हेंट म्हणून पाहण्याचा कल वाढलेला आहे. त्यामध्ये गावाच्या



लांब कोठेतरी एखादे सभागृह किंवा मैदानावर गरबाच्या नावाखाली शुल्क आकारून वाटेल तसे नाच-गाणी वगैरे कार्यक्रम होतात. तेथील वातावरण सात्त्विकतेपेक्षा रज-तमात्मक असते. त्यात हौसे, नवसे आणि इतर धर्मीय त्याचा गैरफायदा घेऊ शकतात. हा भक्तीचा प्रकार नक्कीच होऊ शकत नाही. नवरात्रीचे नऊ दिवस हे स्त्रीमधील देवी तत्त्व जागृत करण्याचे दिवस असतात. नामजपाच्या माध्यमातून देवीची पूजाअर्चा करून आपण देवीची उपासना करू शकतो. नवरात्रीच्या निमित्ताने स्वतःचे रक्षण त्याचबरोबर समाजातील इतर शोषित स्त्रियांचे रक्षण करण्यास मी कटिबद्ध राहीन, अशी प्रतिज्ञा प्रत्येक स्त्रीने केली तर ते खऱ्या अर्थाने देवीपूजन होईल.

**वैशाली महेश परांजपे**/नागपूर

### आर्थिक स्थितीवर आधारित आरक्षण

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जेव्हा जातीवर आधारित आरक्षण प्रस्तावित केले, ते फक्त दहा वर्षांकरिताच होते. नंतर स्वार्थी राजकारणी, गठ्ठा मते मिळवायला, ती मुदत वाढवत गेले, ते आजगायत. राजकारण्यांच्या या स्वार्थी वृत्तीमुळे देशाचे अपरिमित नुकसान झाले आहे. निरनिराळ्या जातींमुळे आपसातील हेवेदावे, भांडणे, रागद्वेष वाढीस लागले व देशाच्या ऐक्यास तडा गेला. आता हे नुकसान भरून निघणे कठीण होऊन बसले आहे. यावर एकच तोडगा आहे. जातीवर आधारित आरक्षण हटवून ते आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गास देणे. याला विरोध सहसा होणार नाही. कारण यामुळे १०० टक्के गरजू लोक कव्हर होतात. तथाकथित मागासवर्गीयांतील सधन लोक यांस विरोध करतील, पण तो विरोध जास्त काळ टिकणार नाही. आर्थिक स्थितीवर आधारित आरक्षण हे १०० टक्के वैज्ञानिक आहे, म्हणून ते योग्य विचारांनी अंमलात आणावे, अशी विनंती आहे.

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

### ताणविरहित आयुष्य जगावे

आयुष्य म्हटल्यानंतर प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये कौटुंबिक जबाबदाऱ्या, अपयश, नैराश्य, दुःख, पोटापाण्यासाठी रोजची असणारी धावपळ असतेच. यामुळे मानसिक ताण येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी पण या सर्व गोष्टी बाजूला ठेवून मानसिक समाधान प्रत्येकाने शोधले पाहिजे. छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधून त्याचा परिपूर्ण फायदा घेऊन तो इतरांना पण वाटत आला पाहिजे. तरच तुमचे आयुष्य आरोग्यदायी, निरामय आणि महत्त्वाचे म्हणजे निरोगी होईल. त्याचप्रमाणे ताण हा आधुनिक आयुष्याचा भाग बनत चालला आहे. जीवनशैलीतील बदल, आधुनिक तंत्रज्ञानाचा वाढलेला वापर, कामाच्या वाढलेल्या अपेक्षा आणि सामाजिक दबाव यामुळे तणावाचा स्तर अधिकाधिक गंभीर होत चालला आहे. त्यामुळे आपल्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर परिणाम होत आहे. मानसिकदृष्ट्या तणाव वाढल्यानं चिंता, नैराश्य आणि स्वतःमधील आत्मविश्वास कमी होतो. महत्त्वाचे म्हणजे कोणताही चांगला किंवा योग्य निर्णय घेण्यास कठीण होत जातं. त्याचा आपल्या वैयक्तिक आयुष्यावर आणि व्यावसायिक नातेसंबंधांवरही परिणाम होतो व आपल्या जीवनाचे गणित बिघडत जाते. त्यामुळे आपल्या जीवनामध्ये कितीही ताणतणाव असला, तरी प्रत्येक व्यक्तीने ताणविरहित आयुष्य जगले पाहिजे किंवा त्यांना जगता आले पाहिजे. तरच तुम्ही तुमच्या जीवनामध्ये या तणावाला शत्रू न बनवता मित्र बनविण्याची ताकद निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.

**प्रा. सचिन जाधव**/८४२५००३१२७

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## निधन वृत्त

### अरूण कुलकर्णी



**सोलापूर. दि. ३० सप्टेंबर -**
सोलापूर शहर पोलिस दलातून पोलिस उपनिरीक्षक म्हणून सेवानिवृत्त झालेले व राजस्व नगर येथील अरुण उर्फ काकासाहेब कुलकर्णी (वय ६६) यांचे दीर्घ आजाराने सोमवारी पहाटेच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, बहिण, पत्नी, मुलगा, २ मुली, २ जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर मोदी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करणयात आले.

### दत्तात्रय वाघमारे



**बार्शी, दि. ३० सप्टेंबर -**
येथील सेवानिवृत्त सपोनि दत्तात्रय देविदास वाघमारे (वय ६१) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांनी केगांव पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर ग्रामीण पोलीस दल, धाराशिव पोलीस दल या ठिकाणी सेवा बजावली. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, भावजय, मुलगा, दोन मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सोलापूर पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोहेकॉ पांडरंग वाघमारे यांचे ते बंधू होत.

### अलका दोशी



**माढा, दि. ३० सप्टेंबर -**
अलका रविंद्र दोशी यांचे अल्पशा आजाराने रविवारी उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्यावर सोमवारी सकाळी माढेश्वरी मंदिर येथील हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सुना, नातवंड असा परिवार आहे. माढ्यातील डॉ. पंकज जोशी व राजेश दोशी यांच्या त्या मातोश्री होत.

# बस स्टॅन्डवर महिला प्रवाशांचे दागिने चोरणाऱ्या महिलेस अटक

- **तीन गुन्हे उघडकीस ४० ग्रॅमचे सोन्याचे दागिने जप्त**
- **स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई**



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर -**
सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी बस स्टॅन्डवर महिला प्रवाशांचे सोन्याचे दागिने चोरणाऱ्या महिलेस अटक करून तिच्याकडून ३ गुन्हे उघडकीस आणले. या कारवाईत पोलिसांनी १ लाख ८० हजार रुपये किंमतीचे ४० ग्रॅमचे सोन्याचे दागिने जप्त केले आहेत.

उषा अशोक सांगळे (वय ३५, रा. सोनारी, ता. परांडा, जि. उस्मानाबाद) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. तिच्याकडून कुर्डूवाडी पोलिस ठाण्यातील दोन व अकलूज पोलिस ठाण्यातील १ गुन्हा उघडकीस आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळालेल्या महितीवरून पोलिसांनी कुर्डूवाडी बस स्थानकावर संशयित महिला उषा सांगळे हिला ताब्यात घेऊन तिच्याकडे चौकशी केली. त्यावेळी तिने विविध बस स्टॅन्डवर गर्दीमध्ये बसमध्ये चढणाऱ्या महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी तिच्याकडून कुर्डूवाडी पोलिस ठाण्यातील दोन आणि अकलूज पोलिस ठाण्यातील १ गुन्ह्यातील चोरलेले सोन्याचे दागिने जप्त केले. तिला कुर्डूवाडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलिस अधिक्षक प्रितम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरीक्षक नागनाथ खुणे, पोलिस उपनिरीक्षक ख्वाजा मुजावर, सहायक फौजदार नारायण गोलेकर, निलकंठ जाधवर, हवालदार आबासाहेब मुंडे, धनाजी गाडे, महिला पोलिस हवालदार मोहिनी भांगे, पोलिस शिपाई सागर ढोरे-पाटील, अक्षय डोंगरे, समीर शेख यांनी केली.




# माहिती अधिकार कायद्याचे पालन करावे : डॉ. सुधीर ठोंबरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**
माहिती अधिकार कायदा अधिनियम २००५ अन्वये नागरिकांना आवश्यक असणारी माहिती देणे बंधनकारक असून त्याचे पालन सर्वांनी करावे असे आवाहन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. सुधीर ठोंबरे यांनी केले.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा येथे माहिती अधिकार संदर्भात आयोजित चर्चासत्रमध्ये डॉ. ठोंबरे बोलत होते. यावेळी सहाय्यक प्रकल्प अधिकारी रतिलाल साळुंखे, जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, अधिक्षक सीमा लोखंडे, विस्तार अधिकारी प्रणोती सराफ आदी उपस्थित होते. डॉ. ठोंबरे यांनी माहिती अधिकार याविषयी मार्गदर्शन करताना माहिती अधिकार म्हणजे कोणत्याही शासकीय निमशासकीय अनुदानित कार्यालयाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेली व या नियमानुसार मिळवता येण्याजोगी माहिती तसेच आवश्यक अशी माहिती जाणून घेणे, त्याची कागदपत्रे मिळवणे हा प्रत्येक नागरिकाचा हक्क असून तो मूलभूत अधिकार आहे त्यामुळे माहिती अधिकारासाठी एखाद्या नागरिकाने मागणी केली असता ती अगदी विहित वेळेत कुठल्याही प्रकारची तसदी न बाळगता अचूक माहिती पुरवणे संबंधित अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे तसेच त्यांनी माहिती अधिकाराचे नियम, फायदे तोटेबाबत मार्गदर्शन केले.

# करमाळ्यातील खातगाव येथे ६० ब्रास वाळू जप्त

- **एप्रिल ते आजतागायत ८१ कोटींची रक्कम तर ३२ वाहनेही जप्त**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**
गौण खनिजाच्या अवैध वाहतूक, उत्खनन व साठ्याच्या प्रकरणांत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४८(७) नुसार गौण खनिजाच्या बाजार मुल्याच्या पाच पटापर्यंत दंडाच्या रकमेची परिगणना करून नियमानुसार स्वामित्वधन व दंडाची रक्कम वसुल करण्याची, तसेच कलम ४८(८) नुसार अवैध उत्खननाकरीता वापरण्यात आलेली यंत्रसामुग्री व वाहतुकीकरीता वापरण्यात आलेली वाहने जप्त तरतूद आहे.

दरम्यान, जिल्ह्यात अवैध गौण खनिजाच्या विविध प्रकरणांत एप्रिल २०२४ ते ऑगस्ट २०२४ अखेर पर्यंत केलेल्या कारवाईमध्ये अवैध वाहतूक व उत्खननच्या आढळून आलेल्या एकुण प्रकरणे १७९ आहेत. या सर्व प्रकरणांत एकुण रक्कम रुपये ८१.६२ कोटी दंड आकारण्यात आलेला आहे.

यानुसार सोलापूर जिल्ह्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन, वाहतूक व साठा प्रकरणांत कारवाई करण्याचे अनुषंगाने जिल्हा स्तरावर व तहसिल स्तरावरून पथक गठित करण्यात आले आहेत. दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी मौजे खतगाव क्र.०२ ता. करमाळा येथे अवैध वाळू उत्खनन चालू असल्याचे प्राप्त गोपनीय माहितीवरून त्या ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमध्ये साधारण ६० ब्रास वाळू साठा जप्त करणेत आला आहे. संबंधित अवैध वाळू उत्खनन करून साठा करण्यावर तहसिलदार करमाळा यांचेस्तरवरून दंडात्मक कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली आहे. ही कारवाई जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे मार्गदर्शनानुसार जिल्हास्तरीय गठित करण्यात आलेले उपविभागीय अधिकारी माळशिरस यांच्या अधिनस्त पथकामार्फत करण्यात आली आहे, असे उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर यांनी सांगितले.

जिल्ह्यात अवैध गौण खनिजाच्या विविध प्रकरणांत एप्रिल २०२४ ते ऑगस्ट २०२४ अखेर पर्यंत केलेल्या कारवाईमध्ये अवैध वाहतूक व उत्खननच्या आढळून आलेल्या एकुण प्रकरणे १७९ आहेत. या सर्व प्रकरणांत एकुण रक्कम रुपये ८१.६२ कोटी दंड आकारण्यात आलेले आहेत. ही दंडात्मक कारवाई व्यतिरिक्त फौजदारी कारवाईमध्ये वरील नमुद कालावधीत एकुण ३७ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या विविध प्रणांत वापर करण्यात आलेले एकुण ३२ वाहने इतर ६ यंत्रसामग्री जप्त करण्यात आले आहेत, अशी माहिती उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर यांनी दिली.

# मार्कंडेय रुग्णालयाची वार्षिक सभा खेळीमेळीत




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**
येथील श्री मार्कंडेय रुग्णालयाची ५८वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत पार पडली.

उपस्थित सभासदांचे चेअरमन डॉ. विजयकुमार अरकाल यांनी स्वागत केले. सभेचे कामकाज सुरु करण्यापूर्वी अहवाल सालात निधन झालेल्या सभासद व इतर मान्यवरांस श्रद्धांजली वाहण्यात आली. सभेपुढे संस्थेचे प्रशासकीय अधिकारी स्वामी आकेन यांनी मागील सभेचे वृतांत वाचून दाखविले. मागील सभेमध्ये संभासदांकडून केलेल्या सूचनांची पूर्तता केल्याचे तसेच अहवाल सालात सुधारण केल्याचे चेअरमन डॉ. अरकाल यांनी सांगितले.

रुग्णालयाची नवीन इमारत व एम. आर. आय. मशिनबद्दल प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली साहेव, चेअरमन डॉ. अरकाल, व्हा. चेअरमन रमेश विडप व सर्व संचालक मंडळाचे काशिनाथ गड्डम यांनी अभिनंदन ठराव मंडला. त्यास तिरुपती विडप यांनी अनुमोदन दिले. तसेच हरिदास पोटाबत्ती, लक्ष्मण चिंताकिंदी, जनार्दन कारमपुरी, किसन श्रीराम, व्यंकटेश दौंता, अशोक इंदापुरे, प्रा. श्रीनिवास कोंडी, सिद्राम कोनापुरे, रमेश कैरमकोंडा, नरसिंग येमूल, अरविंद कोंडा, अमित श्रीराम, अशोक येमूल इ. यांनी रुग्णालयातील कामकाजाबाबत अहवाल व ताळेबंद संबंधी काही प्रश्न उपस्थित केले असता त्यांना रुग्णालयाचे चेअरमन डॉ. अरकाल व संचालक डॉ. माणिक गुर्रम यांनी सविस्तर माहिती दिली.

यावेळी सभेपुढील विषय क्र. ११ पोटनियम दुरुस्तबाबत प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली यांनी सविस्तर माहिती दिली की, पूर्वी प्रमाणे म्हणजेच चेअरमनपद डॉ. संचालक कायम स्वरुपात राहील त्यामध्ये कोणतेच बदल होणार नाहीत. त्यामुळे पोटनियमात बदल करू नये, असे उपस्थित सर्व सभासदांना सांगितले.

वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडले. अजेंडवरील विषयांस उपस्थित सर्वसभासदांच्या एक मताने मंजुरी देण्यात आले.

यावेळी रुग्णालयाचे सर्वश्री डॉ. सुदीप संभारम, श्रीनिवास कमटम, अशोक आडम, मनोहर अन्नलदास, विनायक कोंड्याल, पार्वतय्या श्रीराम, राजेशम येमूल, इरेशम कोंपेल्ली, सुरेश फलमारी, सुधाकर गुंडेली, आनंद चंदनशिवे, माधवी चिटयाल, तज्ञ संचालक डॉ. भारत मुळे, श्रीधर बोल्ली तसेच डॉ. रामकृष्ण गुत्तीकोंडा, सभासद अंबाजी गुर्रम, यल्लादास गज्जम, मुरलीधर अरकाल, मनोहर विडप, यलप्पा येलदी, अशोक जैन, मल्लिकार्जुन कमटम, रामचंद्र जन्नू, श्रीनिवास विडप, महाकाळ येलदी, ॲडव्होकेट प्रकाश जन्नू, ॲडव्होकेट श्रीनिवास क्यातम, सी. ए. लक्ष्मीनारायन शेराल, ऑडीटर अंबादास पासकंटी तसेच रुग्णालयाचे डॉक्टर सभासद, वैयक्तिक सभासद व संस्था सभासद उपस्थित होते.

शेवटी रुग्णालयाचे व्हा. चेअरमन रमेश विडप, यांनी सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानून वार्षिक सर्व साधारण सभा समाप्त झाल्याचे सांगितले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील लोकांना आमच्या अशिलानी दिलेल्या माहिती व कागदपत्रावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील **पेठ-शास्त्रीनगर नगर अ झोपडपट्टी** या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील **झोपडी घर नं.९७०** ही मिळकत घरजागा आमचे अशिल **१) श्रीमती राजव्वा सुभाष वड्डेपल्ली, २) श्रीमती नागमणी प्रकाश पुल्ली** यांची आई कै. लक्ष्मीबाई रामलिंग उर्फ रामलिंगम् बोल्लू यांचे नांवावर असून सदर ठिकाणी त्यांचे मालकीचे तीन खोल्या आहेत. सदरच्या खोल्या वीट, मातीने बांधलेले वरती पन्हाळी पत्रे, वासे घातलेले आहेत.

आमचे अशिलांचे आई **कै. लक्ष्मीबाई रामलिंग उर्फ रामलिंगम् बोल्लू** हिचे दिनांक. २१/०७/२०२२ रोजी सोलापूर येथे राहते घरी मृत्यु झालेला आहे व तसेच आमचे अशिलांचे वडिल **कै. रामलिंग उर्फ रामलिंगम् गौरय्या बोल्लू** यांचेही **दिनांक. ११/११/२००२** रोजी सोलापूर यैथे मृत्यु झालेला आहे या दोघांचे मृत्युपश्चात आमचे अशिल **१) श्रीमती राजव्वा सुभाष वडेपल्ली, २) श्रीमती नागमणी प्रकाश पुल्ली** या दोघी मुली या नात्याने कायदेशीर वारस आहेत. यांचेशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत.

सदर ठिकाणी आमचे अशिल हे त्यांचे हयातीपासूनच सदरहू घरजागेवर आजपावेतो कुटुंबासह राहणेस आहेत. सदरहू घरजागेवरील आमचे अशिलांचे मयत आई **कै. लक्ष्मीबाई रामलिंग उर्फ रामलिंगम् बोल्लू** यांचे नांव कमी करून **१) श्रीमती राजव्वा सुभाष वडेपल्ली, २) श्रीमती नागमणी प्रकाश पुल्ली** यांचे नांवाची सो.म.पा.चे कर आकारणी ग.व.सु. विभागाचे दप्तरी वारस नोंद होऊन त्यांचे नांवे कर पावती मिळावे याकरिता आमचे अशिल सोलापूर महानगरपालिकेकडे अर्ज दाखल करणार आहोत.

तरी सदरहू घरजागेवर आमचे अशिला व्यतिरिक्त इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, खरेदीखत अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आंत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांचे नांवाची वारस नोंद सो.न.पा. चे कर आकारणी विभाग, ग.व.सु. विभागाचे दप्तरी नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख २४/०९/२०२४

**सही/-**
**ॲड. ढेकणे एस.एम.**
**रा. १२६-जे वाणी गल्ली बाळे,**
**ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



## श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

SHRIRAM HOUSING FINANCE

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५, जुना क्र.११, दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८
**शाखा कार्यालय:** कार्यालय क्र. एफ-३, पहिला मजला, कनाळे प्लाझा, डफरीनचौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर – ४१३००१
**वेबसाइट:** www.shriramhousing.in

### प्रतिकात्मक ताबा सूचना

जसे की , निम्नस्वाक्षरीदार हे श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (एसएचएफएल) प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ च्या (उक्त कायदा ) तरतुदींच्या अंतर्गत आणि उक्त कायद्याचे कलम १३ (१२) सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ ( उक्त नियम ) नियम ३ यांद्वारे मिळालेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी कर्जदार / सह-कर्जदार / तारणकर्ता यांना ज्यांचे तपशील खालील कोष्टकात नमूद करण्यात आले आहेत, उक्त मागणी सूचनेत नमूद केलेल्या रक्कमेची परतफेड करण्यासाठी मागणी सूचना जारी केली होती. कर्जदार/ सह-कर्जदार/ तारणकर्ता यांनी या रक्कमेची परतफेड न केल्याने याद्वारे कर्जदार / सह-कर्जदार/ तारणकर्ता यांना व तमाम सूचना देण्यात येत आहे की निम्नस्वाक्षरीदाराने एसएचएफएल चे प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफेसी कायदा ) चे कलम १३ (४) सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ चा नियम ८ यांद्वारे मिळालेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या गहाण मालमत्तांचा खालील तक्त्यातील इतर सर्व तपशिलांसह विशिष्टपणे नमूद केलेल्या तारखांना प्रतिकात्मक ताबा घेतला आहे

**कर्जदाराचे नाव व पत्ता**

**१. श्रीमती शिवगंगा चंद्रकांत आलुरे (कर्जदार),**
**२. श्री गजानन चंद्रकांत आलुरे (सह-कर्जदार),**
**३. श्री. चंद्रकांत बाबुराव आलुरे (सह-कर्जदार)**
**४. श्रीमती लक्ष्मी गजानन आलुरे (सह-कर्जदार)**
**सर्वांचा येथे निवासाचा पत्ता आहे: शिवगंगा नगर,४४,शेलगी, गाडेगावकर नाथ जवळ, एमआयडीसी, सोलापूर, सोलापूर उत्तर, महाराष्ट्र-४१३००६.**
**येथे देखील:**
**मालमत्तेचा पत्ता: ४४,शिवगंगा नगर२जुना सर्व्हे क्र१०/ए/२,नवीन सर्व्हे क्र१०/१/बी, ४४, मौजे येथे : शेळगी, सोलापूर, महाराष्ट्र-४१३००५**

**थकबाकी रक्कम**

दिनांक ०६-०७-२०२४ रोजी कर्ज खाते क्र. SHLHSOLR0000137 अंतर्गत रु. १८,७१,३७७/- (रुपये अठरा लाख एकाहत्तर हजार तीनशे सत्याहत्तर फक्त) संविदात्मक दराने पुढील व्याजासह, उक्त सूचना प्राप्त झाल्याच्या तारखे पासून ६० दिवसांच्या आत .
मागणी सूचना दि : ०९.०७.२०२४ प्रतीकात्मक ताबा तारीख: २५ सप्टेंबर २०२४

**मालमत्तेचे वर्णन**

स्थावर मालमत्तेचे ते सर्व तुकडा आणि पार्सल, भूखंड क्र ४४, पूर्व बाजूचे मोजमाप १०२.२३० चौ.मी आणि प्लॉट क्रमांक ४४ पश्चिम बाजूचे मोजमाप १०२.२३० चौ.मीटर, शिवगंगा नगर २ मध्ये त्याचा जुना सर्व्हे क्र.१०/ए/२, नवीन सर्व्हे क्र.१०/१/बी, त्यावर वरील बांधकाम केलेले जे मौजे शेळगी, ता. उत्तर सोलापूर,I) भूखंड क्र ४४, पूर्वेकडील बाजू: पूर्व: भूखंड क्र. ४५, दक्षिण: सर्व्हे नं१०/ए/२पश्चिम : प्लॉट क्र.४४ पश्चिम बाजू उत्तर: रस्ता II) भूखंड क्र४४, पश्चिम बाजू: पूर्व: भूखंड क्र. ४४पूर्व बाजू, दक्षिण: सर्व्हे नं १०/ए/२, पश्चिम : प्लॉट क्र.४२,उत्तर: रस्ता

विशेषकरून कर्जदार/जामीनदार/तारणकर्ता यांना आणि तमाम जनतेला सावध करण्यात येत आहे कि , त्यांनी या मालमत्तेबाबत व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार उपर्दिरिष्ट रक्कम तसेच पूर्ण व अंतिम रक्कम प्रदान होईपर्यंत संविदात्मक दराने पुढील व्याज यासाठी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांच्या अधिभाराच्या अधीन असेल. सुरक्षित मत्ता सोडवून घेण्यासाठी , उपलब्ध वेळेच्या संबंधात कर्जदार/जामीनदार /तारणकर्ता यांना कायद्याचे कलम १३ च्या उपकलम (८) कडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात येत आहे .

**ठिकाण :** सोलापूर
**दिनांक :** २५-०९-२०२४

**स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी**
**श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**



## CHANGE IN NAME

My sons name is **Yashraj Ravindra Pawar** but in podar school register his fathers name is mention only **Ravindra** and mothers name as **Sandhya** According to aaddhar card document father name is **Ravindra vitthal Pawar** and mother name is **Sandhya Ravindra Pawar** That is true and can be used for futher requier documentation

KINDLY NOTE THE SAME.

**AFFIDAVIT NO. 10945/2024**

**DATE : 28/09/2024**



## श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

### जाहिर फेर लिलाव २०२४

**तांबे, पितळ, स्टील वस्तू विक्री करणेकामी जाहिर फेर लिलाव करण्यात येत आहेत. त्याची सर्व माहिती www.vitthalrukmini-mandir.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

**स्वा/-**
**कार्यकारी अधिकारी**
**(संपर्क क्र. ०२१८६-२२४४६६)**



## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

### रस्ते दुरुस्ती - सन २०२४-२५ अंतर्गत

**फेर ई-निविदा सूचना क्रमांक : ७५,७६ / सन २०२४-२५**

**निविदा आय.डी.क्र. - १०९१९२१, १०९१९४५**

रस्ते दुरुस्ती सन-२०२४-२५ अंतर्गत ०२ कामांची फेर ई-निविदा सुचना क्र. - ७५,७६ सन २०२४-२५ ई-टेंडर पध्दतीने ऑनलाईन मागविणेसाठी शासनाच्या http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तरी याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**स्वाक्षरी/-**
**शहर अभियंता**
**अहमदनगर महानगरपालिका**



## जाहीर नोटीस

सोलापूर येथील तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर व मैंदर्गी येथील सर्व रहिवासीयांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णनः- तालुका अक्कलकोट पैकी मैंदर्गी नगर परिषद मैंदर्गी येथील मड्डी वस्ती, हिप्परगा रोड झोपडपट्टी नवीन वार्ड क्रं.४, यांसी जुना वार्ड क्रं.१७ यांसी नवीन म्युन्सिपल घर नंबर ४२४ यांसी जुना म्युन्सिपल घर नंबर अ-३९ यांसी हद्द पूर्वपश्चिम १६ फुट दक्षिणोत्तर ६० फुट एकूण क्षेत्र ९६० चौरस फुट इतके असून यात १०४१० मापाची पत्र्याची दोन खोल्या असून बाकीची खुली जागा आहे.

सदर प्रमाणे वर वर्णन केलेली झोपडी जागा ही सुशिलाबाई वसंत तांबट यांचे कब्जेवहिवाटीची होती त्यांनी दिनांक ३०/०९/२०२४ रोजी कब्जा पावती करारपत्राने मे. पब्लिक नोटरी सो, यांचे समोर दिलेली आहे. त्याप्रमाणे सदरी झोपडी जागा ही आमचे अशिल आमचे अशिल शिवचलप्पा सिद्रामप्पा चिक्कळी यांच्या कब्जेवहिवाटीची झालेली आहे. त्याप्रमाणे आमचे अशिल हे सदर झोपडी जागा ही नगर परिषद मैंदर्गी यांचे कडे कर आकारणीला नाव लावण्यासाठी अर्ज दिलेले आहे.

तरी या नोटीसीद्वारे कळविण्यता येते की, सदर जुना वार्ड क्रं. १७ यांसी नवीन म्युन्सिपल घर नंबर ४२४ यांसी जुना म्युन्सिपल घर नंबर अ-३९ या जागेवर आमच्या अशिल शिवचलप्पा सिद्रामप्पा चिक्कळी यांचे कर आकारणी दप्तरी नाव लावणेस कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसाच्या आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत व तक्रार न आल्यास ही झोपडी निर्वेधं व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांच्या नावाची नोंद मैंदर्गी नगर परिषद, मैंदर्गी येथील कर आकारणी दप्तरी करुन घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारची तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर प्रकटन दिले ता.३०/०९/२०२४.

**सही/-**
**नाईकवाडी ए.डी. ॲडव्होकेट**
**१८८६/४, विणकर वसाहत मु.पो. मैंदर्गी**
**ता. अक्कलकोट जि. सोलापूर.**
**मो.नं. ९८८१५२२९०७/८४२१०९८१७७.**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



## ग्रामपंचायत खैरेवाडी, ता. माढा, जि. सोलापूर

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत खैरेवाडी ता.माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदार पुरवठादारकडून बंद लखोट्यात निविदा मागवण्यात येत आहे.

**लेखाशिष :- २५१५-१२३८**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | खैरेवाडी गाव पोहोच रस्ता करणे | २,९९,८२२/- | १% | २००/- | ३ महिने | मजुर संस्था |

**टीप -**
१ कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि. ०१/१०/२०२४ ते दि. ०८/१०/२०२४ सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत
२ भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक ०१/१०/२०२४ ते दि. ०८/१०/२०२४ पर्यंत सकाळी १० ते ६ वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय खैरेवाडी
३ निविदा उघडण्याचा दिनांक ०९/१०/२०२४ रोजी सकाळी ठीक १०.00 वाजता ग्रामपंचायत कार्यालयात
४ निविदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ त २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील.
५ निविदा मंजूर/नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
६ अनुदानाच्या उपलबधतेनुसार देयक अदा करणेत येईल.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत खैरेवाडी**
**ता. माढा, जि. सोलापूर**



## ग्रामपंचायत खैरेवाडी, ता. माढा, जि. सोलापूर

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत खैरेवाडी ता.माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदार पुरवठादारकडून बंद लखोट्यात निविदा मागवण्यात येत आहे.

**लेखाशिष :- जनसुविधा योजना**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | खैरेवाडी, लोंढेवाडी रस्ता ते पाणीपुरवठा स्त्रोताकडे जाणारा रस्ता करणे | २,९९,४६३/- | १% | २००/- | ३ महिने | खुला |

**टीप -**
१ कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी ०१/१०/२०२४ ते दि. ०८/१०/२०२४ सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत
२ भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक ०१/१०/२०२४ ते दि. ०८/१०/२०२४ पर्यंत सकाळी १० ते ६ वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय खैरेवाडी
३ निविदा उघडण्याचा दिनांक ०९/१०/२०२४ रोजी सकाळी ठीक १०.00 वाजता ग्रामपंचायत कार्यालयात
४ निविदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ त २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील.
५ निविदा मंजूर/नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
६ अनुदानाच्या उपलबधतेनुसार देयक अदा करणेत येईल.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत खैरेवाडी**
**ता. माढा, जि. सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### भारताला दक्षिण आशिया चषक फुटबॉलचे जेतेपद



**थिम्पू :** भूतानमधील थिम्पू येथील चांगलिमिथांग स्टेडियमवर सोमवारी खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात भारताने बांगलादेशचा २-० असा पराभव करून दक्षिण आशिया चषक १७ वर्षांखालील फुटबॉल स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. कडव्या संघर्षानंतर भारताला ५८ व्या मिनिटाला पहिला गोल करण्यात यश मिळाले. प्रतिस्पर्धी संघाच्या गोलरक्षकाने चेंडू परतावल्यानंतर नगामगौहौ माटेने त्याच्यावर ताबा घेतला व कॉर्नरवरून मोहम्मद कैफकडे पास सोपविला. कैफने क्षणाचा विलंब न करता झटकन गोल केला व भारताला एका गोलने विजयी आघाडी मिळवून दिली. या आघाडीनंतर पाच मिनिटांनी नझमुल हुदा फैसलने बॉक्सच्या काठावरून दमदार फटका मारत भारताची गोलसंख्या दुप्पट केली नाही, तर भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.

### लोकमंगलच्या दोघींची विभागीय जिम्नॅस्टीक स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि.३० सप्टेंबर-**

शालेय शहर जिम्नॅस्टिक स्पर्धेत रिदमिक या क्रीडा प्रकारामध्ये १७ वर्षांखालील गटात वैष्णवी भोसले हिने प्रथम तर १४ वर्षे वयोगटात प्रणाली चव्हाण हिने दुसरा क्रमांक संपादिला. या कामगिरीवर त्यांची पुणे विभागीय जिम्नॅस्टिक स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांना क्रीडाशिक्षक रतिकांत म्हमाणे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे लोकमंगल समूहाचे अध्यक्ष आमदार सुभाष देशमुख, अवंती शिक्षण संस्थेचे सचिव प्रदीप साठे, कार्यकारी संचालक अभयसिंह साठे, मुख्याध्यापिका शुभांगी काशीद यांनी अभिनंदन केले.





### २०० मीटर शर्यतीत अनिमेश कुजूरला सुवर्ण

**पाटणा :** येथील पाटलीपुत्र क्रीडा संकुलात आयोजित इंडिया ओपन २३ वर्षांखालील वयोगटाच्या ॲथ्लेटिक्स स्पर्धेत अनिमेश कुजूरने पुरुषांच्या २०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक पटकावले तसेच स्वतःच्याच स्पर्धा विक्रमात सुधारणा केली. कुजूरने आपल्या प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकत शर्यतीत पूर्ण वर्चस्व दाखवले. त्याने २०.६५ सेकंद अशी वेळ नोंदवत स्वतःचा गत वर्षी नोंदविलेला आपल्या २०.८७ सेकंदाच्या स्पर्धा विक्रमाला मोडीत काढले. मी ज्या पद्धतीने तयारी केली, त्यामुळे मी वेळेवर खूश नाही. पण सुवर्ण जिंकणे आनंददायक, असे कुजूर म्हणाला. पुनीत यादवने ५००० मीटर शर्यतीच्या विजेतेपदासह १० हजार मीटर शर्यतीचे विजेतेपद पटकावले. १०० मीटर हर्डल्स विजेती मौमिता मोंडलने ६.२७ मीटरसह लांब उडी स्पर्धेत आपले दुसरे सुवर्ण जिंकले.



### फ्रान्सचे हम्बर्ट, आर्थर फिल्स अंतिम फेरीत लढणार

**टोकियो :** येथे सुरू असलेल्या जपान ओपन टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत फ्रान्सच्या युगो हम्बर्ट व आर्थर फिल्सने आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर विजय नोंदवत स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. आता फ्रान्सचे हे दोन टेनिसपटू विजेतेपदासाठी एकमेकांविरुद्ध लढणार आहेत.टेनिस दौऱ्यावर गत सहा अंतिम सामन्यात अपराजित राहिलेल्या हम्बर्टने झेक प्रजासत्ताकच्या टॉमस मॅचॅकचा ६-३, ३-६, ६-२ असा पराभव केला. आता हम्बर्ट पॅरिस ऑलिम्पिक दुहेरीच्या जोडीदार फिल्सविरुद्ध अंतिम सामना खेळणार आहे. फिल्सने डेन्मार्कच्या सहाव्या क्रमांकाच्या होल्गर रुनचा ७-६ १०-८, ७-६ १२-१० असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. मंगळवारचा सामना चार वर्षांतील एटीपी दौऱ्यातील पहिला ऑल-फ्रेंच अंतिम सामना असेल. २० वर्षीय फिल्सने उपांत्यपूर्व फेरीत गतविजेता बेन शेल्टनचा धुव्वा उडवला होता.

# भारताच्या आक्रमक खेळामुळे कसोटी निकाली लागण्याची आशा

◆ **कानपूर, ३० सप्टेंबर**

ग्रीन पार्क स्टेडियमवर भारत आणि बांगलादेश यांच्यातील दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यादरम्यान पावसामुळे दोन दिवस वाया गेल्यानंतर सोमवारी अर्थात सामन्याच्या चौथ्या दिवशी सूर्यप्रकाशात भारताने आक्रमक खेळाचे प्रदर्शन केले, त्यामुळे उद्या पाचव्या व अखेरच्या दिवशी या कसोटीचा निकाल लागण्याची आशा निर्माण झाली आहे.

पावसामुळे दोन दिवस वाया गेल्यानंतर सोमवारी सकाळी बांगलादेशने ३ बाद १०७ धावांवरून पुढे खेळण्यास सुरुवात केली व त्यांचा पहिला डाव ७४.२ षटकांत सर्वबाद २३३ धावांवर आटोपला. प्रत्युत्तरात यशस्वी जयस्वाल (७२) व केएल राहुलच्या (६८) झंझावाती अर्धशतकाच्या बळावर भारताने ३४.४ षटकांतील ९ बाद २८५ धावा काढून आपला पहिला डाव घोषित केला. भारताने पहिल्या डावात ५२ धावांची आघाडी मिळविली. त्यानंतर बांगलादेशने चौथ्या दिवस अखेर दुसऱ्या डावात ११ षटकांत २ बाद २६ धावा केल्या असून ते आणखी २६ धावांनी पिछाडीवर आहे.



केएल राहुलची झंझावती अर्धशतकी खेळी



यशस्वी जयस्वालचे अर्धशतक

बांगलादेशच्या मोमीनूल हक व मुशफिकर रहिमने ३ बाद १०७ धावांवरून पुढे खेळताना मोमीनूलने एक बाजू खंबीरपणे सांभाळली. संघमित्रांच्या साथीने मोमीनूल हकने १९४ चेंडूंत नाबाद १०७ धावांची शतकी खेळी करत संघाला सर्वबाद २३३ धावांचा टप्पा गाठून दिला. त्याला कर्णधार नजमूल शांतो (३१) व मेहदी हसन मिराझची (२०) थोडी साथ मिळाली. बांगलादेशला २३३ धावांत रोखताना भारताकडून जसप्रीत बुमराहने ३ बळी, मोहम्मद सिराज, रविचंद्रन अश्विन व आकाश दीपने प्रत्येकी २ बळी व रवींद्र जडेजाने एक बळी टिपला.

प्रत्युत्तर देताना भारताकडून यशस्वी जयस्वाल (७२) व कर्णधार रोहित शर्माने (२३) पहिल्या गड्यासाठी ५५ धावांची भागीदारी करून चांगली सुरुवात केली. रोहितने ११ चेंडूंत १ चौकार व ३ षट्कारांच्या मदतीने २३ धावा ठोकल्या. यशस्वीने शुभमन गिलसोबत दुसऱ्या गड्यासाठी ७२ धावांची भागीदारी करत संघाला १२७ धावांवर पोहोचवले, याचवेळी यशस्वीला हसन महमूदने बाद केले. यशस्वी जयस्वालने ५१ चेंडूंत १२ चौकार व २ षट्कारांसह ७२ धावांची खेळी केली. गिल व ऋषभ पंतने (९) संघाला दीडशे धावांचा टप्पा गाठून दिला. गिलने ३६ चेंडूंत ३९ धावांचे योगदान दिले. यात त्याने ४ चौकार व एक षट्कार खेचला.

अपेक्षेनुसार विराट कोहली व केएल राहुलने आक्रमक फलंदाजी करत संघाला अडीचशे धावांचा टप्पा ओलांडून दिला. कोहलीने ३५ चेंडूंत ४ चौकार व एका षट्कारसह ४७ धावांचे, तर राहुलने ४३ चेंडूंत ७ चौकार व २ षट्कारांसह ६८ धावांचे योगदान दिले. या दोघांनी पाचव्या गड्यासाठी ८७ धावांची भागीदारी केली. आकाश दीप बाद होताच भारताने ३४.४ षटकातील ९ बाद २८५ धावांवर आपला पहिला डाव घोषित केला. बांगलादेशकडून मेहदी हसन मिराझ व शाकिब अल हसनने प्रत्येकी ४ बळी टिपलेत.

बांगलादेशने आपल्या दुसऱ्या डावास सुरुवात केल्यानंतर दिवसअखेरपर्यंतच्या खेळात झाकीर हसन (१०) व हसन महमूद (४) हे दोन फलंदाज गमावले. फिरकीपटू आर. अश्विनने या दोघांना झटपट तंबूत परत पाठवले. खेळ थांबला तेव्हा सलामीवीर शादमन इस्लाम (७) व मोमीनूल हक (नाबाद शून्य) खेळपट्टीवर होते.

दोन सामन्यांच्या मालिकेत १-० ने आघाडीवर असलेल्या भारतीय संघाला आता दुसऱ्या कसोटी सामन्यात विजय मिळवायचा असेल, तर सोमवारी सकाळच्या सत्रात बांगलादेशच्या उर्वरित फलंदाजांना झटपट बाद करणे आणि मिळालेल्या धावांचे आव्हान अनिवार्य षटकांपूर्वी गाठणे आवश्यक आहे. (वृत्तसंस्था)

# भारतीय नेमबाजांना दोन कांस्यपदके

### जागतिक कनिष्ठ गट नेमबाजी

◆ **नवी दिल्ली, ३० सप्टेंबर**

पेरू येथील लिमा येथे सुरू असलेल्या आयएसएसएफ जागतिक कनिष्ठ गट नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय रायफल आणि पिस्तूल नेमबाजांनी १० मीटर मिश्र सांघिक प्रकारात दोन कांस्यपदके जिंकलीत.

आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा महासंघाच्या (आयएसएसएफ) स्पर्धेतील स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी कांस्यपदका जिंकल्यामुळे आता भारताची पदक संख्या ५ झाली असून यात दोन सुवर्ण आणि तीन कांस्यपदकांचा समावेश आहे.

गौतमी भानोत व अजय मलिकने प्रत्येकी ३०-शॉट्सनंतर एकूण ६२८.९ ची नोंद केली व त्यांनी ३४ जोड्यांमध्ये तिसरे स्थान पटकावले.

या कामगिरीमुळे त्यांना अनामारिजा तुर्क आणि डार्को टोमासेविक या चौथ्या स्थानावर असलेल्या क्रोएशियन जोडीसह कांस्यपदकासाठी पात्र ठरविले.



कांस्यपदकाचे मानकरी गौतमी भानोत व अजय मलिक

चीनने अंतिम फेरीत फ्रान्सचा पराभव करत स्पर्धेतील पहिले सुवर्ण जिंकले. अभिनव शॉ व शांभवी क्षीरसागर ही दुसरी भारतीय जोडी ६२८.१ गुणांसह एकूण सहाव्या स्थानावर आहे.

मिश्र पिस्तूल स्पर्धेत दोन्ही भारतीय जोडप्यांनी आपापसात कांस्यपदक जिंकण्यासाठी पात्रता फेरीत क्रमशः तिसरे व चौथे स्थान पटकावले. लक्ष्या व प्रमोदने अखेर कनिष्क डागर व मुकेश नेलावली यांच्यावर १६-८ अशी मात केली. जर्मनीने सुवर्ण, तर युक्रेनने रौप्यपदक पटकावले. शनिवारी एअर पिस्तूल सांघिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारे लक्षिताचे हे स्पर्धेतील दुसरे पदक होते. (वृत्तसंस्था)

### भारतीय संघाची सर्वांत वेगवान खेळी

**कानपूर :** सोमवारी ग्रीन पार्क स्टेडियमवर दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात चौथ्या दिवशी बांगलादेशचा पहिला डाव २८ षटकांत २३३ धावांवर आटोपल्यानंतर रोहित शर्माच्या खेळाडूंनी कसोटी क्रिकेटमध्ये अभूतपूर्व अशी फलंदाजी केली. भारताने तीन षटकात ५० धावा केल्या, १०.१ षटकांत १०० आणि २४.२ षटकांत २०० धावा जलद गतीने काढल्या. ही भारताची कसोटी क्रिकेटमधील आतपर्यंतची सर्वात वेगवान खेळी ठरली. भारताने ९ बाद २८५ धावांवर आपला पहिला डाव घोषित केला आणि नंतर बांगलादेशने दिवस अखेर दुसऱ्या डावात २ बाद २६ धावा केल्या.

# वर्चस्व गाजवण्यासाठी भारताला मदत करणारे अनेक खेळाडू : लक्ष्मण

◆ **बंगळुरू, ३० सप्टेंबर**

जागतिक स्तरावरील क्रिकेटमध्ये आणखी दहा वर्षे वर्चस्व गाजविण्यास मदत करणारे भारताकडे अनेक खेळाडू आहेत, असा विश्वास राष्ट्रीय क्रिकेट अदामीचे प्रमुख व्ही.व्ही.एस. लक्ष्मण यांनी व्यक्त केला.

बऱ्याच काळापासून भारतीय क्रिकेट जगत स्वतःच्या सेंटर ऑफ एक्सलन्ससाठी आसुसलेली आहे. शनिवारी राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचे नामकरण आणि पुनर्स्थापना, या दिशेने एक मोठे पाऊल पडले. ४० एकर जागेवर उभारलेल्या सेंटर ऑफ एक्सलन्सचे औपचारिक उद्घाटन बीसीसीआयचे अध्यक्ष रॉजर बिन्नी यांच्या हस्ते झाले. यावेळी सचिव जय शाह प्रामुख्याने उपस्थित होते.

लक्ष्मणने २०२१ मध्ये पूर्वीच्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचे (एनसीए) प्रमुख म्हणून त्याचा एकेकाळचा सहकारी राहुल द्रविडकडून पदभार स्वीकारला. आता ते बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्सचे प्रमुख म्हणून ओळखले जाणार आहे. त्या पृष्ठभूमीवर लक्षण माध्यमांशी बोलत होते.

एनसीएने भारतीय क्रिकेटला अनेक प्रतिभावान खेळाडू पुरविण्यात मदत करणारी साखळी तयार करण्यात आपली भूमिका बजावली आहे. भारतीय क्रिकेटपटू किमान पुढील दशकभर जागतिक क्रिकेटवर



वर्चस्व राखतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

मी खूप आत्मविश्वासाने सांगू शकतो, काही कौशल्ये वगळता पुढील १० वर्षांमध्ये आमच्याकडे बरेच खेळाडू आहेत, जे आपल्या देशाला अभिमानास्पद वाटतील. मी केवळ पुरुष क्रिकेटपटूंबद्दल बोलत नाही, तर महिला क्रिकेट सुद्धा अशा प्रकारची प्रतिभा आहे. जागतिक क्रिकेटमध्ये भारताचे हे आपल्या स्थिर पुरवठा साखळीचे परिपूर्ण प्रतिबिंब आहे, असे लक्ष्मणने सांगितले.

आम्ही वेस्ट इंडिजमध्ये टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेचे विजेतेपद पटकावले होते, परंतु तुम्ही क्रिकेटचे तिन्ही स्वरुप पाहिल्यास, आम्ही वर्चस्व राखले आहे. केवळ क्रमवारीतच नाही तर इतर पैलूंवरही आम्ही वर्चस्व राखले आहे, असे त्यांनी सांगितले. क्रिकेटच्या बाबतीत एक पुरवठा साखळी आहे. याचा अर्थ भारताकडे अनेक दिग्गज खेळाडू आहेत, तेच भारतीय क्रिकेटचे आधारस्तंभ आहे, असे ४९ वर्षीय लक्ष्मण म्हणाले. कौशल्य वाढीसोबतच खेळाडूंची मानसिक स्थिती चांगली ठेवणे देखील त्यांच्या वाढीसाठी महत्त्वाचे आहे. (वृत्तसंस्था)

# सिराजचा अप्रतिम झेल

◆ **कानपूर, ३० सप्टेंबर**

सोमवारी ग्रीन पार्क स्टेडियमवर बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या चौथ्या दिवशी शाकिब अल हसनला बाद करण्यासाठी मोहम्मद सिराजने नेत्रदीपक उडी मारून अप्रतिम झेल पकडला.



रविचंद्रन अश्विनचा सामना करताना शाकिब अल हसन क्रीजमधून बाहेर आला, पण त्याला अश्विनच्या चेंडूचा अचूक वेध घेता आला नाही. लॉफ्टेड ड्राईव्हला जात असताना शाकिबने बॅटवरील तळाची पकड गमावली. मिड-ऑफमध्ये मोहम्मद सिराज बॅक-पॅडलिंगसह झेप घेत स्कीयरच्या रूपात झेल पकडला. चेंडू त्याच्यावरून थोडासा जाताना दिसत होता व त्याने पाठीमागे वाकून हा झेल पकडला. शाकिब नऊ धावा काढून तंबूत परतला. (वृत्तसंस्था)

# रवींद्र जडेजाचे ३०० कसोटी बळी

◆ **कानपूर, ३० सप्टेंबर**

भारताचा अष्टपैलू रवींद्र जडेजाने आपले ३०० कसोटी बळी व ३००० धावा पूर्ण केल्या आहे. त्याच्या या कामगिरीबद्दल भारतीय संघाचे गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्नी मॉर्केल यांनी जडेजाचे कौतुक केले. जडेजाने कसोटी क्रिकेटमधील प्रतिष्ठित ३०० बळी टिपणाऱ्या दिग्गजांच्या क्लबमध्ये स्थान मिळविले आहे.

३५ वर्षीय जडेजाने बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात चौथ्या दिवशी ही कामगिरी केली. जडेजाने बांगलादेशच्या हसन महमूदला बाद करताना हा टप्पा गाठला आणि कसोटी क्रिकेटमध्ये



३०० बळी घेणारा सातवा भारतीय ठरला. ३०० बळी आणि ३,००० धावांची दुहेरी कामगिरी करणारा जडेजा आता केवळ ७४ सामने खेळून हा टप्पा गाठणारा दुसरा सर्वात वेगवान खेळाडू ठरला आहे.

इंग्लंडचा महान खेळाडू सर इयान बोथम यांच्यापेक्षा दोन सामने अधिक खेळला. मॉर्केल पुढे म्हणाला, ३००-कसोटी बळींच्या क्लबमध्ये सामील होणे विशेष आहे. (वृत्तसंस्था)


# कोहली व बाबरची तुलना निराधार : झहीर अब्बास

◆ **शारजाह, ३० सप्टेंबर**

विराट कोहली आणि बाबर आझम यांच्यातील तुलना निराधार आहे, कारण भारतीय सुपरस्टार पाकिस्तानी फलंदाजापेक्षा खूपच सुसंगत आहे, असे मत पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू झहीर अब्बासने व्यक्त केले.

एकेकाळी कोहली, स्टीव्ह स्मिथ, जो रूट आणि केन विल्यमसन यांच्यासह बाबर 'पाच विलक्षण फलंदाज'चा भाग म्हणून ओळखला जायचा, परंतु सध्या बाबरचा फॉर्म घसरत चालला आहे.

तुलना निरर्थक आहेत. विराट कोहली प्रत्येक सामन्यात धावा करतो, तर दुसरा खेळाडू (बाबर) कोणत्याही सामन्यात धावा करत नाही, त्यामुळे तुलना नाही. जो



धावा काढतो, तो चांगला आहे, असे अब्बास शारजाहमधील क्रिकेट प्रेडिक्टा कॉन्क्लेव्हमध्ये बोलत होते.

कोहलीच्या नावावर ८० आंतरराष्ट्रीय शतके आहेत, तर बाबरने ३१ शतके झळकावली आहेत.

भारताने क्रिकेटच्या सर्व स्वरुपात सातत्य दाखविले आहे, हे अब्बास यांनी मान्य केले व रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील संघ आगामी चॅम्पियन्स चषकासाठी प्रबळ दावेदार असेल असेही ते म्हणाले.

एकूणच भारतीय संघ खूप चांगला आहे. त्यांचे फलंदाज आणि गोलंदाजही चांगली कामगिरी करत आहेत. हा एक अतिशय संतुलित संघ आहे, जो विचारपूर्वक खेळतो. त्यांच्याकडे खूप चांगला कर्णधार आहे, ज्याला क्रिकेट चांगले समजते. त्यामुळे सर्व काही भारतीय संघाच्या बाजूने जात आहे. भारतीय संघाची हीच सध्याची स्थिती आहे, असे ते म्हणाले. भारतीय संघाला चॅम्पियन्स चषक जिंकण्याची खूप चांगली संधी आहे, कारण त्यांच्याकडे संतुलित संघ आहे, असे ७७ वर्षीय माजी क्रिकेटपटू अब्बास म्हणाले. 'आशियाई ब्रॅडमन' म्हणून ओळखले जाणारे अब्बास आपल्या काळातील सर्वात मोहक फलंदाजांपैकी एक होते. त्याने पाकिस्तानसाठी ७८ कसोटी आणि ६२ एकदिवसीय सामने खेळले, त्यांनी अनुक्रमे ५,०६२ आणि २,५७२ धावा केल्या. कसोटी क्रिकेट हे खेळाडूंचे चारित्र्य, लवचिकता, मानसिक सामर्थ्य, तंत्र आणि सातत्य खऱ्या अर्थाने चाचणी घेते. कसोटी क्रिकेट हे खरे क्रिकेट आहे. कोणत्याही खेळाडूची, गोलंदाजाची ती खरी कसोटी असते. एकेकाळी भारत आणि पाकिस्तानचे कसोटी संघ चांगले असायचे, आणि आता क्रिकेट मंडळांना हे सत्य कळू लागले आहे की आम्ही कसोटी क्रिकेटशिवाय पुढे जाऊ शकत नाही, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# पाकिस्तान दौऱ्याचा निर्णय सरकार घेईल : शुक्ला

### चॅम्पियन्स चषक क्रिकेट

◆ **नवी दिल्ली, ३० सप्टेंबर**

पुढील वर्षी चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेसाठी राष्ट्रीय क्रिकेट संघ पाकिस्तानला जाणार की नाही यावर अंतिम निर्णय भारत सरकार घेईल, असे बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी सोमवारी सांगितले.

पाकिस्तान १९ फेब्रुवारी ते ९ मार्च दरम्यान प्रतिष्ठित आयसीसी चॅम्पियन्स चषक वन-डे क्रिकेट स्पर्धेचे यजमानपद भूषवणार आहे.

आम्ही अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही. पण आमचे धोरण असे आहे की आंतरराष्ट्रीय दौऱ्यांसाठी आम्ही नेहमीच सरकारची परवानगी घेतो. आमच्या संघाने कोणत्याही देशात जावे की आमच्या संघाने कोणत्याही देशात जाऊ नये, हे सरकारने ठरवायचे आहे, असे शुक्ला यांनी पत्रकारांना सांगितले.

या प्रकरणात (सुद्धा), सरकार जो काही निर्णय घेईल, त्याचे पालन करू, असे ते पुढे म्हणाले.

भारत आणि बांगलादेश यांच्यात सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या निमित्ताने शुक्ला प्रसारमाध्यमांशी बोलत होते. (वृत्तसंस्था)

### आयपीएल लिलाव पुन्हा परदेशात !

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) मागील आवृत्तीप्रमाणेच आगामी इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) खेळाडूंचा लिलाव पुन्हा परदेशात आयोजित करण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय ठिकाण लिलाव प्रक्रियेसाठी अधिक अनुकूल वातावरण प्रदान करू शकेल, असे संकेत बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी दिले होते. आम्ही आयपीएल लिलावासाठी दोन्ही पर्यायांवर विचार करत आहोत. लिलाव परदेशातही असू शकते. मागच्या वेळी आम्ही दुबईत लिलाव केला होता व तो खूप यशस्वीपणे पार पडला. संपूर्ण कल्पना म्हणजे क्रिकेटचे काही घटक परदेशातही घेऊन जावेत. त्यामुळे परदेशातील क्रिकेट चाहतेही आकर्षित होतात, असे ते म्हणाले. जर परदेशात आयपीएल सामने होऊ शकत नसतील, तर किमान तिथे असे लिलाव कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत. हे लक्षात घेऊन, सर्व पर्याय खुले आहेत, असेही ते म्हणाले.

# दुखापतीमुळे समित द्रविड ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या चार दिवसीय सामन्याला मुकला

◆ **चेन्नई, ३० सप्टेंबर**

भारतीय क्रिकेट संघाचे माजी मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांचा सुपुत्र समित द्रविड दुखापतीमुळे येथे आजपासून प्रारंभ झालेल्या भारत-ऑस्ट्रेलिया यांमच्यादरम्यानच्या चार दिवसीय सामन्याला मुकला आहे. तो दुसऱ्या सामन्यालाही मुकण्याची शक्यता आहे.

दुसरा चार दिवसीय सामना ७ ऑक्टोबरपासून चेपॉक स्टेडियमवर सुरू होईल, त्यामुळे समितला गुडघ्याच्या दुखापतीतून सावरण्यासाठी आणखी एक आठवडा आहे.

समित सध्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये (एनसीए) गुडघ्याच्या दुखापतीवरग उपचार घेत आहे. तो सध्या बरा होत आहे, परंतु त्यामुळे त्याला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेतूनही बाहेर बसावे लागले होते.



तो पुद्दुचेरी येथे भारताच्या १९ वर्षांखालील संघातून पदार्पण करेल अशी अपेक्षा होती, परंतु तो तीनपैकी एकाही सामन्यात खेळला नाही. भारताने वन-डे मालिका ३-० ने जिंकली.

समित सध्या एनसीएमध्ये आहे, परंतु तो दुखापतीतून पूर्णपणे सावरला की नाही, याची कल्पना नाही, असे १९ वर्षांखालील संघाचे मुख्य प्रशिक्षक हृषिकेश कानिटकर यांनी सांगितले.

खरे तर, भारतीय संघाचा माजी कर्णधार व मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडचा मुलगा समितसाठी, १९ वर्षांखालील आंतरराष्ट्रीयस्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करण्याची ही शेवटची संधी आहे.

तो या वर्षी ११ ऑक्टोबर रोजी १९ वर्षांचा होणार आहे, त्यामुळे तो २०२६ मध्ये होणाऱ्या आयसीसी १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेत भारताकडून खेळण्यास अपात्र ठरेल. १९ वर्षांखालील टप्प्यात चार दिवसीय सामना खेळल्याने खेळाडूंच्या विकासाला मदत होईल.

कसोटी सामना खेळणे हा एक चांगला उपक्रम आहे, कारण कसोटी क्रिकेट तुमची परीक्षा घेते. गोलंदाजांना योजना आखण्यासाठी रणनीती बनवण्यासाठी पुरेसा वेळ आहे. (वृत्तसंस्था)

# महाराष्ट्राच्या किशोर, किशोरी खो-खो संघाचा उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**झारखंड, दि. ३० सप्टेंबर-**

पुष्पुर येथील अलबर्ट एक्का स्टेडियमवर सुरू असलेल्या ३४व्या किशोर-किशोरी राष्ट्रीय अजिंक्यपद खो खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या किशोर व किशोरी संघाने उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

झारखंड राज्य खो-खो असोसिएशनने आयोजित केलेल्या या स्पर्धेत महाराष्ट्राच्या किशोर संघाने साखळीतील त्रिपुराविरुद्धच्या पहिल्या सामन्यात एक डाव ३६ गुणांनी दणदणीत विजय मिळवला. शेवटच्या साखळी सामन्यात त्यांनी विदर्भचा एक डाव आणि २८ गुणांनी पराभव केला.

महाराष्ट्र संघाकडून खेळताना



श्री दळवीने ३.०० मिनिट संरक्षण करत २ गडी बाद करीत अष्टपैलू खेळ केला. सुरेश वसावेने २.१० मी., २.३० मी. संरक्षण केले. भीमसेन वसावेने अष्टपैलू खेळ करताना नाबाद १.५० मी. संरक्षण करीत २ गडी बाद केले. सुरेश चव्हाणने ४ गडी टिपले.

किशोरी गटात महाराष्ट्राने तेलंगणा, दिल्ली, सिक्कीम आणि त्रिपुरावर दणदणीत विजय मिळवत गटात अव्वल स्थान पटकावले.

साखळीतील शेवटच्या सामन्यात महाराष्ट्रच्या मुलींनी तेलंगणावर १ डाव आणि ४ गुणांनी विजय नोंदवला. सिद्धी तामखडेने दोन्ही डावात ४.१० मी. आणि ४.00 मी. संरक्षण करताना १ गडी बाद केला. तिच्या या अष्टपैलू खेळामुळे महाराष्ट्राचा विजय अगदी सोपा झाला. तिला सिद्धी भोसले १.३० मी., वेदिका तामखडे २.१० मी संरक्षणाची तर अपूर्वा वर्दे आणि प्रणिती जगदाळे प्रत्येकी २ गडी बाद करीत साथ मिळाली.

### असे होणार उपउपांत्यपूर्व फेरीचे सामने

किशोर : महाराष्ट्र-उत्तर प्रदेश
किशोरी : महाराष्ट्र-गुजरात

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ‘तो’ प्लॅस्टिकचा नाही तर फोर्टीफाईड तांदूळ

● जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी दिले स्पष्टीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

सध्या स्वस्त धान्य दुकानातील तांदळात प्लॅस्टीकचे तांदूळ मिळत असल्याबाबत ग्राहक दुकानदारांना विचारणा करत आहेत. मात्र रेशनिंग दुकानामधून मिळणारा तांदूळ हा फोर्टीफाईड तांदूळ आहे. स्वस्त धान्य दुकानामधून घरी आणलेला तांदूळ पाण्यावर तरगंत असल्याचे काही ग्राहक सांगतात. प्लॅस्टीकसारखा दिसणारा तांदूळ चावून पाहिल्याने वेगळी चव वाटत असल्याचे अनेकजण सांगतात. केंद्र शासनाच्या अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत हा फोर्टीफाईड तांदूळ सर्व स्वस्त धान्य दुकानातून वितरीत करण्यात येत आहे.

प्लॅस्टीकसारखा दिसणारा हा फोर्टीफाईड तांदूळ आरोग्यास घातक नसून, आरोग्यासाठी फायदेशिर असल्याचे स्पष्टीकरण जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी एका निवेदनाद्वारे केले आहे.



काही दिवसांपूर्वी खासदार प्रणिती शिंदे यांच्याकडे काही नागरिकांनी राशनमधून प्लॅस्टिकचा तांदूळ येत असल्याची तक्रार केल्यानंतर त्यांनी शनिवार, दि. २८ सप्टेंबर रोजी पत्रकार परिषदेतून हा तांदळाचा विषय माध्यमातून समोर आणला होता. त्याचा खुलासा जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी आज (दि. ३०) केला आहे.

पुरवठा विभागाकडून दिलेल्या निवेदनात पुढे नमूद केले आहे की, फोर्टीफाईड तांदळामध्ये पोषकयुक्त घटक आहेत. सामान्य तांदळापेक्षा फोटीफाईड तांदूळ अधिक पोषक असून शरीरास आवश्यक पोषक तत्वांची पुर्तता फोर्टीफाईड तांदूळ करतो. शरीरात पोषक तत्वाचे घटक कमी असतील तर फोर्टीफाईड तांदूळ खाल्याने पोषणतत्वाचे कमतरता दूर करण्यास मदत मिळेल. फोर्टीफाईड तांदळामध्ये थलोसिमिया, सिकलसेल, अनेमिया असे आजार रोखण्यासाठी उपयुक्त आहे. फोर्टीफाईड तांदळामध्ये लोह, फॉलिक ॲसीड, व्हिटॅमिन बी-१२ चे सूक्ष्म अन्नद्रव्य असून आरोग्याच्या दृष्टीने उत्तम आहे.

वजनाने हलके असल्याने ते पाण्यावर तरंगतात. फोर्टीफाईड तांदळाबाबत लाभार्थ्यांना शंका किंवा अडचणी असल्यास आपले तहसिल कार्यालयात पुरवठा विभागाशी संपर्क करण्यात यावा. फोर्टीफाईड तांदूळ हे तांदळाच्या पिठापासून बनलेले असतात. ज्यात आरोग्यासाठी आवश्यक सूक्ष्म पोषक घटक असतात. प्रथम तांदळाची भुकटी तयार केली जाते आणि त्यात लोह, फॉलिक ॲसीड, व्हिटॅमिन बी-१२ चे सूक्ष्म अन्नद्रव्य मिश्रण केले जाते. या मिश्रणाला पुन्हा तांदळाचा आकार दिला जातो. यालाच फोर्टीफाईड तांदूळ म्हणतात. १०० किलोमध्ये १ किलो फोर्टीफाईड तांदूळ मिसळून वितरीत केला जातो. फोर्टीफाईड तांदळाची जनजागृती करणेबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी सर्व तहसिलदार यांना लेखी कळविले आहे. तसेच शासनामार्फत प्राप्त चलचित्र देखील प्रसार माध्यमामधून प्रसारीत करण्यात आलेली आहेत. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना माहे सप्टेंबर २०२३ पासून गुणसंवर्धित तांदळाचा (फोर्टीफाईड तांदूळ) वितरण करण्यात येत आहे. सर्वसामान्य नागरिकांनी या तांदळाविषयी उठणाऱ्या अफवांविषयी विश्वास ठेवू नये. शासनाने फोर्टीफाईड तांदळाच्या शुध्दतेचे व पौष्टीकतेचे सर्व निकष तपासलेले आहेत आणि शासनाने ते मान्य केलेले आहेत. असाही निर्वाळा शेवटी जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी केला आहे.

## संक्षिप्त वृत्त



### डॉ. मनोज देवकर, राम हुंडोर यांचा वसुंधरा पुरस्काराने सन्मान

**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

सोलापूर महानगरपालिका आयोजित महाराष्ट्रातील पहिले वसुंधरा संमेलन महानगरपालिकेच्या आवारात साजरे करण्यात आले. सोलापूर महानगरपालिका व पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन तथा आयुक्त शितल तेली-उगले यांच्या अध्यक्षतेखाली उपायुक्त तैमुर मुलाणी, वसुंधरा अभियानाचे अधिकारी व सहाय्यक आयुक्त ज्योती भगत-पाटील यांच्या हस्ते डॉ. मनोज देवकर व राम हुंडारे यांचा सन्मानपत्र व वसुंधरा अभियानाचे सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आला. पर्यावरण दुत डॉ. मनोज देवकर व वृक्षप्रेमी राम हुंडारे यांनी इकोनेचर क्लबच्या माध्यमातून मागील अनेक वर्षांपासून सोलापूर शहर जिल्हा मध्ये मोठ्या प्रमाणात विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले आहे. इको नेचर क्लब संस्था ही महाराष्ट्रातील पहिली सहकारी संस्था आहे. या संघटनेमार्फत अनेक औषधी वनस्पती, ऑक्सिजन निर्माण करणारे, फळे व फुले देणारी झाडे असे विविध प्रकारचे वृक्ष लागवड करुन त्याचे संवर्धन करण्याचे काम ही या संस्थेमार्फत करण्यात येत आहे. पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे व सहाय्यक पर्यावरणाधिकारी स्वप्निल सोलंकर, उद्यान अधीक्षक, सर्व महाराष्ट्रातील पर्यावरण तज्ञ मान्यवरांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा व वसुंधरा संमेलन पार पडले.



### महावाचन उत्सव २०२४ अंतर्गत प्रमाणपत्रप्राप्त विद्यार्थिनींचा सत्कार

**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये महावाचन महोत्सव राबवण्याचे शासन निर्णय द्वारे कळवण्यात आले. प्रशालेतील ५वी ते १०वी तील सर्व विद्यार्थिनीनी या उपक्रमात सहभाग नोंदवला. वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देऊन अवांतर वाचनाची गोडी निर्माण करणे सृजनशीलतेला वाव देऊन भाषा संवाद कौशल्ये जोपासणे या दृष्टिकोनातून हा उपक्रम राबवण्यात आला. तनया श्रीकृष्ण गोसावी प्रांजल चव्हाण, किर्ती कांबळे, शब्द श्रुती कराड, आर्या सुरडे श्रीशा धनराज धर्माधिकारी श्रीषा पाटील, श्रावणी कोकाटे, प्रियदर्शनी गुंड, आरती सरवदे कु. ज्ञानेश्वरी जाधव श्रावणी पाटील या विद्यार्थिनींनी पुस्तक परीक्षण लेखनात क्रमांक प्राप्त केले. शासनाच्या वतीने त्यांना प्रमाणपत्रे प्राप्त झाली. मुख्याध्यापिका राजेश्री रणपिसे यांच्या हस्ते प्रमाणपत्रे देण्यात आली. या महावाचन महोत्सवासाठी मराठी विभाग प्रमुख मीरा केंद्रे, लक्ष्मी कमळे, मराठी विषय शिक्षक सतीश घंटेनवरू, श्रीमती स्वप्ना सहस्त्रबुद्धे, स्मिता कोर्टीकर, संतोषी सुरवसे, स्नेहल बागवडे, वर्धा माळगे, प्रियंका लाड, डॉ. अंजली शिरसी, बोरसे यांनी परिश्रम व सहकार्य केले. यावेळी मुख्याध्यापिका राजेश्री रणपिसे, पर्यवेक्षिका स्वाती पोतदार, शिक्षक प्रतिनिधी सतीश घंटेनवरू व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### लोकमंगल बँकेस महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट बँक पुरस्कार प्रदान

**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

बँकेचे अध्यक्ष तथा आ. सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या लोकमंगल बँकेस पंढरपूर येथील अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ व लोकमंगल बँक, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित एक लाख मराठा उद्योजक संकल्प पूर्ती मेळावा कार्यक्रमात १२६७ उद्योजकांना १२५ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य करून कर्ज वितरित केल्याबद्दल अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील व आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते उत्कृष्ट बँक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सदर पुरस्कार बँकेचे संचालक अनंता चव्हाण,बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी राजेशसिंह बायस यांच्यासह बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी स्वीकारला. यावेळी व्यासपीठावर विविध मान्यवर यांच्यासह अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे लाभार्थी व उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रिसिजन वाचन अभियानात माजी न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांची उपस्थिती

**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**



प्रिसिजन वाचन अभियान कार्यक्रमात शनिवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायमूर्ती मृदुला भाटकर या उपस्थित राहणार आहेत. यानिमित्ताने त्यांचा वाचन आणि लेखनप्रवास ऐकायला मिळणार आहे. त्यांच्या गेले लिहायचे राहूनी या कथासंग्रहातील निवडक कथांचे अभिवाचन आणि त्यांची मिलिंद कुलकर्णी पुणे हे प्रकट मुलाखत घेणार आहेत, अशी माहिती प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी दिली. मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती मा. मृदुला भाटकर हे एक उत्तुंग व्यक्तीमत्व सोलापूरकर वाचकांच्या भेटीला येत आहे. सन २००९ ते २०१९ या काळात त्यांनी उच्च न्यायालयात सेवा बजावली. प्रिसिजन वाचन अभियानाची सुरवात जुलै महिन्यात झाली. प्रिसिजन वाचन अभियानमध्ये मा. मृदुला भाटकर यांच्या गेले लिहायचे राहूनी या कथासंग्रहातील काही कथा, अभिवाचन करणार आहेत. न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांची प्रकट मुलाखत मिलिंद कुलकर्णी पुणे हे घेणार आहेत.डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात सायंकाळी ६.२५ वाजता हा कार्यक्रम होईल.

## झेडपीतील बोगस दिव्यांगांची तपासणी : सीईओ

● दिव्यांग प्रवर्गातून नोकरी मिळविलेल्या उमेदवारांची फेरमेडिकल तपासणीसाठी विभाग प्रमुखांना पत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

प्राथमिक शिक्षण विभाग आणि आरोग्य विभागातील दिव्यांग प्रवर्गातून नोकरी मिळविलेल्या उमेदवारांची फेर मेडिकल तपासणी करून खोटया प्रमाणपत्र धारकावर कारवाईसाठी सोलापूर झेडपीचे सीईओ कुलदीप जंगम यांनी पत्र काढले आहे. त्यामुळे बोगस दिव्यांगावर कारवाई होणार का? याची उत्सुकता लागली आहे.



वास्तविक पाहता अनेक विभागात बोगस दिव्यांग प्रमाणपत्रधारक असण्याचा संशय आहे. दिव्यांगाच्या विविच योजनेचा लाभ घेण्यासाठी युडीआयडी कार्ड अनिवार्य केले असून या कार्डची तपासणी केली जाणार आहे. परंतु काही असे कर्मचारी आहेत त्यांनी ऑनलाईनचे युडीआयडी कार्ड देखील काढले असून त्यांच्या शारिरीक तपासणी केल्यानंतरच प्रशासनाला खरे दिव्यांगत्य समोर येणार आहे.



राज्यातील बोगस दिव्यांग प्रमाणपत्र घेवून नौकरी मिळविणाऱ्या ३५९ जणांची यादी सोलापूर झेडपीच्या हाती आली आहे. ही माहतो बोगस दिव्यांग प्रमाणपत्र शोथ अभियान राबविण्यात आले होते. त्यातील सोलापूर झेडपीमध्ये किती बोगस दिव्यांग आहेत याची देखील माहिती प्रशासनाच्या हाती आली आहे. त्यासाठी सीईओ जंगम यांनी प्राथमिक शिक्षण विभाग आणि आरोग्य या दोन विभागाला दिव्यांगाचे प्रमाणपत्र तपासणीसाठी आदेश दिले आहेत.

**- कुलदीप जगंम,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

#### दिव्यांग समितीची बैठकच होत नाही

दर महिन्यातून १५ तारखेला दिव्यांग तक्रार निवारण समितीची बैठक होणे अपेक्षित आहे. परंतु सोलापूर झेडपीमध्ये दिव्यांगाची दर महिन्याला बैठकच होत नाही. हे वास्तव असल्याने दिव्यांगाच्या अडचणी जाणून घेण्यास झेडपी प्रशासनाला वेळच नसल्याचे दिसते.

#### आस्थिव्यंग, कर्णबधीर दिव्यांगांवर सर्वाधिक संशय

सोलापूर झेडपीत काही कर्मचाऱ्यांकडे नौकरी लागताना दिव्यांग त्व नव्हते परंतु मध्येच त्यांच्याकडे आस्थिव्यंग, कर्धबधीर असे दिव्यांगाचा दाखला आणला आहे. अशा कर्मचाऱ्यांकडे बोगसगिरी केल्याचा सशंय अधिक आहे. पदोन्नतीसह इतर लाभही आस्थिव्यंग व कर्णबधिर कर्मचाऱ्यांनी घेतला असल्याची चर्चा झेडपीत आहे.

## सिद्धेश्वर स्कूलमध्ये आजी-आजोबा दिवस साजरा



**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

श्री सिध्देश्वर इंग्लिश मीडियम प्री-प्रायमरी स्कूलमध्ये आजी-आजोबा दिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

यानिमित्त शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या आजी-आजोबांना आमंत्रित करण्यात आले होते. प्रारंभी आजी-आजोबांवर पुष्पवृष्टी करून व औक्षण करण्यात आले. आजी आजोबांसाठी विविध प्रकारच्या खेळांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये घरगुती पद्धतीने केक बनवणे, आजोबांसाठी खास साडी घडी घालने, स्टिक अँड बॉल, प्ले स्टेशन, सेल्फी पॉईंट आदी खेळांचा समावेश होता. यावेळी सिध्देश्वर देवस्थान शिक्षण समितीचे सदस्य भीमाशंकर पटणे, मुख्याध्यापिका नीता सोमवंशी उपस्थित होते. या उपक्रमाचे सिध्देश्वर देवस्थान शिक्षण समितीचे अध्यक्ष धर्मराज काडादी व शिक्षण समितीचे सदस्य राजशेखर येळीकर यांनी कौतुक केले.

## गांजाची लागवड करणाऱ्यास उच्च न्यायालयातून जामीन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

९० किलो गांजाची लागवड केल्याप्रकरणी बाजीराव लोभा राठोड (वय ५६, रा. कामती खुर्द, ता. मोहोळ) मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अनिल किलोर यांनी जामीन मंजूर केला.

दि. ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी गोपनीय बातमीदारांमार्फत पोलिसांना बातमी मिळाली होती की, बाजीराव लोभा राठोड याने त्याच्या शेतामध्ये उसाच्या पिकात गांजाची झाडे लावलेली आहेत, त्यावरून पोलिसांनी राठोड याच्या शेतात छापा टाकून उसाच्या पिकातून ९०.७९ किलो गांजाची लहान-मोठे असे एकूण ७५ झाडे जप्त केली. याबाबत शिवराज जनार्दन कासवीद यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कामती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येऊन बाजीराव यास अटक झाली होती. त्यावर बाजीराव याने जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता, तो अर्ज न्यायालयाने फेटाळला होता. त्यानंतर बाजीराव याने मुंबई उच्च न्यायालयात जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता. त्यावर सुनावणी होऊन न्यायमुर्ती किलोर यांनी २५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. यात सरकारतर्फे ॲड. पंकज देवकर यांनी तर आरोपीतर्फे ॲड रितेश थोबडे, ॲड .किरण सराटे यांनी काम पाहिले.

## नागरी बँक्स् असोसिएशनचे कर्जनियंत्रण, देखरेख व वसुली पध्दती विषयावर प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**




सोलापूर जिल्हा बँक्स असोसिएशनचे कर्जनियंत्रण, देखरेख व वसुली पध्दती या विषयावर उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे मुख्याधिकारी नवनाथ बिराजदार यांचा प्रशिक्षण कार्यक्रम झाला. असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश वाले यांनी यांचे स्वागत केले.

श्री. बिराजदार म्हणाले, ठेवी मिळविणे बँकेला सोपं आहे. पण चांगले कर्जदार मिळणे व चांगले कर्जदार टिकवणे हे खूप अवघड झालेले आहे. कर्जवाटप करताना बँकेच्या अधिका-यांनी संपूर्ण कागदपत्रांची पूर्तता झालेली आहे का याची खात्री करणे आवश्यक आहे. आरबीआयने वेळोवेळी प्रसिध्द केलेले परिपत्रक बँकेच्या संबंधित स्टाफने पाहणे आवश्यक आहे व त्यानुसार कामकाज करणे आवश्यक आहे. व त्याचप्रमाणे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये वसुली अधिका-याने वसुली कशी करावी यावर मार्गदर्शन केले.

असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश वाले यांनी प्रास्ताविक केले. संचालक दिपक मुनोत यांनी प्रमुख वक्ता नवनाथ बिराजदार यांचा परिचय करुन दिला. यावेळी असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ. अशोक सुरवसे, संचालक दिपक मुनोत, दिनकर देशमुख व सोलापूर जिल्हयातील नागरी सहकारी बँकेचे वसुली अधिकारी व ऑफिसर उपस्थित होते. उपाध्यक्ष डॉ. अशोक सुरवसे यांनी आभार मानले. मुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी ढवळे यांनी सूत्रसंचालन केले.

## लोक अदालतीमध्ये तडजोडीअंती १०,९९० प्रकरणे निकाली

### ८१ कोटीं रुपयांची तडजोड

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर. दि. ३० सप्टेंबर -**

बँकेचं थकीत कर्ज कसं भरायचं.. घरातील वाद कधी मिटवायचं यासह अनेक समस्यांनी ग्रासलेल्या लोकांना २८ सप्टेंबर रोजी सोलापूर जिल्हयात भरलेल्या लोकअदालतीमुळे दिलासा मिळाला. काहींच्या कौटुंबिक वादावर पडदा पडून पती-पत्नी एकत्रीत आले.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या आदेशाप्रमाणे शनिवारी घेण्यात आलेल्या जिल्हा विधी सेवा प्राधिकरणतर्फे शहर व जिल्हयातील राष्ट्रीय लोकअदालतीअंतर्गत १०९९० प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली आहेत. दरम्यान, विविध खटल्यांमध्ये ८१ कोटी ५ लाख ८१ हजार ३६० रुपयांची तडजोड करण्यात आली. लोकअदालतीचे उद्घाटन जिल्हा न्यायाधीश मोहम्मद सलमान आझमी यांचे हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी जिल्हा न्यायाधीश पी.एस. खुणे, महाराष्ट्र व गोवा बार कॉन्सिलचे सदस्य ॲड. मिलिंद थोबडे, जिल्हा सरकारी वकिल ॲड. प्रदीपसिंह राजपूत, सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अमित आळंगे, जिल्हा न्यायालयाचे प्र.प्रबंधक एम. के. ढोबळे आदी उपस्थित होते. जिल्हा न्यायालयासह सर्व तालुक्यातील न्यायालयांमध्ये दिवसभर लोकअदालत घेण्यात आली.

लेकअदालतीमध्ये ३९,११० प्रलंबित प्रकरणे आणि ५१,४३५ दाखलपूर्व प्रकरणे अशी एकूण ९०,५४५ प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. त्यापैकी ४,६०७ प्रलंबित प्रकरणात तडजोड झाली आणि ६,३८३ दाखलपूर्व प्रकरणे अशी एकूण तडजोडीने निकाली काढण्यात आली. या लोकअदालितीच्या पॅनलवर पी. एस. खुणे, एस. व्ही केंद्रे, एस. एन. रतकंठवार, एन. के. कोठुळे, डी.डी. कोळपकर, पी. बी. वराडे, ए.एस. बिराजदार, डी.जी. कंखरे, पी.पी. पेठकर, एस. आर. सातभाई, श्रीमती आर. के. जंगम, पी. व्ही. चव्हाण या न्यायाधीशांनी पॅनल प्रमुख म्हणून काम पाहिले.




तसेच पॅनल सदस्य म्हणून लोकअभिरक्षक कार्यालयातील विधिज्ञ स्नेहल राऊत, एस. एम. झुरळे, एम. बी. सोलनकर, रेवण पाटील, जी. बी. नवले तसेच एन. के. वाडेकर, आर.आर. बिराजदार, एस. एस. मोरडे, व्ही. व्ही. कुर्ले आदींनी काम पाहिले. ही लोकअदालत यशस्वी करण्याकरीता जिल्हा विधी सेवा प्राधीकरणाचे अध्यक्ष तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश मो. सलमान आझमी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव उमेश देवर्षी, तसेच पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधिकक्षक अतुल कुलकर्णी, महापालीका आयुक्त श्रीमती शितल तेली, जिल्हा परीषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांचे सहकार्य लाभले. तसेच जिल्हा न्यायालय व विधी सेवा प्राधिकरण येथील कर्मचारी, लोक अभिरक्षक कार्यालयातील विधीज्ञ व कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

#### स्पेशल ड्राईव्ह

लोकन्यायालयाच्या अगोदर उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ५ दिवस स्पेशल ड्राईव्ह प्रत्येक प्रथम न्यायदंडाधिकारी न्यायालयात घेण्यात आला. सोलापूर जिल्हयामध्ये या ५ दिवसांमध्ये ३,३८० प्रकरणे निकाली काढण्यात आली. त्यापैकी ५ वर्षी जूनी ५६३ खटले, १० वर्षी जूनी ६३ खटले, १५ वर्षी जूनी ६ खटले, २० वर्षापेक्षा जास्त प्रलंबित असलेल्या एक खटला, ३० वर्षापेक्षा जास्त प्रलंबित असलेल्या दोन खटले, ४० वर्षापेक्षा जास्त प्रलंबित असलेला एक खटला निकाली काढण्यात आला.

**जिल्हा-तालुकानिहाय प्रकरणांची माहिती**

| तालुका विधी सेवा समितीचे नांव | एकूण तडजोड झालेली प्रकरणे | एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम |
|---|---|---|
| सोलापूर | ५९१८ | ४७,०२,९४,१३९/- |
| अक्कलकोट | ७३२ | ९२,०७,३९२/- |
| बार्शी | २६६९ | ४,९७,५४,२२०/- |
| माढा | २७६ | ५,७५,१८,२५३/- |
| मोहोळ | ७३ | २,८३,५४,६४८/- |
| माळशिरस | ३३३ | ५,९४,९१,६७७/- |
| मंगळवेढा | २५१ | १,७६,२८,०९४/- |
| पंढरपूर | १७९ | ८,२१,८९,९११/- |
| करमाळा | १६० | २,८९,८४,०७२/- |
| सांगोला | ४०० | ७१,५८,९५४/- |
| **एकूण** | **१०,९९०** | **८१,०५,८१,३६०/-** |

#### महानगरपालिका

सोलापूर शहरातील मिळकतीचे थकीत कर व गाळाभाडे वसुलीकरीता दाखलपूर्व प्रकरणे महानगर पालीका सोलापूर यांचे वतीने लोकअदालतीमध्ये ठेवण्यात आलेली होती. या लोकअदालतीमध्ये आयुक्त शितल तेली-उगले, सहायक आयुक्त आशिष लोकरे, सहा. आयुक्त शशिकांत भोसले, व कर आकारणी प्रमुख युवराज गाडेकर कर संकलन विभागातील सर्व कर्मचारी यांचे मालमत्ता मिळकत धारक व गाळे धारक यांचे लोकन्यायालय यशस्वी होण्याकरीता सहकार्य लाभले.

या पॅनलचे आयोजन महानगरपालिका आवारतच करण्यात आले होते. व त्याकरीता पॅनल प्रमुख म्हणुन पी.पी. पेठकर व पॅनल विधिज्ञ म्हणुन रेवण पाटील यांनी काम पाहिले. या लोकअदालतीमध्ये महापालीकेचे एकूण १,८०१ दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीअंती निकाली निघाली असून १२ कोटी २३ लाख ७६ हजार २७७ रुपये इतका कर व भाडे पोटी आकारणी झालेली आहे.

#### मोटार वाहन प्रकरणे

या लोकअदालतीमध्ये शहर वाहतूक शाखा व ग्रामीण वाहतूक शाखा यांच्या प्रकरणेकरीता स्वतंत्र पॅनल निर्माण करण्यात आले होते. सदर पॅनल प्रमुख म्हणून श्रीमती डी. डी. कोळपकर यांनी काम पाहिले. सदर पॅनलवर ८,९५४ इतकी प्रकरणे तडजोडी करीता ठेवण्यात आली होती त्यापैकी २,३२८ इतकी प्रकरणे निकाली करण्यात आली व २१ लाख ८ हजार ६१० रुपये इतकी रक्कम वसूल करण्यात आली. सदर पॅनलचे कामकाज यशस्वी करण्याकरीता सहायक पोलीस आयुक्त खिराडकर, सहायक पोलीस आयुक्त राजन माने, पोलीस निरिक्षक तानाजी दराडे, पोलीस निरिक्षक उदय पाटील तसेच सर्व वाहतूक नियंत्रण शाखेकडील सर्व पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले.

#### जिल्हा परिषद

या लोकअदालतीमध्ये दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूर येथील सर्व ग्राम पंचायतीचे कर वसूलीचे दाखल पूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधीन शेळकंदे, उत्तार सोलापूरचे गट विकास अधिकारी श्रीमती जस्मिन शेख, दक्षिण सोलापूरचे गट विकास अधिकारी बाळासाहेब वाघ, सोमनाथ शिंदे व विस्तार अधिकारी कोळी व सर्व ग्रामपंचायतीचे ग्राम सेवक यांचे सहकार्याने ८३८ इतकी प्रकरणे निकाली झाली असून १ कोटी १९ लाख ८४ हजार २५१ रुपये इतकी रक्कम सदर लोकअदालतीमध्ये वसूल झाली आहे.

#### बँक व वित्तीय संस्था

शहरातील विविध बँक व वित्तीय संस्था यांचे दाखल पूर्व प्रकरणे तडजोडीने मिटविण्याकरीता बँक अधिकारी व बँकेचे विधीज्ञ यांचे मोलाचे योगदान लाभले. तसेच सदर लोकन्यायालयामध्ये शहर पोलीस व वाहतूक नियत्रण शाखा यांनी चोख बंदोबस्त नेमूण गर्दीवर नियंत्रण करण्यास मदत केली. तसेच महाराष्ट सुरक्षा बलाचे जवान यांनी सुद्धा सहकार्य केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त

### ज्येष्ठ नागरिकांचा आज जिल्हास्तरीय मेळावा

**सोलापूर दि. ३० सप्टेंबर-**

राज्यात १ ऑक्टोबर हा दिवस जागतिक ज्येष्ठ नागरिक दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ज्येष्ठ नागरिकांसाठी बुधवार, दि. १ ऑक्टोबर, २०२४ रोजी सकाळी १० वाजता द्वारकाधीश मंदिर, जुळे सोलापूर येथे जिल्हास्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तरी मेळाव्यास जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिक, उपस्थित रहावे, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी केले आहे. भारताच्या संविधानातील राज्य धोरणाच्या निर्देशक तत्वावरील अनुच्छेद ३९ क व ४१ मध्ये ज्येष्ठ नागरिक सुस्थितीत असावा अशी तरतूद आहे. ज्येष्ठ नागरिकांचे समाजातील स्थान विचारात घेता त्यांना वृध्दापकाळ चांगल्या प्रकारे घालविता यावा. तसेच समाजामध्ये त्यांचे जीवन सुसह्य व्हावे, शारिरीक व मानसिक आरोग्य सुस्थितीत रहावे. वृध्दापकाळामध्ये त्यांच्या आर्थिक क्षमता, कामाचा हक्क, शिक्षणाचा हक्क आणि सार्वजनिक मदत मिळविण्यासाठी राज्याच्या सर्वसमावेशक धोरणानूसार १ ऑक्टोबर हा दिवस जागतिक ज्येष्ठ नागरिक दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालय सोलापूर व चौधरी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापुरात मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.स सदर कार्यक्रमास जिल्ह्यातील जास्तीत जास्त ज्येष्ठ नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त सोनवणे यांनी केले आहे.



# जबाबदारीने अन् बिनचूकपणे काम करणे हीच अभियंत्याची खरी ओळख



## झेडपीच्या अभियंता पुरस्कार वितरणप्रसंगी जगंम यांचे प्रतिपादन

## जि. प. च्या तिन्ही विभागातील ५0 अभियंते अन् कर्मचाऱ्यांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनासाठी आवश्यक असलेल्या रोटी, कपडा व मकानसाठी झेडपी अभियंत्यांचे योगदान महत्वाचे आहे. जबाबदारीने व बिनचूकपणे काम करणे हीच अभियंत्याची खरी ओळख असल्याचे त्यांनी नमूद केले.असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले.

अभियंता दिनाचे औचित्य साधून सोलापूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम, जलसंधारण आणि ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अभियंता पुरस्कार वितरण प्रसंगी ते बोलत होते. फडकुले सभागृहात सोमवारी आयोजित कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, संतोष कुलकर्णी, संजय धनशेट्टी, संजय पारसे, उपअभियंता सुनील कटकधोंड, श्रीमती बिटला, अभियंता संघटनेचे अतुल सरडे, पंडित भोसले आदी उपस्थित होते. प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्याहस्ते सर विश्वेश्वरय्या मोक्षगुंडम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांनी स्वागत केले.

प्रास्ताविकात कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे यांनी कार्यक्रम आयोजनामागचा हेतू सांगितला. कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांनी यंदा अभियंत्याबरोबरच त्यांना कामात मदत करणाऱ्या टेंडर क्लार्क व सहाय्यकांचाही समावेश करण्यात आल्याचे स्पष्ट केले. कार्यकारी अभियंता संजय पारसे यांनी जलसंधारणचे अभियंते ग्रामीण भागात दुर्गम ठिकाणी जाऊन काम करतात. कशाची तमा न बाळगता शेतीसाठी त्यांनी दिलेले योगदान महत्त्वाचे असल्याचे नमूद केले. निवृत्त कार्यकारी अभियंता पंडित भोसले यांनी सोलापूर जिल्ह्यात ७५ च्या दुष्काळात तयार झालेले तलाव आहेत. आता बांधावर गवत व झाडी वाढलेली आहे. अशा ठिकाणी झेडपीचे अभियंता सेवा देतात. त्यांचे काम खूप मोठे आहे. या अभियंत्याशिवाय शासनाच्या योजना यशस्वी होऊ शकत नाहीत. त्यामुळे सीईओ कुलदीप जंगम यांनी शासन स्तरावर पाठपुरावा करून राज्यस्तरीय अभियंता पुरस्कार सुरू करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

आपण एका समाजामध्ये सर्व लोकांसोबत काम करतो. सरपंच, ग्रामसेवक सदस्य व नागरिक या सर्वांना सोबत घेऊन काम करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी जिल्हा परिषदेच्या तिन्ही विभागातील ५० अभियंते व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. पुरस्कारप्राप्त कर्मचाऱ्यांतर्फे भूमकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले.

कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अविनाश गोडसे, झहीर शेख, संजय कांबळे, चेतन वाघमारे, वीरुपक्ष जेऊरे, म्हमाने,वेदपाठक, शशिकला म्हेत्रे, जोत्स्ना साठे, चेतन भोसले यांनी परिश्रम घेतले.

### सर्वांना सोबत घेऊन काम करणे हे अभियंत्यांना चॅलेंज



जीवनासाठी काय लागते, रोटी, कपडा, मकान हे महत्त्वाचे अंग आहे. शेतीला लागणारे पाणी, घर उभारण्यासाठी लागणारी यंत्रणा आणि कपड्याची मशिनरी या सगळ्यांच्या निर्माणमध्ये अभियंताचे योगदान आहे. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांनी धरण व इतर अनेक प्रकल्पामध्ये महत्त्वाचे योगदान दिले. त्यांचा आदर्श घेऊन झेडपीच्या अभियंत्यांनीही काम करणे आवश्यक असल्याची अपेक्षा व्यक्त केली. सर्वांना सोबत घेऊन काम करणे हे अभियंत्यांना चॅलेंज आहे.

**- कुलदीप जंगम, सीईओ, झेडपी**

### अभियंते म्हणजे जिल्हा परिषदेच्या विकासाची चाके



यांनी अभियंते म्हणजे जिल्हा परिषदेच्या विकासाची चाके आहेत असे सांगितले. ग्रामीण भागाच्या विकासात अभियंते मोलाची कामगिरी बजावतात. गेल्या वर्षभरात बांधकाम, जलसंधारण व जलजीवनमध्ये अभियंत्यांनी केलेल्या अतुलनीय कामगिरी केली आहे.

**- संदीप कोहिनकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, झेडपी**

# आमदार देशमुखांनी भक्ती अन् शक्तीची परंपरा जोपासली : सुधाकर इंगळे महाराज

## लोकमंगलच्या भजन-भारूड स्पर्धेस चांगला प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

आमदार सुभाष देशमुख यांनी लोकमंगलच्या माध्यमातून मागील २४ वर्षे खंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे. तर यावर्षी आयोजित केलेल्या भजन, भारुड स्पर्धेमुळे सांप्रदायास प्रोत्साहन मिळाले आहे. याबरोबरच बँकेच्या माध्यमातून १३०० नवीन उद्योजक उभा केले असून, भक्ती व शक्तीची परंपरा आ. देशमुख यांनी जपली आहे.

लोकमंगल बँक व लोकमंगल फाउंडेशन आयोजित भजन व भारूड स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभाच्या वेळी इंगळे महाराज बोलत होते. यावेळी आमदार सुभाष देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. लोकमंगल बँक व लोकमंगल फाउंडेशनने आयोजित केलेल्या भजन व भारुड स्पर्धेच्या माध्यमातून मला भगवंताची सेवा करण्याची संधी मिळाली, मी फक्त निमित्तमात्र आहे, आपणा सर्वांच्या सहकार्यामुळेच लोकमंगल समूहाची प्रत्येक योजना आजपर्यंत यशस्वी होत आली आहे, असे भावोद्गार आ. सुभाष देशमुख यांनी काढले.

२८ व २९ सप्टेंबर रोजी जगदीशश्री मंगल कार्यालय व दिपाली केटरर्स येथे भजन व भारुड स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही स्पर्धांना सोलापूर चांगला प्रतिसाद मिळाला. भजन स्पर्धेमध्ये ५० संघाने आपला सहभाग नोंदवला. भारुड स्पर्धेमध्ये २५ जणांनी भाग घेतला. पंढरपूर, मोहोळ, करमाळा, सांगोला, दक्षिण व उत्तर तसेच सोलापूर शहरातील स्पर्धकांनी भाग घेतला होता.

भजन हा हृदयातून निघालेला हृदयाला भिडणारा सूर आहे, तर भारुडामध्ये विनोदाच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले जाते. राजकारणी मंडळी अशा स्पर्धांचे आयोजन करत नसतात पण बापूसाहेबांनी या स्पर्धांचे आयोजन करून भक्ती परंपरा जपली आहे, अशा शब्दात अनेकांनी गौरव केला. विजयी संघ- भजन स्पर्धा - रामकृष्ण हरी भजनी मंडळ सेटलमेंट सोलापूर यांनी प्रथम क्रमांकाचे १५ हजाराचे पारितोषिक पटकावले तर द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक जयशंकर ग्रुप माळीनगर यांना ११000, तर ओम श्रीहरी भजनी मंडळ जुळे सोलापूर यांना तिसऱ्या क्रमांकाचे ७000 चे पारितोषिक मिळाले. भारुड स्पर्धेत वैशाली वसंत वळसंकर - शकुन सांगावया आले या भारुडास ११000 चे प्रथम पारितोषिक मिळाले. सरिता जोशी अक्कलकोट बुरगुंडा होईल तुला ७000 चे द्वितीय पारितोषिक, तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक देविदास जगताप सोलापूर यांच्या एका चोराने गाव चोरीले पाच हजार रुपयांचे या भारूडाने पारितोषिक पटकाविले. रमा कुलकर्णी, गोविंद लोंढे यांनी भजन स्पर्धेसाठी, तर रत्नप्रभा सहस्त्रबुद्धे, गार्गी कुलकर्णी यांनी भारुड स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून काम पाहिले. यावेळी व्यासपीठावर हभप सुधाकर महाराज इंगळे, राम जाधव, अंबिका पाटील, आनंद बिराजदार, नीलिमा शितोळे, फाउंडेशनच्या संचालिका हभप पुनम साळुंखे , डॉ. हवीनाळे , अनंत चव्हाण, लोकमंगल बँकेचे संचालक जितेंद्र लाड आदी मान्यवर उपस्थित होते. मारुती तोडकरी लोकमंगल फाउंडेशनच्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी दिली. हिबारे यांनी सूत्रसंचालन केले, लोकमंगल फाउंडेशनच्या व्यवस्थापिका दिपाली कोठारी यांनी आभार मानले. शैलेश आयवळ, राहुल कोल्हटकर, राहूल कुलकर्णी, अनुप कुलकर्णी, दीपक चोपडे, ओंकार मुळे, ओंकार कंटिकर, प्रवीण खरात, पंकज यादव, मयुरा अवताडे यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राचार्यांची सभा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

केगाव येथील भारतरत्न इंदिरा गांधी अभयांत्रिकी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्निकल विद्यापीठाच्या जिल्ह्यातील सब सेंटरमधील १० महाविद्यालयाच्या प्राचार्यांची सभा उत्साहात झाली.

सुरुवातीस प्राचार्य डॉ. अनिल देशमाने यांनी सभेची रूपरेषा सांगितली. या सभेत परीक्षेच्या, इतर अडचणीसंदर्भात सर्व महाविद्यालयाची प्राचार्यांची मत जाणून घेतली असून या सर्व अडचणी विद्यापीठाचे कुलगुरूंना या बाबी निदर्शनास आणून द्याव्यात असे ठरले. यावेळी महाविद्यालयाचे अध्यक्ष रवींद्र डी गायकवाड यांनी सर्व प्राचार्यांचे स्वागत केले. फेबटकचे प्राचार्य डॉ. आर बी शेंडगे यांची विद्यापीठात व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार केला. यावेळी ऑर्चिडचे प्राचार्य डॉ. बी के सोनजे, व्ही. व्ही.पी.चे प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड ए.जी पाटीलचे प्राचार्य व्ही. व्ही. पोतदार, अकलूजचे प्राचार्य डॉ. पी. ए. ढवळे, कर्मवीर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पंढरपूर प्राचार्य डॉ. जे. एल. मोडेगावकर, सिद्धेश्वर वुमन्सचे प्राचार्य एस. सी म्हमाणे एस.आय.इ.टी. पानीवचे प्राचार्य एस. पी खंडागळे, प्रोफेसर संजय वाईकर, तुळजापूरचे प्राध्यापक आर एच आडेकर, पीटीसी सांगोला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर बी शेंडगे, बिगसीचे प्रोफेसर व्ही. मठपती आदी उपस्थित होते.

# श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निकच्या विद्यार्थिनींसाठी १०० तासांची प्रशिक्षण कार्यशाळा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलीटेक्निकमध्ये अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थीनींसाठी महिंद्रा आणि महिंद्रा कंपनीच्या सीएसआर फंडातून आय.सी.जे व सेंटम फाउंडेशनतर्फे १०० तासाची प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात झाली. उर्वरित प्रशिक्षण कार्यशाळा १५ ऑक्टोबरपर्यंत ऑनलाइन माध्यमातून चालू राहणार आहे. प्रशिक्षण कार्यशाळा ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाकडून आयोजित करण्यात आली होती.

आय.सी.जे. कंपनीतर्फे प्रशिक्षक सुमित प्रकाश व रोशन सिंग यांनी व्यावहारिक कौशल्ये, वेळ व्यवस्थापन, निरीक्षण क्षमता, सांघिक कार्याची माहिती आणि कायदा, गुणधर्म आणि ध्येय नियोजन, रेझूम बनवणे, समस्या सोडवणे आणि निर्णय घेणे, लेखन कौशल्य, अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट्य, प्रेरणा दायक कथा या विषयांवर मार्गदर्शन केले, जेणेकरून त्यांच्या रोजगारक्षमतेत सुधारणा होईल.

विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त करताना महिलांना समाजात सन्मान प्राप्त करून देण्यासाठी व समाजातील विविध स्तरावरील महिलांना आत्म सन्मान, अंतर्गत मजबुती आणि रचनात्मक विकासास कारणीभूत होतील असे महिला सक्षमीकरण कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यक्रमांमुळे महिला आत्ता सर्व समस्यांवर मात करत आपले कौशल्य, आत्मविश्वास आणि उपयोगितेबाबतीत अग्रेसर होताना दिसतील. आपल्या कुटुंबामध्ये, इतर महिलासाठी आणि समाजामध्ये शांतीचे आणि सकारात्मक सामाजिक परिवर्तनाचे प्रतिनिधित्व करताना दिसतील. कार्यशाळा आयोजित केल्याबद्दल प्राचार्य गजानन धरणे, महिंद्रा कंपनी तसेच सेंटम फौंडेशन व आय.सी.जे. चे प्रशिक्षक यांचे आभार मानत या प्रकारचे प्रशिक्षण भविष्यात सर्वांना उपयोगी ठरेल असे मत व्यक्त केले. कार्यशाळा पार पाडण्यासाठी टीपीओ प्रमोद मेणसे, प्रा. विवेकानंद दासरी, प्रा. गायत्री लंगोटे प्रा. सायली तळेकर, प्रा. श्रुतिका तळेकर, शिवानंद माळगे, किरण गलगली व विशाल दूधगी यांचे सहकार्य लाभले.







## उस्मानाबाद जनता सहकारी बँक लि; उस्मानाबाद

*आपली उस्मानाबाद जनता सहकारी बँक लि.९२ व्या वर्षात पदार्पण करीत आहे बँकेचे सन्माननीय सर्व खातेदार, सभासद, हितचिंतक यांना बँकेच्या ९२ व्या वर्धापन दिनाच्या खुप-खुप शुभेच्छा!*

◀ अत्यल्प व्याजदरात कर्ज उपलब्ध ▶

| अ.क्र. | बँक कर्ज प्रकार | व्याजदर (द.सा.द.शे) |
|---|---|---|
| १) | कॅश क्रेडीट (सी.सी.) कर्जे | ११% ते १२% |
| २) | हप्तेबबंद कर्जे | १२% ते १३% |
| ३) | 'युवा सुदृढीकरण' दैनंदिन कर्ज परतफेड योजना (रु.१.०० लाखाला दैनंदिन रु.११०/- कर्ज परतफेड तीन (०३) वर्षाची योजना) | १२.२५% |
| ४) | सोने तारण कर्ज (फक्त महिलांसाठी) | ९% |
| ५) | सोने तारण कर्ज (इतरांसाठी) | ९.५०% |
| ६) | सोने तारणावर कॅश क्रेडिट (OD) कर्ज | ११% |
| ७) | वैद्यकीय व्यवसाय | १०% |
| ८) | चार्टर्ड अकौंटंट (सी.ए.) | १०% |
| ९) | LIC पॉलीसीवर व्यवसायासाठी व वैयक्तीक कारणासाठी व Cash Credit टर्म लोन | ११% |
| १०) | सौर उर्जा कर्ज योजना घर, हॉटेल, कारखाने, व्यावसायिक प्रतिष्ठाने, शेती यावर सौर उर्जा बसविणेसाठी कर्ज | ११% |
| ११) | १) वाहनाच्या ऑनरोड किंमतीच्या ८०% पर्यंत कर्ज मंजुर (रु.१५.०० लाख पर्यंत)<br>२) रु.१५.०० लाखापेक्षा जास्त ७०% पर्यंत | १२.५०% |

* टिप : १) सीबील स्कोअरवर आधारीत प्रचलित व्याजदरापेक्षा ०.५०% (अर्धा) किंवा १% कमी व्याजदार
२) हप्तेबंद कर्जास EMI पध्दतीने परतफेड मुदत - ५ ते ७ वर्ष
३) घर/फ्लॅट खरेदी, घर बांधकाम EMI पध्दतीने परतफेड मुदत - ५ ते १५ वर्ष

* अटी लागू.

आपले विनीत

डॉ.संजय घोडके, मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री.वैजीनाथ शिंदे, उपाध्यक्ष
श्री.वसंत नागदे, अध्यक्ष

समस्त संचालक मंडळ व कर्मचारी वृंद.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०१

**तुजविण एकादियाकडे । परमाणूहि एतुला कोडें ।**
**अवकाशु पाहतसें परि न सांपडे । ऐसें व्यापिलें तुवां ।।**

विश्वरुपाचे दर्शन होण्याअगोदर अर्जूनाला भगवंत हा एका विशिष्ट आकाराचा, सौंदर्याचा असल्याचे वाटत असे. मात्र विश्वरुपदर्शनानंतर त्याच्या लक्षात आले की, भगवंत म्हणजे विशिष्ट आकाराची, सौंदर्याची एक व्यक्ती नसून सर्व प्राणीमात्रांचे आकार, रंग, रुप ईश्वरात मोडतात. ईश्वर एखाद्या विशिष्ट ठिकाणीच असतो, हा अर्जूनाचा भ्रमही आता नष्ट झाला आहे. म्हणून तो म्हणतो आहे.

**तुजविण एकादियाकडे । परमाणूहि एतुला कोडें ।**
**अवकाशु पाहतसें परि न सांपडे । ऐसें व्यापिलें तुवां ।।.**

अर्थात, हे ईश्वरा, तुझ्याखेरीज परमाणू एवढातरी अवकाश कोठे तरी सापडेल म्हणून मी पाहत आहे, परंतू हे पाहणे व्यर्थ आहे. अर्जूनाला आलेली ही भगवंताची अनुभूती तुमच्या आमच्यासाठी अत्यंत महत्वाची आहे. अर्जूनाला विश्वरुप दर्शन होण्याअगोदर भगवंत म्हणजे एक विशिष्ट आकार, रंग, रुप धारण केलेले व्यक्तीमत्व वाटायचे. अगदी अर्जुनाप्रमाणे आ-पणालाही भगवंताबाबतची कल्पना अशीच असते. विश्वरुपाचे दर्शन



झाल्यानंतर भगवंताने व्यापली नाही अशी जागाच नाही, त्याचबरोबर भगवंताचा अंश नाही असे प्राणीमात्रच नाही असा अर्जुनाचा आता आत्मविश्वास झाला आहे. आपणही अर्जुनाचा हा भाव स्वीकारला तर आपल्या व इतरांच्या जीवनातील बऱ्याच समस्या कमी होतील. भगवंत बसला आहे की, उभा आहे? त्याचे रुप कसे? त्याचे वय काय? या प्रश्नांचा विचार केला असता अर्जूनाच्या लक्षात आले की, भगवंताला कोणताही निश्चित आकार, रंग, रुप नाही. तो स्वयंभू असून तो स्वत:च स्वत:चा आधार आहे. त्याची विशिष्ट अशा एखाद्या जीवापासून उत्पत्ती झालेली नाही. त्यामूळे विशिष्ट असा आकार, रंग, रुप देऊन ईश्वराला न पाहता, चालत्या बोलत्या, त्याचबरोबर मुक्याप्राण्यांमध्येच ईश्वर भरुन उरला असल्याचे अर्जूनाचे मत बनले आहे. अर्जूनाच्या या मताला आपणही दूजोरा दिला पाहिजे. ईश्वराला विशिष्ट एखाद्या ठिकाणी किंवा विशिष्ट रंग,रुपात न पाहता, सर्व प्राणीमात्रात पाहून त्याची सेवा करण्याची आज गरज निर्माण झाली आहे. ईश्वर हा सर्वत्र भरुन उरला आहे, हे वाक्य आचरणात आणण्याची आज गरज आहे. सर्व देही जेव्हा ईश्वराला आपण पाहू, तेव्हा लहान-मोठा असा भेद राहणार नाही. केवळ आपल्याकडून होणाऱ्या भेदभावामूळे आज समाजात मोठया प्रमाणात प्रश्न निर्माण झाले आहेत. या प्रश्नांची उकल करुन त्यांची सोडवणूक करण्याची आपलीच जबाबदारी आहे. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी आपण ईश्वराला सर्वदेही, जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी पाहून समता प्रस्थापित करण्याचा स्तुत्य प्रयत्न करु या. आपल्या या प्रयत्नाला यश येऊन माऊली कृपेने आपल्याला आनंद मिळाल्याशिवाय राहणार नाही.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : मंगळवार**
**दि. १ ऑक्टोबर २०२४**
**विक्रम संवत् २०८०,**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - भाद्रपद**
**कृ. चतुर्दशी (२१.३८)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र- पू. फाल्गुनी (०९.१५)**
**योग - शुक्ल (२६.१६)**
**करण - विष्टि (०८.२१)**
**सुर्योदय - ०६.३१**
**सूर्यास्त - १८.२५**

**दिनविशेष -**
**अमावास्या (रात्री ९.३८ नंतर), श्राध्य चतुर्दशी**
**चांगला दिवस**

**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३ ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष :** मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृषभ :** आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. प्रवास सुखकारक.

**मिथुन :** आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**कर्क :** मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.

**सिंह :** कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. वहान चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे.

**कन्या :** मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ :** चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक :** सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

**धनु :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पश्चिम
आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील. आळस करू नका.

**मकर :** नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कुंभ :** सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन :** आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. कामाची गती अशीच राहू द्या. व्यापारा निमित्ताने केलेला प्रवास सफल होईल. अश्वासन देऊ नका.

# रुपाभवानी मंदिर परिसरात स्टॉल्स थाटण्यास वेग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. ३० सप्टेंबर-**

सोलापूरची कुलस्वामिनी श्री रूपाभवानी देवी मंदिर परिसरात नवरात्रोत्सवानिमित्त लगबग दिसून येत आहे. श्री रुपाभवानी भक्त मंडळ संस्थेच्या वतीने श्री रूपाभवानी चौक परिसरात विविध प्रकारचे स्टॉल्स थाटण्यास सुरुवात झाली आहे. मोजमाप केलेल्या जागेवर लोखंडी अँगल आणि बांबूच्या साहाय्याने दुकाने सजवण्यास सुरुवात झाली आहे. विविध खेळाचे साहित्य, प्रसादिक साहित्य, महिलांचे प्रसाधन साहित्य, अशा विविध वस्तूंसाठी दरवर्षी स्टॉल लावले जातात. कोजागिरी पौर्णिमेपर्यंत सदरचे स्टॉलची परवानगी महापालिका प्रशासनाकडून भक्त मंडळ संस्थेला दिली जाते.

अवघ्या महाराष्ट्राची कुलस्वामिनी आदिमाया आदिशक्ती श्री तुळजाभवानी मातेचा शारदीय नवरात्र महोत्सव अवघ्या दोन दिवसात येऊन ठेपला आहे.





त्याअनुषंगाने शहरात नवरात्रोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. तुळजाभवानी मातेचे प्रतिरूप असणाऱ्या श्रीरूपाभवानी देवी मंदिरात देखील विविध धार्मिक विधी आणि कार्यक्रम घटस्थापनेपासून ते कोजागिरी पौर्णिमेपर्यंत संपन्न होणार आहेत. या काळात देवी भक्तांची मंदिरात मोठी मांदियाळी असते. देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना यावेळी खरेदी करण्यासाठी सदरचे स्टॉल्स लावले जातात.

### पाणी गिरणी चौक ते रुपाभवानी देवी मंदिरापर्यंत स्टॉलची मांडणी

श्रीरूपाभवानी देवी मंदिराकडे जाणाऱ्या पाणी गिरणी चौकापासून ते मंदिरापर्यंत रस्त्यांवर स्टॉल्स लावले जातात. दरवर्षी नवरात्र काळात स्टॉल्स लावून विविध वस्तूंची विक्री या माध्यमातून केली जाते. महापालिका प्रशासन आणि भक्तमंडळ यांच्याकडून सदरचे स्टॉल मोजमाप करून लावले जातात. यासाठी स्टॉल धारकांकडून आकारानुसार कर आकारणी केली जाते.

### हालते देखावे आकर्षणाचे केंद्रबिंदू

शहरातील विविध सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळाच्या वतीने हालते देखावे साकारले जातात. या देखाव्यांची तयारी देखील अंतिम टप्प्यात आली आहे. शहराच्या बाळीवेस, मराठा गल्ली, टिळक चौक, कस्तुरबा मार्केट, भवानी पेठ, येथे विविध प्रकारचे हालते आणि स्थिर देखावे साकारले जातात. त्या अनुषंगाने देखाव्याची पूर्वतयारी गेल्या एक महिन्यांपासून सुरू असते. त्यानंतर वास्तविक स्वरूपात देखावा उभारला जात आहे. बाळीवेस येथे शक्तीपूजा नवरात्रोत्सव मंडळाच्या वतीने यावर्षी देखील नाविन्यपूर्ण असा देखावा साकारला जात आहे. देवीभक्तांसाठी हे देखावे आकर्षणाचे केंद्र ठरत आहेत

## इरफान मुजावर यांना पीएच.डी. पदवी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

महापारेषण कंपनी (MSETCL) येथे कार्यरत असलेले सहायक अभियंता इरफान इसाक मुजावर यांना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरकडून विद्युत अभियांत्रिकीमध्ये पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली. त्यांचा संशोधन विषय 'रिक्टीव्ह पॉवर कम्पेन्सेशन ईन डिस्ट्रीब्युशन सिस्टीम युजींग फॅक्टस कंट्रोलर्स' या विषयावर शोध प्रबंध सादर केला होता. त्यांना इंजिनीअरिंग कॉलेज कराड येथील शिक्षक डॉ. ए. एम. मुल्ला, प्रा. डॉ. दौलतराव आहेर यांचा मार्गदर्शन लाभले. इरफान मुजावर यांनी वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली येथून बी.ई. (इलेक्ट्रिकल) आणि एम.टेक. (इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीम) पदवी प्राप्त केली आहे. एम.टेक. अभ्यासक्रमात सुवर्णपदक मिळवण्याचा मान त्यांनी मिळवला आहे.



## गुजराती मित्रमंडळ महिला विभाग अध्यक्षपदी शहा







### सचिवपदी अर्पिता बक्षी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

श्री सोलापूर गुजराती मित्र मंडळाच्या महिला विभागाची नवीन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी प्रिती कौशिक शहा आणि सचिवपदी अर्पिता प्रणव बक्षी यांची निवड जाहीर करण्यात आली.गुजराती मंडळाचे सचिव जयेश पटेल यांनी २०२४ ते २०२६ या दोन वर्षांसाठी ही निवड असेल अशी घोषणा केली. इतर कार्यकारी सभासद खालीलप्रमाणे आहेत.

उपाध्यक्ष कविता पटेल, सहसचिवा ज्योती देढिया, खजिनदार सीमा गांधी, माजी अध्यक्षा पारुल पटेल, नीता दंड, वनिता पटेल, कलावती पटेल, संगीता मेहता, बिना पंचमिया, रिता पटेल, भारती पटेल यांचा समावेश आहे. महिला विभागाच्या समन्वयक म्हणून स्वाती देसाई आणि सल्लागार सदस्य म्हणून भारती पटेल, श्रीमती हसुमती जव्हेरी आणि इंदिरा पटेल यांची फेरनिवड झाली. प्रारंभी पारुल पटेल यांनी सभासदांनी आपल्या कारकिर्दीत केलेल्या सहकार्याबद्दल आणि सहकार्याबद्दल आभार मानले. यावेळी सोलापूर गुजराती मित्र मंडळाचे अध्यक्ष मुकेश मेहता यांनी महिला विभागातर्फे करण्यात येत असलेल्या कार्याचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. नवनियुक्त सचिव अर्पिता बक्षी यांनी आभार मानले. यावेळी श्री सोलापूर गुजराती मित्र मंडळाचे उपाध्यक्ष मणिकांत दंड, खजिनदार चिमन पटेल, सहसचिव संदीप जव्हेरी उपस्थित होते.

## केवळ सकल आदिवासी महादेव कोळी समाजाच्या बॅनरच्या आंदोलनाला पाठिंबा

**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

सकल आदिवासी महादेव कोळी समाजाच्या बॅनरखालीच होणाऱ्या आंदोलनाला आमचा पाठिंबा आहे. समाजाच्या निर्णयाविरोधात इतर संघटनेच्या नावाखाली होणारे आंदोलन ही स्टंटबाजी व दिशाभूल आहे, असा आरोप कोळी महासंघाचे राज्य उपाध्यक्ष अरुण कोळी यांनी पत्रकार परिषदेत केला आहे. पंढरपूर येथे चंद्रभागेच्या वाळवंटामध्ये सकल कोळी समाजाची बैठक झाली होती.

या बैठकीत समाजाची आंदोलने ही सकल आदिवासी कोळी समाजाच्या बॅनर खालीच व्हावीत असेल ठरले आहे. असे असताना समाजाच्या निर्णयाविरोधात जाऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धाडस सामाजिक संघटनेच्या वतीने उपोषण करण्यात येत आहे. या ठिकाणी सकल आदिवासी कोळी समाजाचा बॅनर लावायला हवा होता पण लावण्यात आला नाही. यामुळे समाजाचा कोणताही संबंध नाही, असेही कोळी यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेस दत्तात्रय यादव, अमोल माने आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक, शिक्षकेतर सेनेचे पुरस्कार जाहीर

### ६ ऑक्टोबरला वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक व शिक्षकेत्तर सेनेच्यावतीने राज्यस्तरोय उपक्रमशिल संस्था, उपक्रमशिल शाळा, राज्यस्तरीय गुणवंत मुख्याध्यापक, गुणवंत शिक्षक आणि गुणवंत शिक्षकेत्तर कर्मचारी अशा ३२ जणांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे, अशी माहिती मनसे शिक्षक सेनेचे प्रदेश सरचिटणीस जयवंत हक्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

रविवार दि. ६ ऑक्टोंबर रोजी दुपारी एक वाजता शेठ मोरारजी कानजी सभागृह- स्टेशन रोड पंढरपूर येथे या पुरस्काराचे वितरण होणार आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते सहकार सेनेचे राज्य अध्यक्ष दिलीप बापू धोत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या नेत्या शालिनी ठाकरे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

### पुरस्कारासाठी यांची झाली निवड

राज्यस्तरीय शिक्षकेतर पुरस्कारासाठी शाळा आणि महाविद्यालयात काम करणारे कर्मचारी लातूर जिल्ह्यातील जवळा येथील समता माध्यमिक विद्यालयाचे पांडुरंग देडे, मंगळवेढा तालुक्यातील बालाजी नगर येथील कला आणि विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे श्रीकांत मेलगे, इचलकरंजी कलावंत मळा येथील अनंतराव भिडे विद्यामंदिरचे बाळासाहेब मोकाशी, आणि सोलापुरातील शिवाजी मराठी विद्यालयातील प्रभाकर कारंडे यांची निवड करण्यात आली आहे, असे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते सहकार सेनेचे राज्य अध्यक्ष दिलीप बापू धोत्रे यांनी सांगितले.

यावेळी मनसे शिक्षक सेनेचे राज्याध्यक्ष संजय चित्रे, मनसे नेते राजा चौगुले, मनसे नेते बाबू वागस्कर, पुणे शहर मनसे महिला अध्यक्ष वनिता वागस्कर, मनसे शिक्षक सेनेचे प्रदेश सरचिटणीस जयवंत हक्के, उपाध्यक्ष संतोषकुमार घोडके, मनसे लोकसभेचे सोलापूर जिल्ह्याचे अध्यक्ष प्रशांत इंगळे, मनसे जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

राज्यातील संस्था आणि शाळा पुरस्कारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील बालविकास जनकल्याण व सांस्कृतिक सेवाभावी शिक्षण प्रसारक मंडळ, नाशिक येथील मराठा विद्या प्रसारक समाज, सोलापुरातील शेळगी येथील साईबाबा शिक्षण प्रसारक मंडळ, धुळे येथील प्राथमिक विद्यामंदिर, आणि कोल्हापूर येथील प्री-प्रायमरी स्कूल या संस्था आणि शाळांना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. या पत्रकार परिषदेला संतोष घोडके, विनायक महिंद्रकर, प्रशांत इंगळे, विश्वास गजभार, अमर कुलकर्णी, जैनुद्दीन शेख, प्रकाश कोळी, अभि रंपुरे, वीरसंगाप्पा भोज आदींची उपस्थिती होती.



# मुंबईचे ज्येष्ठ साहित्यिक फरीद खान यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

मुंबईचे ज्येष्ठ उर्दू साहित्यिक व उर्दू कारवाँचे अध्यक्ष फरीद खान यांचा ज्येष्ठ रंगकर्मी सय्यद इकबाल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी अभा मुस्लीम मराठी साहित्य परिषदचे सचिव अय्यूब नल्लामंदू यांनी डॉ. फरीद खान यांचा व त्यांचा विविध कार्याचे परिचर करून दिले. यावेळी उर्दू विभाग प्रमुख प्रा. डॉ. शफी चोबदार, भारतीय उर्दू विकास फौंडेशनचे सुलतान अख्तर, विरसा फौडेशनचे मजहर अल्लोळी, कवि वजाहत सत्तार, डॉ. गैस शेख, सफदर सय्यद आदींनी सोलापुरात होत असलेल्या उर्दू मराठी साहित्य व रंगभूमीच्या कार्याची माहिती सांगितली. सूत्रसंचालन अय्यूब नल्लामंदूनी केले तर आभार सफदर सप्यद यांनी मानले.



## ह. दे. प्रशालेच्या पहिल्या दहावी वर्गाचा सुवर्णमहोत्सव उत्साहात

**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

हरिभाई देवकरण प्रशालेच्या दहावीची पहिली बॅच १९७४-७५ च्या पन्नास वर्षपूर्तीनिमित्त शाळेस सिंथेटाझर आणि दहा स्टील कपाटे भेट देण्यात आली. त्याची प्रतिकात्मक चावी स्कूल कमिटीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन आणि मुख्याध्यापिका दीपा फाटक यांच्याकडे भेटवस्तू निधी समितीचे सुनील कल्लूरकर आणि संजीव कुसूरकर यांनी सुपुर्द केली.

तसेच बारा गरजू मुलांची फी रु ४२ हजार बॅचचे वतीने भरण्यात आली. यासाठी मेळाव्यात सहभागी मित्रमैत्रिणींनी स्वेच्छा देणगी उपक्रमाचे माध्यमातून सुवर्ण महोत्सवाच्या आठवणी संस्मरणीय करण्याचा प्रयत्न केला. निवृत्त ज्येष्ठ शिक्षिका पुष्पा आगरकर आणि सुजाता मेहता यांचा सत्कार करण्यात आला. निवृत्त सहाय्यक दत्तू वाघमोडे यांनी घंटानाद स्मृती जागवल्या. संयोजक मंजुषा गाडगीळ, नरेंद्र पाठक आणि चारुहास खोपकर ह्यांनी नयोजन केले होते. मुळे सभागृहात दिवसभर आयोजित केलेल्या समारंभात शंभरपेक्षा अधिकजण विविध ठिकाणांहून अगदी परदेशातूनही आलेल्या मित्र मैत्रिणींनी पन्नास वर्षांनंतर एकत्र भेटण्याचा आनंद घेतला.

# अखेर जिल्हा अतिवृष्टीग्रस्त मदतीच्या यादीत

### शेतकरी व सामाजिक कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांना आले यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० सप्टेंबर-**

मोठ्या प्रमाणात पाऊस झालेल्या सोलापूर जिल्ह्याला अतिवृष्टीग्रस्त मदतीच्या यादीतून वगळण्यात आले होते. राज्यातील ३५ जिल्ह्यांपैकी २६ जिल्ह्यांचा या अतिवृष्टीदृष्ट मदतीच्या यादीमध्ये समावेश करण्यात आला होता. जिल्ह्याला वगळल्याने सामाजिक कार्यकर्ते पैलवान माऊली हेगडे आणि शेतकऱ्यांनी याबाबत आवाज उठवला होता. त्यामुळे आता अतिवृष्टीग्रस्त मदतीच्या यादीमध्ये सोलापूर जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे.

राज्यात सर्वाधिक पाऊस हा सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यात झाला होता. तशी पावसाची नोंद देखील झाली होती. जिल्ह्यातील खरिपाची अनेक पिके पाण्याखाली नष्ट झाली आहेत. हजारो हेक्टर वरील पिकांचे पावसामुळे मोठं नुकसान झाले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पीक नुकसानीचे पंचनामे होऊन त्यांना मदतीची गरज आहे. असं असतानाही जिल्ह्याचा अतिवृष्टी ग्रस्त मदतीच्या



यादीमध्ये समावेश करण्यात आला नव्हता. याबाबत सामाजिक कार्यकर्ते पै.माऊली हेगडे यांनी मुख्यमंत्री, कृषीमंत्री यांना निवेदन देत शेतकऱ्यांसोबत जिल्हा प्रशासनाला निवेदन करत तसेच आंदोलनाचा इशारा दिला होता.

### तलाठी, सर्कल शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचलेच नाहीत

अतिवृष्टी ग्रस्त मदतीच्या यादीमध्ये सोलापूर जिल्ह्याचा समावेश झाला असला तरी अद्याप महसूल प्रशासनातील तलाठी/सर्कल शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले नाहीत. त्यामुळे मदतीच्या यादीमध्ये जिल्ह्याचा समावेश करून पंचनामेचं केले नाहीत तर शेतकऱ्यांना मदत कशी मिळणार ? सोलापूर जिल्ह्याचा अतिवृष्टी मदतीच्या यादीमध्ये समावेश करून मदतच द्यायची नाही का ? किंवा सरकार आमच्या तोंडाला पानं पुसत आहे का ?

**- पै.माऊली हेगडे, सामाजिक कार्यकर्ते**

### आम्हाला आता शेतीसाठी आणि प्रपंचाच्या गरजांसाठी दुसरा सावकार शोधावा लागेल

खासगी सावकाराकडून कर्ज काढून उडीद पिक लावलं होतं. उडीद पिकावर सावकाराचे कर्ज, मुलाचा शिक्षणाचा खर्च आणि मुलीचे बाळंतपण भगवायचं होतं. मात्र जादा पडलेल्या पावसामुळे उडीद पाण्यात डुबलय. त्या पिकाबरोबर आता आमचं नशीब देखील डुबलय. अशा आसमानी संकटातून बाहेर काढण्यासाठी आता शासनानेचं मदतीचा हात द्यावा.अन्यथा आम्हाला आता शेतीसाठी आणि प्रपंचाच्या गरजांसाठी दुसरा सावकार शोधावा लागेल.

**- अफसर मुजावर, शेतकरी कामती बु.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त



### भंडीशेगाव येथे आरोग्यासाठी नियमित योग शिबिराचे आयोजन

**करकंब, दि. ३० सप्टेंबर-**

भंडीशेगाव (ता. पंढरपूर) येथे कोहिनूर वेलनेस ग्रुपच्यावतीने दररोज पहाटे ५ ते ६ या वेळेत योगशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या योग शिबिरामध्ये शिबिरामध्ये किमान १०० विद्यार्थी, तरुण, वृद्ध नागरिक सहभागी होत आहेत. या योग शिबिराचे आयोजन गणेश पाटील, विजय पाटील यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे. या शिबिरास वेलनेस कोच म्हणून दादासाहेब आलदार, सोमनाथ सुरवसे हे मार्गदर्शन करीत आहेत. भंडीशेगाव येथे मागील ६ वर्षांपासून मुंबई येथील उद्योजक वृक्षमित्र अजित कंडरे यांनी वृक्षारोपणाची चळवळ सुरू केली. या चळवळीस खूप मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. यादरम्यानच ४२ एकर क्षेत्रात १७,५०० वृक्षांची लागवड करून ड्रीम गार्डन उभे केले आहे. अजित कंडरे यांच्या लग्नाच्या २५ व्या वाढदिवसानिमित्त अतिशय सुंदर अशा बुद्धपार्कची निर्मिती करण्यात आली आहे. गावातील विविध चौकात, संपूर्ण रस्त्यावरती वृक्षारोपण करण्यात आले. याप्रमाणेच संपूर्ण गावात स्वच्छता अभियानासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. स्वच्छता अभियाननाच्या यशस्वीतेनंतर ग्रामस्थांच्या निरोगी आरोग्यासाठी व्यायाम, योगासनाचे महत्त्व पटवून देण्याच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याच्या उद्देशाने ऑनलाईन पद्धतीने व्यायाम चालू होते. परंतु मागील काही दिवसापासून श्री. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तळावरती योग शिबिर चालू आहे. या आरोग्य विषयक उपक्रमास ग्रामपंचायत सदस्य मंगेश ननवरे, अनिल जाधव, विश्वास सुरवसे, विजया कंडरे उपस्थित असतात.



### दक्षिणमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या शाखांचे उद्घाटन

**मंद्रुप दि. ३० सप्टेंबर-**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष बळीराम साठे यांच्या हस्ते राष्ट्रवादीचे तालुका कार्याध्यक्ष गणेश मोरे यांच्या उपस्थितीत दक्षिण मधील वांगी, मनगोळी, गावडेवाडी, व अकोले या गावात शाखा उद्घाटन करण्यात आले. साठे यांनी आपल्या भाषणातून तसेच भविष्यात शेतकऱ्यांसाठी महाविकास आघाडीच महत्त्वाची आहे. महायुतीच सरकार हे देशात हुकूमशाही आणत असल्याचे सांगितले. कार्याध्यक्ष गणेश मोरे यांनी महाराष्ट्रात भाजपमुळे कायदा आणि सुव्यवस्था बिघडत आहे, सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांच्या पिकाला भाव मिळत नाही, उसाची बिले वेळेत मिळत नाहीत. भाजप सरकारच्या काळात महिला सुरक्षित नसल्याची टीका केली. यावेळी वांगीतील शाखाध्यक्ष सलीम मुल्ला, प्रमोद कोळी, जमीर शेख, बबलू शेख, मनगोळीचे शाखाध्यक्ष बाबासाहेब आंबुळे, मधुकर कांबळे, सोमनाथ पाटील, रियाज शेख, गावडेवाडीचे शाखाध्यक्ष बिरू गावडे,तानाजी हाके, बिराप्पा गावडे, नागेश गावडे, तर अकोले येथे शाखाध्यक्ष वैभव जाधव, नेताजी माने, तुळशीराम कांबळे उपस्थित होते. यासाठी गोरख चव्हाण, विकास चव्हाण, विठ्ठल घंटे, गणपत आंबुळे, गणेश गावडे, ब्रह्मा मिस्त्री, तानाजी येलगुंडे, बाबासाहेब माने, गोटू पाटील, समर्थ गुंड, पिंटू माने, अमोल माने यांचे सहकार्य लाभले.



### माढ्यात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा प्रांताधिकारी कार्यालयासमोर घंटानाद

**कुर्डूवाडी, दि. ३० सप्टेंबर-**

शेतकरी प्रश्नावर व रस्त्यासंदर्भात लहान बाळासारखी चेष्टा करणाऱ्या अशा अधिकाऱ्याला तहसीलदार म्हणण्याची आम्हाला लाज वाटते. तरी विभागीय आयुक्त पुणे यांनी स्वतः याबाबत चौकशी करुन तात्काळ कारवाई करावी. यासाठी माढा तालुका स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने सोमवारी कुर्डूवाडी येथील प्रांत कार्यालयासमोर हलगी व घंटानाद आंदोलन करण्यात आले. माढा तालुका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माढा तालुका प्रमुख प्रतापराव पिसाळ यांनी विभागीय आयुक्तांना विविध मागण्यांचे निवेदन दिले आहे. सदर हलगी घंटा आंदोलनात प्रताप पिसाळ, बापू पाटील, कोकाटे, विष्णू कुंभार, निलेश मेटे, राजेंद्र बनसोडे, गणेश शेळके, विष्णू पणबुडे, जीवनदास मेटे, राजूभाऊ देवकर, गणेश चोरमले, सोमा लोंढे, हनुमंत पाटील, योगेश हुलगे, नवनाथ कुंभार, संभाजी भोसले, पिंटू माने, श्रीमंत चोरमले, नासिर मुलाणी, कुलदीप गायकवाड यांचा सहभाग होता.



### 'सनराइज्'मध्ये स्टुडंट लेड कॉन्फरन्स

**टेंभुर्णी, दि. ३० सप्टेंबर-**

श्री माऊली शिक्षण संस्था संचलित टेंभुर्णी येथील सनराइज इंग्लिश मीडियम गुरुकुल स्कूल लीड स्टुडन्ट लेड कॉन्फरन्स पार पडले. यामध्ये विद्यार्थी आपल्या अभ्यासक्रमातून ज्या गोष्टी शिकतात, त्या संकल्पना पालक व प्रेक्षकांना स्पष्ट करुन समजावून सांगितले. अशा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या संकल्पना आणखीनच स्पष्ट होतात व त्यांना एका मोठ्या व्यासपीठावर बोलण्याची, आपले मत मांडण्याची संधी प्राप्त होते. उद्घाटन संस्थाध्यक्ष योगेश बाबाराजे बोबडे यांनी केले. यावेळी समाजसेविका अनुराधा बोबडे, स्वरूपाताई बोबडे, प्रिन्सिपल शाहिदा पठाण, मंगेश काशीद यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोजगार उपलब्ध करण्यासाठी विधानसभेत पाठवा

## दिग्विजय बागल यांची पुण्यात रोजगारासाठी गेलेल्या मतदारांना भावनिक साद

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ३० सप्टेंबर-**

भाजपाचे युवा नेते दिग्विजय बागल यांनी हडपसर, काळेपडळ येथे करमाळा तालुक्यातील या भागात वास्तव्य करणाऱ्या बागलप्रेमी नागरिकांचा मेळावा घेतला. या मेळाव्यात त्यांनी करमाळा तालुक्यातील लोकप्रतिनिधीवर सडकून टीका करत रोजगार निर्माण करण्यासाठी मला विधानसभेत पाठवा, असे आवाहन केले.

करमाळा तालुक्यातील रस्ते, आरोग्य, वीज, सिंचन, पोलिस व महसूल विभागातील प्रश्न यांसारखे प्रश्न लोकप्रतिनिधींच्या अनास्थेमुळे जसेच्या तसे असून त्यामुळे सामान्य जनतेला त्रास सहन करावा लागत आहे. जनतेचे विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी एकदाही आमसभा न घेणारे सोलापूर जिल्ह्यातील सर्वात पळपुटे आमदार असून आगामी विधानसभा निवडणुकीत अशा लोकांना आपली योग्य ती जागा दाखवावी असे आवाहन केले. बागल म्हणाले की, सद्याचे लोकप्रतिनिधी सर्वच पातळ्यांवर अपयशी ठरले आहेत. विकास सर्वांचाच झाला पाहिजे. परंतु विद्यमान आमदारांकडून करमाळ्याच्या बाबतीत मात्र सावत्रपणाची वागणूक दिली जात आहे. दिगंबरराव बागल यांनी मंजूर करुन आणलेली दहीगाव उपसा सिंचन योजना तत्कालीन आमदार शामलताई बागल यांच्या कार्यकाळात अंतिम स्वरुप घेत असताना काही लोकांनी दहीगाव येथील नातेवाईकांना हताशी धरुन ९०० मीटर जलवाहिनीचे काम अडवून ठेवले. त्यामुळे दहीगाव उपसा सिंचन योजना रखडली.अन्यथा ही योजना मागील दहा ते बारा वर्षांपूर्वी सुरू होऊन बारा वर्षांपूर्वी पूर्व भागाचे नंदवन झाले असते. यावेळी भाजपा महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष रश्मी बागल, नगरसेवक मारुती तुपे, शहराध्यक्ष प्रशांत सुरसे, शेवाळवाडीचे सरपंच अशोक शिंदे, युवा उद्योजक सोमनाथ खराडे, रेणुकाताई मोहोळकर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी नगरसेवक मारुती तुपे, ज्येष्ठ नेते प्रशांत सुरसे, पुणे शहर काँगेस महिला आघाडीच्या उपाध्यक्षा पल्लवीताई सुरसे, हडपसर विधानसभा भाजप महिला आघाडी अध्यक्षा शोभाताई लगड, पुणे शहर जिल्हा भाजप सरचिटणीस पुजाताई चोरमले, सामाजिक कार्यकर्त्या राणी फरांडे, अशोकराव शिंदे, अशोक घावटे, मकाईचे संचालक सतीश नीळ, युवराज रोकडे, आशिष गायकवाड, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी माजी संचालक देवा ढेरे, गणेश झोळ, रावगावचे सरपंच संदीप शेळके, अशोक नरसाळे, सरपंच मदन पाटील, ग्रामपंचायत सदस्य रामचंद्र पवार, सूरज काळे, उपसरपंच विष्णू गर्जे, युवा नेते सुभाष फरांडे, अक्षय कुलकर्णी, डॉ. विजय रोकडे, ऊस पुरवठा अधिकारी मल्हारी मारकड, शशिकांत केकण, रमेश चांदणे, पै. दादा कांबळे, रवी शेळके, युवराज जगताप, सचिन नवले उपस्थित होते. सूत्रसंचालन रणजित शिंदे यांनी केले तर आभार सरपंच अशोक शिंदे यांनी मानले.

### १९८ जणांचा अपघातात जीव गेला

मामी आमदार असताना टेंभुर्णी-जातेगाव मार्गाला मंजुरी मिळून प्रत्यक्ष काम सुरू झाले. परंतु २०१४ ला सत्ता बदल झाला आणि त्यानंतरच्या आमदारांनी स्वत:चे व कार्यकर्त्यांचे टिप्पर, पोकलेन कामावर घ्या, पैशांसाठी संबंधित कंपनीवर दबाव निर्माण केला. त्यामुळे संबंधित कंपनीने काम अर्धवट अवस्थेत सोडले. दूरावस्थेमुळे तेव्हापासून आजपर्यंत या मार्गावर १९८ जणांना अपघातात जीव गमवावा लागला आहे, असे बागल यांनी सांगितले.

### राजकीय मुद्यांसाठी कारखान्यांना अडचण

फक्त आदिनाथ व मकाई कारखान्यांना अडचणी निर्माण करायच्या व त्याचा निवडणुकीत मुद्दा करुन निवडणूक जिंकायची. त्यामुळे करमाळा विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगिण विकास करण्यासाठी व तालुक्यातील युवकांना रोजगारासाठी पुणे, मुंबई अशा ठिकाणी भविष्यात स्थलांतर करण्याची वेळ येऊ नये, यासाठी दिगंबरराव बागलांचे नाव पुन्हा विधानसभेत पाठवणे गरजेचे आहे, असे दिग्विजय बागल यांनी सांगितले.

# पाककलेतून महिलांच्या सृजनशिलतेचे दर्शन

## दिलीप माने : दिलीप माने विचार मंचच्या स्पर्धेत तब्बल १,२०० महिलांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ३० सप्टेंबर-**

महिलांची पाककला ही एक कला आहे. जी त्यांच्या सर्जनशीलतेचे आणि कौशल्याचे दर्शन घडवते. अशा स्पर्धांमधून महिलांना आपली कला सादर करण्याची संधी मिळते, याचे मला विशेष समाधान आहे. महिलांना आपले स्वयंपाक कौशल्य दाखवण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ देता आले, याचा आम्हाला आनंद आहे. पुढे देखील असेच महिलांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी मी प्रयत्न करू, अशी ग्वाही माजी आ. दिलीप माने यांनी दिली.

दिलीप माने विचार मंचकडून आयोजित 'पाककला' स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्पर्धेचे उद्घाटन माजी आमदार दिलीप माने यांनी केले. स्पर्धक महिलांनी आमच्या कलागुणांना वाव देण्यासाठी दिलीप माने विचार मंचने दिलेली ही संधी आम्हाला खूप प्रेरणादायी वाटल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. महिलांसह युवतींनी देखील या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

प्रत्येकाने आपल्या स्वयंपाक कलेतील कला आणि कल्पकतेचे सुंदर प्रदर्शन केले. पदार्थांच्या चवीतून प्रेक्षक आणि परीक्षक दोघांनीही कौतुकाचा वर्षाव केला. या स्पर्धेत विविध प्रकारच्या पदार्थांची चव चाखताना, प्रत्येक स्पर्धकाचा हटके अंदाज लक्षात येत होता.



### प्रियांका म्हमाणे ठरल्या प्रथम क्रमांकाचे मानकरी

या स्पर्धेत तब्बल १२०० महिलांनी सहभाग घेतला. स्पर्धेनंतर लगेचच विजेत्यांची घोषणा करण्यात आली. यात प्रथम पारितोषक प्रियांका म्हमाणे यांनी पटकावले. त्यांना मायक्रो ओव्हन देऊन सन्मानित करण्यात आले. मीनाक्षी अंकलगी, राधिका जाधव या अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाच्या बक्षिसाच्या मानकरी ठरल्या. याशिवाय २५ उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आली. तसेच स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांना आकर्षक भेटवस्तू देण्यात आली.

# अक्कलकोटच्या लोकअदालतीमध्ये तब्बल ७३१ प्रकरणे निकाली

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३० सप्टेंबर-**

अक्कलकोट येथील न्यायालयात राष्ट्रीय लोकअदालतीत दाखलपूर्व व न्यायालयीन प्रलंबित अशी एकूण ७३१ प्रकरणे निकाली काढण्यात आली. विविध विभागाची सुमारे ९२ लाख ७ हजार ३९२ इतक्या रकमेची तडजोड करण्यात आली, अशी माहिती अक्कलकोट तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश एम. एम. कल्याणकर यांनी दिली.

राष्ट्रीय लोकअदालतीसाठी अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश, सोलापूर एम. एस. आझमी तसेच सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यु. एस. देवर्षी यांच्या मार्गदर्शनाखाली एक पॅनलची स्थापना करण्यात आली होती. पॅनलमध्ये एम. एम. कल्याणकर, दिवाणी न्यायाधीश कस्तर यांनी पॅनल प्रमुख म्हणून काम पाहिले. सदर लोकअदालीतमध्ये ७२ प्रलंबित प्रकरणे व ६५९ दाखलपूर्व प्रकरणे निकाली काढण्यात आली.

या लोकअदालतीमध्ये विस्तार अधिकारी पाटील, सरकारी वकील सरवदे, बेसकर, विधीज्ञ संघाचे अध्यक्ष ॲड. हल्ले, पॅनल ॲड. ए. एम. बनसोडे, ॲड. पी. आर. शहा, ॲड. हर्डीकर, ॲड. व्ही. बी. पाटील, ॲड. मंगरुळे, ॲड. बोराळकर, ॲड. वंगे, ॲड. पायमल्ले, ॲड. एखंडे, ॲड. उडचाण, न्यायालयाचे सहाय्यक अधीक्षक किशोर रणदिवे, न्यायालयीन कर्मचारी मागनूर, अमित खिस्ती, किणगी, आळगुंडगी, नदाफ, मोरे, जाधव, चौधरी, कुंभार, श्रीमती केरुरकर उपस्थित होते.



# ऑडिटर हा संस्थेचा आत्मा

## जयसिंह मोहिते-पाटील: सुमित्रा पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३० सप्टेंबर-**

कोणतीही सहकारी संस्था व्यवस्थित चालायची असेल तर संस्थेचे संचालक, सभासद व कामगार हे दक्ष असणे आवश्यक आहे. दरवर्षी संस्थेचे ऑडिट होते, ते बरोबर आहे की नाही हे पाहणे गरजेचे आहे. संस्थेचा ऑडिटर हाच संस्थेचा आत्मा असतो, असे मत सुमित्रा सहकारी पतसंस्थेचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील यांनी व्यक्त केले.

सुमित्रा सहकारी पतसंस्थेची ३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन महादेव अंधारे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या व उत्साही वातावरणात पार पडली. प्रारंभी संस्थेचे सरव्यवस्थापक प्रताप चव्हाण यांनी अहवाल वाचन केले. यावेळी व्हाईस चेअरमन अशोक जावळे, संचालक विजय शिंदे, विजय दोशी, सुभाष दळवी, अभिजीत रणवरे, दीपक खराडे-पाटील, विशाल फुले, श्रावण शिंदे यांच्यासह सभासद व कामगार उपस्थित होते.

जयसिंह मोहिते पाटील म्हणाले, सभासदांनी संस्थेच्या वार्षिक अहवालाचा बारकाईने अभ्यास करुन संचालकांना प्रश्न विचारले पाहिजेत. संस्था व्यवस्थित चालविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. सरकारच्या कर्जमाफी धोरणामुळे राज्यातील सहकारी संस्था अडचणीत आल्या. सुमित्रा पतसंस्थेने गेल्या दोन महिन्यात ३० कोटी वसूल केला आहे. संस्थेचे ४५०० कर्जदार होते आता १४५० कर्जदार राहिले आहेत. संस्थेचा ३००० कोटी रुपये भांडवली खर्च आहे तर १३०० कोटी कर्ज वाटप केले आहे. १७८ कोटी रुपये येणे आहे तर ७२ कोटी देणे आहे.

सुमित्राचे कर्ज घेऊन शेतकऱ्यांनी घर, जमिनी खरेदी केल्या. आज या जमिनीची, घराची किंमत करोडो रुपये आहे. त्यांनी कर्जफेड करावी. संस्थेने ९९ टक्के कर्जदारांवर कारवाई केली आहे. पुढील दोन महिन्यात ३६ कोटी रुपये वसूल होतील तर वर्षभरात ७० कोटी वसूल होईल.

पुढील आर्थिक वर्षात ९० टक्के वसुली करुन संस्था पूर्वपदावर आणू असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. संस्थेच्या माध्यमातून आरोग्य, कला, क्रीडा, शिक्षणासाठी मदत केली. संस्थेने सामाजिक बांधिलकी जोपासली असेही ते म्हणाले.

# दक्षिणच्या विकासासाठी सेवेची संधी द्या

## मळसिद्ध मुगळे : गावभेट दौऱ्यात भूमिपूत्रांना उमेदवारी देण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ३० सप्टेंबर-**

दक्षिणचा भूमिपूत्र म्हणून मतदारसंघातील समस्यांची जाणिव आहे. म्हणून दक्षिणच्या विकासाचे व्हीजन घेऊन मतदारांशी संपर्क साधत आहे. शेतकरी प्रश्न, तरूणांना रोजगार व महिला सक्षमीकरणासह आदी प्रश्न सोडविण्यासाठी एकदा संधी द्या, असे आवाहन भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष मळसिद्ध मुगळे यांनी गावभेट दौऱ्यात केले.

मुगळे भाजपाकडून विधानसभेसाठी इच्छुक असल्याने सीना-भीमा खोऱ्यातील ४० गावांत गावभेट दौरा करून मतदारांशी संपर्क साधत आहेत. यावेळी तालुका उपाध्यक्ष शिवराज मुगळे, ग्रामपंचायत सदस्य सुरेश टेळे, शिवानंद लोभे, शिवपुत्र जोडमोटे, राहुल पुजारी, म्हाळप्पा घाले, सुंदरकांत बोराळे, बरगालसिद्ध व्हनमाने, दयानंद धनशेट्टी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुगळे म्हणाले की, मी भाजपाचा सामान्य कार्यकर्ता असून पक्षाने संधी दिल्यास विधानसभा लढविणार आहे. २० वर्षांपासून भाजपाचा कार्यकर्ता म्हणून काम करीत असताना सामान्य माणसांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न केला आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, नागरिक, महिला व तरूण यांच्या समस्या सोडविण्यासाठी अनेकवेळा आंदोलन केले आहे. शासकीय कार्यालयाकडे पाठपुरावा करून समस्या सोडविल्या आहेत. तरूणांच्या रोजगारासाठी एमआयडीसी, शेतकऱ्यांसाठी हमीभाव, दिवसा वीजपुरवठा, उद्योग व व्यवसाय उभारण्यासाठी कर्जपुरवठा, महिलांना लघुउद्योग उभारणीसाठी कर्जपुरवठा यासह इतर अनेक प्रश्नांची सोडवणूक करणार आहे, म्हणून दक्षिणचा भूमिपूत्र म्हणून सेवेची संधी द्यावे अशी मुगळे यांनी सांगितले.

### वोट आणि नोट दोन्ही देणार

मळसिद्ध मुगळे यांच्यासारखा सामान्य कार्यकर्ता विधानसभा निवडणूक लढविणार असेल तर त्यांना निवडून आणण्यासाठी वोट आणि नोट दोन्ही देण्यास तयार आहोत, असे गावभेट दौऱ्यात मतदारांनी सांगितले.

# पंढरपुरात शुक्रवारपासून श्री रुक्मिणी नवरात्र संगीत महोत्सव

## श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे आयोजन; आंतरराष्ट्रीय किर्तीच्या कलाकारांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० सप्टेंबर-**

येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने ४ ते १० ऑक्टोबर या कालावधीत श्री रुक्मिणी नवरात्र संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या संगीत महोत्सवामध्ये संगीत क्षेत्रातील अनेक दिग्गज आणि नामवंत कलाकारांची उपस्थिती राहणार असून ते आपली संगीत सेवा रुक्मिणी चरणी समर्पित करणार आहेत. येथील श्रीसंत तुकाराम भवन येथे दररोज रात्री ७.३० ते १० या वेळेत संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या संगीत महोत्सवात पहिल्या दिवशी शुक्रवारी ४ ऑक्टोबर रोजी भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांचे नातू विराज जोशी यांच्या गायनाचा कार्यक्रम होणार आहे. ख्यातनाम गायक पं. शौनक अभिषेकी यांचा या महोत्सवात शनिवारी ५ ऑक्टोबर स्वराभिषेक होणार आहे. ओंकार कला अकादमी चेन्नई व अतुल खांडेकर यांच्या गायनाचे रविवारी ६ ऑक्टोबर आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर सोमवारी ७ ऑक्टोबर वैष्णवी मगर यांचे अभंगगायन होणार आहे. उस्ताद रशीद खान यांचे शिष्य कृष्णा बोंगाणे यांचा दुमदुमली पंढरी हा कार्यक्रम मंगळवारी ८ ऑक्टोबर रोजी होणार आहे. बुधवारी ९ ऑक्टोबर रोजी राम विधाते व बजरंग विधाते बंधूच्या गायनाचा कार्यक्रम सादर होणार आहे. महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी गुरुवारी १० ऑक्टोबर शर्वरी वैद्य मुंबई व धनंजय जोशी नांदेड या ख्यातनाम गायक, गायिकांचा गायनाचा कार्यक्रम आयोजिण्यात आला आहे.

श्रीविठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांच्या वतीने सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके आणि मंदिर समितीचे सर्व सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या अथक परिश्रमातून प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी हा संगीत महोत्सव संपन्न होत आहे.



### यांनी करणार साथसंगत

या सर्व दिग्गज कलाकारांना सुभाष कामत, तेजोव्रत जोशी, निसर्ग देहूकर, कार्तिक स्वामी, सागर काटे, कृष्णकुमार इधाते, माऊली खरात हे तबल्याची साथ करणार आहेत. हार्मोनिअमची साथ उदय कुलकर्णी, लालीधर चक्रदेव, ओंकार पाठक, माधव लिमये यांची असून पखवाज वादन ज्ञानेश्वर दुधाणे, व्हायोलिन सुरेश विधाते तर टाळांची साथसंगत शिवराज पंडीत, अक्षय तळेकर, शरद जाधव हे करणार आहेत. उमेश बागडे हे निवेदन करणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विक्रम बिस्किटे हे करणार आहेत.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मनसे नेते दिलीपबापू धोत्रे गुरुवारपासून साधणार जनतेशी संवाद



**पंढरपूर, दि.३० सप्टेंबर-**

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभेचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार दिलीपबापू धोत्रे यांचा ३ ते ६ ऑक्टोबर दरम्यान मतदारसंघात गाव भेट दौरा करणार आहेत. या दौऱ्यात धोत्रे हे जनतेशी संवाद साधणार आहेत.

या गाव भेट दौऱ्याची सुरुवात गुरुवारी ३ ऑक्टोबर पासून दुपारी ३ वाजता खर्डी येथील ग्रामदैवत सीताराम महाराजांचे दर्शन घेऊन होणार आहे. सायंकाळी ६ वाजता तपकिरी शेटफळ, रात्री ७ वा. तनाळी, रात्री ८ वाजता तावशी. शुक्रवारी ४ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता सिद्धेवाडी, सकाळी ९ वा. शिरगाव, १० वा. एकलासपूर, सायंकाळी ५ वा. अनवली, ६ वा. रांजणी, ७ वा. मुंढेवाडी ८ वा. गोपाळपूर. शनिवारी ५ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ व. उंबरगाव, सकाळी ९ वा. बोहाळी, १० वा. कोर्टी, सायंकाळी ५ वा. टाकळी, ७ वा. गादेगाव. रविवारी ६ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वा. शिरढोण, ९ वाजता कौठाळी, सायंकाळी ६ वा. वाखरी, सायंकाळी ७ वा. कासेगाव असा दौरा असणार आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### सोजर फार्मसीचे राज्यस्तरीय तांत्रिक पोस्टर सादरीकरण स्पर्धेत यश

**बार्शी, दि. ३० सप्टेंबर-**

जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त सांगोल्यातील फॅबटेक कॉलेज येथे ऑफ फार्मसी व केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन सांगोल्याने घेतलेल्या राज्यस्तरीय तांत्रिक पोस्टर स्पर्धेत यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सोजर कॉलेज ऑफ फार्मसीला यश मिळाले. या स्पर्धेमध्ये राज्यभरातून ३५ महाविद्यालयाने सहभाग घेतला. संजना जाधवर, दीक्षा वाघमारे, गौरव हिप्परगी, करण सोलंकी, श्वेता ननवरे यांनी सहभाग नोंदवला. यापैकी संजना जाधवर व दीक्षा वाघमारे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. त्यांना रोख तीन हजार रुपये, स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र देण्यात आले. या विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष अरुणदादा बारबोले, सचिवा कल्पनाताई बारबोले, प्राचार्य सुजित करपे, प्रा. शितल कुऱ्हाडे, प्रा. मंदार जोशी, यांनी अभिनंदन केले.

### पात्र हजेरी सहाय्यकांनी निवृत्तीवेतनासाठी संपर्क साधावा : उपजिल्हाधिकारी मरोड

**सोलापूर दि.३० सप्टेंबर-**

शासनाच्या नियोजन विभागाकडील शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र हजेरी सहायक यांना निवृत्तीवेतनार्ह लाभ देण्याचे आदेश दिले आहेत. जिल्ह्यातील सदर शासन निर्णयानुसार सेवानिवृत्तीविषयक लाभ देणेसाठी आढळ होत नसलेले ६२ हजेरी सहायक यांची यादी solapur.nic.in या संकेत स्थळावर प्रसिध्द केलेली आहे. तरी या यादीमधील हजेरी सहायक यांनी शासन निर्णय, दि. २३ मे २०२३ मधील निर्णयानुसार निवृत्तीवेतनार्ह लाभ घेण्यासाठी त्यांच्या सेवानिवृत्त कार्यालयाशी किंवा जिल्हाधिकारी कार्यालय रोजगार हमी योजना शाखेशी तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन उपजिल्हाधिकारी रोहयो अंजली मरोड यांनी केले आहे.

### जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे ७ ऑक्टोबरला आयोजन

**सोलापूर दि.३० सप्टेंबर-**

जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे सोमवार दिनांक ०७ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता, सोलापूर येथे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली. या लोकशाही दिनात मागील सहा महिन्यातील लोकशाही दिनाच्या निवेदनावर केलेल्या कारवाई अहवाल तसेच माहिती अधिकार अधि.-२००५ अंतर्गत प्राप्त अर्ज, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही याबाबत निपटारा करण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली.

### शेतमजुराची मुलगी झाली पोलीस

**बार्शी, दि. ३० सप्टेंबर-**



तालुक्यातील घारी येथील बाबासाहेब पठाण यांची मुलगी शकीला पठाण हिची महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस म्हणून निवड झाली. तिचे शिक्षण बारावीपर्यंत झाले असून तिने भूम येथील कर्मवीर अकॅडमीमधून भरतीसाठी तयारी केली होती. शकीलाची आई आणि वडील दोघेही शेतमजुरी करतात. तिच्या निवडीबद्दल घारी येथील शेतमजुरांनी आनंद व्यक्त केला. तिला सचिन गोयकर, सलीम शेख यांचे मार्गदर्शन लाभले. यशाबद्दल सलीम शेख आरिफ सय्यद, निजाम मुलाणी, शाहरुख शेख, धीरज मुलाणी, गब्बर शेख व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.



### नेट बॉल स्पर्धेत नाझरा विद्यामंदिर जिल्ह्यात प्रथम

**सांगोला, दि.३० सप्टेंबर-**

सोलापूर येथील रॉजर्स इंग्लिश मीडियम स्कूल या ठिकाणी १७ वर्ष वयोगटातील शालेय जिल्हास्तरीय नेटबॉल क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये सांगोला तालुक्यातील नाझरा विद्यामंदिरच्या १७ वर्ष वयोगटातील मुलांच्या व मुलींच्या संघाने बहारदार खेळ करत अजिंक्यपद पटकावले. दोन्ही गटात खेळाडूंनी अतिशय आक्रमक असा खेळ करत प्रतिस्पर्धी संघावर मात केली व प्रथम क्रमांक मिळवला.या दोन्ही संघाची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक स्वप्निल सासणे यांचे मार्गदर्शन लाभले. सांताशिप्र मंडळाचे अध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके, प्राचार्य बिभीषण माने, पर्यवेक्षक मधुकर धायगुडे, शिक्षक, क्रीडाप्रेमी पालकांनी खेळाडूंच्या यशाबद्दल अभिनंदन केले.

## विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात नवरात्रौत्सवाची लगबग

### मंदिराची स्वच्छता, दागिने उजळविणे, गाठविण्याच्या कामाला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० सप्टेंबर-**

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी नवरात्र उत्सव येथील विठ्ठल रखुमाई मंदिरात मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातवारण संपन्न होणार आहे. येत्या ३ ऑक्टोबर पासून नवरात्र उत्सावास प्रारंभ होत आहे. दरम्यान या उत्सवा अगोदरची मंदिराची स्वच्छता तसेच विठ्ठल रखुमाईच्या पुरातन दागिने उजळविण्याच्या कामास प्रारंभ करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

नवरात्रोत्सवाच्या अगोदर दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर व सर्व समिती सदस्य आणि कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचनेनुसार विठ्ठल गाभारा, रूक्मिणी गाभारा, सोळखंबी, चौखंबी, गजेंद्र मंडप, विठ्ठल सभामंडप, रूक्मिणी सभामंडप, नामदेव पायरी आणि मंदिर परिसर भागांची साबण, सोडा वापरुन तसेच स्वच्छता उपकरणांच्या सहाय्याने स्वच्छता विभागाचे पन्नास ते साठ कर्मचाऱ्यां मार्फत घासून, पुसून पाण्याने स्वच्छ करून घेण्यात आले. याबरोबरच मंदिर समितीकडे असणाऱ्या इतर परिवार देवतांच्या मंदिरांचीदेखील स्वच्छता करून, मंदिरांना कापडी मंडप बांधून, त्यावर विद्युत रोषणाई, पिण्याची पाण्याची, बसण्याची, रांगेत उभारून व्यवस्थित दर्शन घेता यावे यासाठी योग्य ती तयारी करण्यात येत असल्याचे देखील मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगितले.







#### पुरातन अन् अतिमौल्यवान दागिन्यांचा समावेश

नवरात्र महोत्सव पूर्वी विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील विठ्ठल, रखुमाईचे सर्व पुरातन आणि अतिमौल्यवान दागिन्यांची पाहणी करून ते गाठविण्याचे कामकाज हे मंदिर समिती सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर व अन्य सदस्य आणि कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके आणि व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिर समितीच्या काही अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये गाठविण्याचे काम करणारे कारागिर ताजुद्दीन पटवेकरी, समीर पटवेकरी यांना सोबत घेऊन करण्यात आले.



## विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील अतिप्राचीन दागिन्यांचे मूल्यांकन

### अधिकाऱ्यांसह मंदिर समितीचे दोन सराफही उपस्थितीत

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० सप्टेंबर-**

येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीने मंदिरातील विठ्ठल-रखुमाईंचे अतिप्राचीन दागिन्यांचे मूल्यांकन करुन घेतल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. यावेळी मंदिर समितीचे काही अधिकारी तसेच मंदिर समितीचे दोन सराफ देखील उपस्थित होते.

येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीकडे श्री विठ्ठल व रूक्मिणी मातेच्या खजिन्यामध्ये इसवी सन ५०० ते १८९२ पूर्वीपासूनचे सोन्या-चांदीने दागिने, मोत्याचे हिरे, माणके, मोती अशी प्राचिन रत्नजडित अनमोल आभूषणे आ-हेत. पूर्वीचे राजे महाराजे, संस्थान अशा मोठमोठ्या व्यक्तींनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेस विविध अलंकार भेट म्हणून सुमारे साडेतीनशे, चारशे वर्षापूर्वी दिलेले आहेत. २६ फेब्रुवारी १९८५ साली स्थापन झालेल्या मंदिरे समितीने आजपर्यंत ते सर्व दागिने दरवर्षी नवरात्र महोत्सवापूर्वी गाठवून घेऊन काळजीपूर्वक जतन केले आहेत. आजही ते काम काळजीपूर्वक व व्यवस्थित केले जाते.

यावर्षी सहअध्यक्ष गहिनीनाथ औसेकर महाराज व मंदिरे समितीच्या सर्व सदस्य आणि कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या मान्यतेने व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या मार्गदर्शन व सूचनेनुसार गोरेगाव (मुंबई) येथील विष्णू सखाराम काळे यांच्याकडून त्या दागिन्यांचे मूल्यांकन करून घेण्यात आले.

दरम्यान काळे यांच्याकडून मूल्यांकन करुन घेत असताना मंदिर समितीचे संजय नारायण कोकीळ (नित्य उपचार विभाग प्रमुख), पांडुरंग ज्ञानेश्वर बुरांडे (देणगी व छपाई विभाग प्रमुख), ज्ञानेश्वर विठ्ठल कुलकर्णी (जमीन व सोने चांदी विभाग प्रमुख) दादा तुकाराम नलवडे (आस्थापना सहविभाग प्रमुख), गणेश घनश्याम भणगे आणि दत्तात्रय प्रल्हाद सुपेकर, (मंदिर समितीचे सराफ) हे अधिकारी उपस्थित होते.



#### दागिने मूल्यांकन करणाऱ्या काळेंची ओळख

दरम्यान गोरेगाव (मुंबई) येथील विष्णू सखाराम काळे हे दागिने मूल्यांकन करण्याचे सरकारी मूल्यांकन प्रमाणपत्रधारक आहेत. काळे यांनी आजपर्यंत अनेक मंदिरातील सोने, चांदी, हिरे, मोती, माणिक अशा दागिन्यांचे मूल्यांकन केले आहे. या कामाचा त्यांना खूप अनुभव असल्यामुळे परदेशात देखील मूल्यांकनासाठी त्यांना बोलविले जात असल्याची माहिती मंदिर समितीकडून देण्यात आली.




## बाजार भावापेक्षा दुप्पट दराने विकला मका

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ३० सप्टेंबर-**

शेती हे एकट्याने करण्याचे क्षेत्र नाही तर सर्व शेतकऱ्यांनी संघटित मिळून करण्याचे क्षेत्र आहे. याची जाणीव झालेल्या शेलगाव क (ता. करमाळा) येथील कृषीक्रांती शेतकरी गटाने राजे रावरंभा शेतकरी प्रोड्युसर कंपनीच्या मदतीने सह्याद्री फार्मर कंपनी नाशिक यांच्याबरोबर स्वीट कॉर्न मक्याचा करार करून ३ दिवसात ३० टन मका पाठवली. या मक्याला बाजारभावापेक्षा सरासरी दुप्पट भाव मिळाला. सामूहिक शेती केल्याने खर्चही कमी झाला आणि शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढले त्यामुळे करार शेतीचा राजे रावरंभा शेतकरी प्रोड्युसर कंपनीचा प्रयोग यशस्वी झाला असून शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेमध्ये सहभाग घेतलेल्या शेलगाव क कृषीक्रांती शेतकरी गटातील सर्व सदस्यांनी स्वीट कॉर्न मका हे दुसरे पीक निवडले. ७० दिवसांत ७० हजार हे सूत्र डोळ्यासमोर ठेवून त्यांनी स्वीट कॉर्न मक्याची लागवड जुलै २०२४ मध्ये केली. २० सप्टेंबरनंतर स्वीट कॉर्न मक्याचे हार्वेस्टिंग झाले.

> रब्बी हंगामात किमान ५० एकर लागवड गावात होईल. खरीप हंगामात १५ एकर क्षेत्रावरती केलेला स्वीट कॉर्न मक्याचा प्रयोग यशस्वी झाल्यामुळे आमच्या शेतकरी गटाबरोबरच गावातील इतर शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढलेला आहे. त्यामुळे रब्बी हंगामात आमच्या शेलगाव क गावामध्ये किमान ५० एकर मक्याची लागवड होईल असा विश्वास आहे.
>
> **-गणेश माने,**
> कृषी क्रांती शेतकरी गट,
> शेलगाव क.

बाजारामध्ये ६ ते ७ रुपये प्रति किलो हा दर असताना सह्याद्री फार्मर कंपनीने प्रत्यक्षात १३ रुपये प्रति किलो दर दिला. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिकचे पैसे मिळाले. विशेष महत्त्वाची बाब म्हणजे ११ रुपये प्रति किलो दराने करार ठरलेला असूनही प्रत्यक्षात त्यापेक्षा अधिक दर सह्याद्री फार्मर प्रोड्युसर कंपनीने दिल्यामुळे करमाळा तालुक्यातील इतर अनेक शेतकऱ्यांना स्वीट कॉर्न मक्याची लागवड करण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे.

## कामाच्या जोरावर माळशिरस पुन्हा भाजपा जिंकणार : अजय जमवाल

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ३० सप्टेंबर-**

महायुतीच्या कामाच्या जोरावर माळशिरस विधानसभा पुन्हा एकदा भाजप जिंकणार असल्याचे मत क्षत्रिय संघटन मंत्री अजय जमवाल यांनी व्यक्त केले.

भाजपातर्फे तरंगफळ येथे विधानसभापूर्वी नियोजन झाली, यावेळी ते बोलत होते. मध्यप्रदेश व छत्तीसगड क्षेत्रीय संघटनमंत्री अजय जमवाल, भाजपा महाराष्ट्र प्रदेश कार्यालयीन महामंत्री रघुनाथ कुलकर्णी, पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे, आ. रामभाऊ सातपुते, जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत, जिल्हा प्रभारी विक्रम देशमुख, जिल्हा समन्वयक राजकुमार पाटील, के. के. पाटील, सोपानराव नारनवर, आप्पासाहेब देशमुख, बी. वाय. राऊत, हनुमंतराव सूळ, बाळासाहेब वावरे, दादासाहेब उराडे उपस्थित होते. जमवाल यांचा छत्तीसगड व मध्य प्रदेशमध्ये संघटन मंत्री असताना भाजपाचे सरकार आणण्यात सिंहाचा वाटा आहे. सूत्रसंचालन बाळासाहेब सरगर यांनी तर आभार संजय देशमुख यांनी केले.



> सोलापूरच्या पराभवाने खचून न जाता बरेच काही शिकून गेलो आहे. आता मी पक्षाचा कार्यकर्ता असल्याने पक्ष जो आदेश देईल तो मी शिरसावंद्य मानून विधानसभा निवडणूक भाजपा जिंकण्यासाठी जिवाची बाजी लावणारा आहे. माळशिरस तालुक्यात विकासासाठी दहा हजार कोटी रुपये कामे केली आहेत.
>
> **- आ. राम सातपुते**

## महात्मा गांधी जयंतीपासून समृद्ध गाव अभियानाचा शुभारंभ

### आ. सुभाष देशमुख यांनी सोडला संकल्प

### मतदारसंघातील 100 गावांत योजना राबविणार

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ३० सप्टेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील १०० गावांमध्ये समृद्ध गाव अभियान राबविण्यात येणार आहे. महात्मा गांधी जयंतीनिमित्त बुधवार, दि. २ ऑक्टोबर रोजी स्वच्छता मोहिमेद्वारे या अभियानाचा प्रारंभ करण्यात येत आहे, अशी माहिती आ. सुभाष देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विकसित भारत करण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संकल्प आहे. त्यांची स्वप्नपूर्ती करण्यासाठी आतापासूनच प्रयत्नशील आहोत. सोलापूर जिल्ह्याचा सर्वांगीण विकसित झाला पाहिजे. महात्मा गांधी यांनी गावाकडे चला असा संदेश दिला होता, तो संदेश कृतीत उतरवत या समृद्ध गाव अभियानाची सुरुवात करण्यात येत आहे. त्यात प्रत्येक गाव समृद्ध व्हायला हवे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्रत्येक गाव समृद्ध झाले पाहिजे. प्रत्येक गावातील स्थानिक तरुणांना बाहेर न जाता गावातच रोजगार व उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध करणे, उद्योग उपलब्ध झाला पाहिजे, शेती उत्पादनाला भाव देणे, सेंद्रिय शेतीसाठी मार्गदर्शन करणे, महिलांना घरी बसूनच स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे, बाल संस्कार व्हावेत, आरोग्य सुदृढ राहावे, शिक्षण सुविधा उपलब्ध व्हावी, स्थानिक पातळीवरच उत्पादनांना मार्केट उपलब्ध करून देणे या प्रमुख उद्देशातून प्रत्येक गावात समृद्ध गाव अभियान राबविण्यात येत आहे.

या योजनेसाठी दक्षिण सोलापूर तालुक्यातील ८५ गावांनी नोंदणी केली आहे. सुमारे १०० गावात ही योजना लोकसहभागातून राबविण्यात येणार आहे. प्रत्येक गावाची वेगळी वैशिष्ट्यपूर्ण ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. या अंतर्गतच दक्षिण तालुक्यातील होटगी गावात प्रादेशिक पर्यटन केंद्र निर्माण करण्यात आले आहे. त्याचबरोबर वडकबाळ, नांदणी, हत्तरसंग कुडल व हत्तुर या गावातही पिकनिक स्पॉट करण्यात येणार आहेत. यामुळे प्रत्येक गावाची वेगळी ओळख निर्माण होऊन पर्यटनाद्वारे नवे मार्केटिंग होणार असल्याचेही यावेळी आ. सुभाष देशमुख यांनी सांगितले.



#### उद्योगपती, संस्थांनी योगदान द्यावे

सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक गावचा विकास झाला पाहिजे. यासाठी जे स्थानिक लोक बाहेर गावी गेले आहेत; त्यांनी तसेच विविध संस्था, उद्योगपती व मान्यवर व्यक्तींनी गावाच्या विकासासाठी योगदान द्यावे, असे आवाहन यावेळी आ. देशमुख यांनी केले.

#### राज्यातील पहिल्या टॉप फाईव्हमध्ये आपला जिल्हा राहील

प्रत्येक गावात समृद्ध गाव योजना राबवून प्रत्येक गावाची वैशिष्ट्यपूर्ण ओळख निर्माण करणे, स्थानिक पातळीवरच रोजगार निर्माण करून विविध शासकीय योजना राबवून सोलापूर जिल्हा हा राज्यातील पहिल्या पाचमध्ये आणण्याचा निर्धार यावेळी आ. सुभाष देशमुख यांनी व्यक्त केला. इतकेच नाहीतर अनेक गावचे लोक आणि गाव कारभाऱ्यांचाही त्यांना प्रतिसाद मिळत आहे.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बावी आश्रमशाळेचा कबड्डीमध्ये दैदिप्यमान यश: दोन्ही वयोगटांमध्ये जिल्ह्यात प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ सप्टेंबर -**

हातलाई मंगल कार्यालय, धाराशिव येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धांमध्ये वसंत प्राथमिक आश्रमशाळा, जवाहर माध्य. व उच्च माध्यमिक आश्रम शाळा विद्यानगर (बावी) च्या १४ आणि १९ वयोगटातील मुलांच्या संघांनी दिमाखदार कामगिरी करत दोन्ही गटांत प्रथम क्रमांक पटकावला आहे.

या विजयासह दोन्ही संघांनी विभागीय स्पर्धेसाठी आपली पात्रता सिद्ध केली आहे.



### संक्षिप्त वृत्त...



### योजनादूत पुस्तिकाचे आ. राणादादांच्या हस्ते प्रकाशन

**धाराशिव, दि.३० सप्टेंबर -**

धाराशिव येथे भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सरोजनीताई राऊत यांनी तयार केलेल्या योजनादूत पुस्तिकाचे प्रकाशन आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ता बंधू उपस्थित होते.



### हभप. दहिटणकर यांचा सत्कार

**धाराशिव, दि.३० सप्टेंबर -**

संत चोखामेळा अध्यासन केंद्र पुणे, पुणे वृंदावन फाऊंडेशन पुणे विशाल बहुउद्देशीय प्रतिष्ठान पैठण आयोजित दोन दिवसीय दुसऱ्या साहित्य संमेलनाचे आयोजन पैठण येथे आयोजित करण्यात आले होते. संमेलनाचे उद्घाटन प्राचार्य कौतिकराव ठाकले पाटील अध्यक्ष, मराठवाडा साहित्य परिषद छत्रपती संभाजी नगर, डॉ. संदिप सांगळे अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्वागताध्यक्ष प्रा. संतोष तांबे, संयोजक सचिन पाटील व मान्यवर साहित्यिक उपस्थित होते. संमेलनात परिसंवाद, कथाकथन, कविसंमेलन, भारुड, अभंग गायन व जेष्ठ वारकऱ्याचा सत्कार झाल. या प्रसंगी राजाभाऊ लोहार, दंडवते व इतर मान्यवर साहित्यिक उपस्थित होते.



### शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा नामांतर सोहळा संपन्न

**भूम, दि.३० सप्टेंबर -**

भूम येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भूम हे नाव बदलून आचार्य विद्यासागरजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भूम हे नाव शासनाने जाहीर केले आहे. याचा नामांतर सोहळा कार्यक्रम संपन्न झाला. राज्य सरकारने महाराष्ट्रातील १४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नाव बदलून थोर समाजसुधारकांचे नावे देण्यात आले आहेत. यामध्ये भूम येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भूमचे नाव बदलून आचार्य विद्यासागरजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था हे नाव देण्यात आले आहे. यावेळी येथील औद्योगिक संस्थेचे आयएमसी सदस्य बाळासाहेब पाटील हाडोंग्रीकर, बाळासाहेब क्षीरसागर, सुनील डुंगरवाल, प्राचार्य हर्षद राजुरकर यांच्या उपस्थितीत नामांतर सोहळा संपन्न झाला.



### पोर्णिमा लांडगे यांची महिला आघाडी उपजिल्हाप्रमुखपदी निवड

**लोहारा, दि.३० सप्टेंबर -**

लोहारा शहरातील माजी नगराध्यक्षा पोर्णिमा लांडगे यांची ठाकरे गटाच्या शिवसेना महिला आघाडी उपजिल्हाप्रमुखपदी निवड झाली आहे. धाराशिव येथे स्त्री शक्ती संवाद यात्रा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवसेना महिला आघाडी समन्वयक उपनेत्या ज्योती ठाकरे, उपनेत्या छाया शिंदे, रोशनी कोरे, मीरा भाईंदर, सांजना मुणगेकर, महिला आघाडी जिल्हाप्रमुख शामल पवार-वडणे यांच्या हस्ते उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या शिवसेना महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख पदी लोहारा शहरातील लांडगे, सुवर्णमाला नारायणकर, सुलोचना रसाळ, प्रियांका माशाळकर यांची निवड झाल्याची नियुक्तीपत्र देऊन यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

### अंकुश मोरे यांचे निधन

**जळकोट, दि.३० सप्टेंबर -**



येथून जवळच असलेल्या सलगरा (म.) येथील महात्मा गांधी गाव तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष अंकुश पांडुरंग मोरे (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने राहत्या घरी रविवार (दि.२९) रोजी सकाळी ६.४६ च्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सलगरा (म.) येथील सार्वजनिक स्मशानभूमीत सायंकाळी पाच वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार भाऊ, १ बहिण, एक मुलगा, सून, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

# लाडकी बहिण योजनेला विरोध करणाऱ्यांना जागा दाखवून द्या

## आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते नळदुर्ग येथे माता-भगिनींचा सन्मान...





**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० सप्टेंबर -**

माता भगिनींना सर्वार्थाने सक्षम करण्यासाठी महायुती सरकारने अनेक महत्वाच्या योजना हाती घेतल्या आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण ही त्यातीलच एक महत्वपूर्ण योजना आहे. राज्यातील कोट्यावधी माता भगिनींना त्याचा लाभ होत आहे. योजना यशस्वी ठरत असल्याने साहजिकच विरोधकांच्या पोटात दुखत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेला विरोध करणारांना यंदाच्या विधानसभा निवडणुकीत जागा दाखवून द्यावे, असे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

'स्त्रीशक्तीचा सन्मान आणि मातृशक्तीला आधार' या संकल्पांतर्गत नळदुर्ग येथे अंबाबाई मंदिर सभागृहात मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील लाभार्थी माता भगिनींसाठी मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीकृष्ण महिला बचत गटाच्या मीरा महाबोले व भाग्यलक्ष्मी बचत गटाच्या जिजाबाई जाधव उपस्थित होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि अर्चनाताई पाटील यांची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते तुळजाभवानी देवी, राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब, सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. उपस्थित हजारो महिलांच्यावतीने आमदार राणाजगजितसिंह पाटील व अर्चनाताई पाटील यांचा यावेळी भव्य सत्कारही करण्यात आला.

आपल्या परिसरातील १० हजार मुला-मुलींना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आपले प्रयत्न सुरू असल्याचे सांगत नळदुर्ग आणि परिसरात केलेल्या आणि होऊ घातलेल्या अनेक महत्वपूर्ण कामांबाबत आमदार पाटील यांनी उपस्थितांना संबोधित केले.

नळदुर्ग शहरात पाच एकर जागेवर भव्य व राज्यातील क्र. १ ची बसवसृष्टी उभारण्यात येणार आहे. त्यासाठी ५ कोटी रूपये मंजूर झाले आहेत. त्याचबरोबर हरितक्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे स्मारकही उभारण्यात येणार आहे. मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा दैदिप्यमान इतिहास आणि त्यावेळी हौतात्म्य दिलेल्या शहिदांचा सन्मान राखण्यासाठी भव्य असे मराठवाडा मुक्तिसंग्राम स्मारकही साकारले जाणार आहे.

मराठवाड्याच्या मुक्तीसाठी शहिद झालेले, पंजाबचे भूमिपुत्र असलेले शहिद बचित्तर सिंग यांच्या कार्याची महती या स्मारकाच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे.मुस्लिम समाजासाठी भव्य शादिखाना,बौद्ध समाजासाठी सभागृह यासह नळदुर्गच्या ऐतिहासिक भुईकोट किल्ल्यात आणखी विकासकामे प्रस्तावित आहेत. राज्यभरातून तसेच देशातून अधिकाधिक पर्यटक येथे कसे येतील, त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

एकंदरीत या सर्व कामांच्या माध्यमातून नळदुर्ग शहर आणि परिसराचा चेहरामोहरा बदलून खर्या अर्थाने नळदुर्ग शहराचा विकास सिध्द करणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी सांगितले.

नळदुर्ग शहरात लवकरच अप्पर तहसील कार्यालय सुरू होत आहे. पुढील काळात नळदुर्ग येथे स्वतंत्र तहसील कार्यालय आणि नळदुर्ग शहराला तालुक्याचा दर्जा मिळावा यासाठी आपले प्रयत्न असणार आहेत. महायुती सरकारने मुलींसाठी मोफत उच्चशिक्षण, लखपती दिदि योजनेअंतर्गत एक लाखापर्यंतची मदत, बचत गटांचे सक्षमीकरण, रोजगार निर्मिती योजनेअंतर्गत कर्ज रकमेवर ३५ टक्क्यापर्यत वाढीव अनुदान, अन्नपूर्णा योजनेअंतर्गत वर्षाला तीन मोफत गॅस सिलिंडर, अशा अनेक योजना मातृशक्तीला सक्षम करण्यासाठी सुरू केल्या आहेत.

त्यामुळे येत्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा एकदा महायुतीलाच मतदान करण्याचे आवाहनही आमदार पाटील यांनी केले आहे.

यावेळी अर्चनाताई पाटील यांनीही शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती उपस्थित महिलांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक माधुरी पद्माकर घोडके यांनी केले. अर्चनाताई पाटील यांच्या हस्ते लाडक्या महिलांचा सन्मान म्हणून उपस्थित हजारो महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुशांत भूमकर, नय्यर जहागीरदार, रणजितसिंह ठाकूर, श्रमिक पोतदार, धीमाजी घुगे, गणेश मोर्डे, अक्षय भोई, सागर हजारे, बंडू पुदाले, पांडूरंग पुदाले, पद्माकर घोडके, सुनील बनसोडे, जमन ठाकूर यांच्यासह नळदुर्ग शहर भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## १९९३ च्या प्रलयकारी भूकंपातील मृतांना सामुहिक श्रद्धांजली अर्पण



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.३० सप्टेंबर -**

लोहारा, उमरगा, औसा येथील १९९३ च्या प्रलयकारी भूकंपात मरण पावलेल्या मृत आत्म्यास ३० सप्टेंबर २०२४ रोजी लोहारा तालुक्यातील सास्तूर चौरस्ता येथे सामुहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रथमतः उपस्थितांच्या वतीने स्मृती स्थंभास अभिवादन करून मान्यवरांच्या हस्ते गरजू व गरीबांना अन्नधान्य किट, साड्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच शितलताई राहुल पाटील होत्या तर आमदार ज्ञानराज चौगुले व युवासेना मराठवाडा निरीक्षक किरण गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात आमदार चौगुले यांनी सुरुवातीला भूकंपात मरण पावलेल्या व्यक्तींना श्रद्धांजली वाहिली.

यावेळी आ. ज्ञानराज चौगुले बोलताना म्हणाले कि, गेल्या अनेक वर्षापासून लोहारा-उमरगा भूकंपग्रस्त गावांना विशेष मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न करत आहे. याचाच एक भाग म्हणून आपत्तीप्रवण गावांचे पुनर्वसन व नागरी सुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने असलेल्या महसूल व वन विभागाचा दि.१४ सप्टेंबर २०२२ रोजीच्या शासन निर्णयात भुंकप या नैसर्गिक आपत्तीचा समावेश करुन भूकंप पुनर्वसित गावात अंतर्गत रस्ते, बंदिस्त गटारे व इतर मुलभूत नागरी सुविधा पुरविणे याबाबत शासन निर्णय झाला आहे. शासन निर्णयानुसार धाराशिव जिल्हाधिकारी यांना भूकंपग्रस्त गावांसाठी लागणाऱ्या निधीचा मागणी अहवाल सादर करण्याच्या सूचना करण्यात आल्या होत्या. त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी ३ कोटी ८९ लक्ष १५ हजार इतक्या रुपयांची मागणी महाराष्ट्र शासनाकडे सादर करून सदर कामास प्रशासकीय मान्यता देण्यासाठी नाहरकत दर्शविली असल्याची माहिती आमदार ज्ञानराज चौगुले यांनी उपस्थिताना दिली.

कार्यक्रमस्थळी ह.भ.प.महेश महाराज माकणीकर, नहुश राहुल पाटील, महम्मद बागवान, शिवसेना लोहारा तालुका प्रमुख जगन्नाथ पाटील, उमरगा तालुका प्रमुख बळीराम सुरवसे, अरुण जगताप, हरि भोसले पेठसांगवीकर, गुलाब मोरे, ज्येष्ठ शिवसैनिक मारुती जाधव, फझल कादरी, राजेंद्र माळी, बालाजी बनसोडे, गहिनीनाथ सुरवसे, पिंटू मुर्ट, यांच्यासह लोहारा उमरगा तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राहुल मोटे यांच्या हस्ते सीना-कोळेगावचे जल पूजन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३० सप्टेंबर -**



परंडा तालुक्यासाठी वरदान ठरलेले व सिंचनाच्या बाबतीत जिल्ह्यातील सर्वात मोठे असलेले साडेपाच टीएमसीचे सीना कोळेगाव धरण अखेर १०० टक्के भरले परंडा-भूम-वाशी मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी आमदार राहुल मोटे यांनी धरणातील पाण्याचे डोणगाव येथे जाऊन विधिवत पूजा करून जल पूजन केले.

या धरणामुळे परंडा तालुक्याचा बरसा भाग पाण्याखाली येत असल्यामुळे परंडा तालुका पुन्हा सुजलाम सुफलाम होणार असल्याने अनेक शेतकरी बांधवातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दादासाहेब पाटील सोनारीकर, भाऊसाहेब खरसडे, राहुल बनसोडे, बापू मिस्किन, नसीर शहाबर्फीवाले, संदीप पाटील, श्रीहरी नाईकवाडी, नंदू शिंदे, खय्युम तुटके, मलीक सय्यद, बाबूराव काळे, शरद झोबाडे, अमोल जगताप आदिसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## गायरान जमिनी वाटप करण्याची मागणी

### जाणीव संघटनेचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३० सप्टेंबर -**

वाशी तालुक्यातील शासकीय पडीक गायरान जमिनीवर दलित भटके आदिवासी भूमिहीन यांनी १९८६ पासून गायरान जमिनी वहीती खाली आणून पिके काढून उदरनिर्वाह भागवत आहेत.

यामध्ये वाशी तालुक्यातील बावी, दसमेगाव, पारा, पिंपळगाव लिंगी, ब्रह्मगाव, लाखनगाव, गोजवाडा, मांडवा, घाटपिंपरी, ईजोरा, पिंपळगाव क, गोलेगाव इत्यादी गावातील शासकीय गायरान जमिनी अतिक्रमित पती-पत्नीच्या नावे करून सातबारा द्यावा.

तरी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ महाराष्ट्र जमीन महसूल नियम मधील जमीन महसूल मंडळ अधिकारी व मंडळ

अधिकारी यांचे कर्तव्य व कामे नियम १९७० मधील नियम १६ व १७ प्रमाणे जमिनीचे तपासणी करण्याची आदेश द्यावेत, अशी मागणी वाशी तहसीलचे नायब तहसीलदार संदेश भोसले यांच्यामार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनावर जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे, भिकाजी गरड, शालन धावार, शांताबाई धावारे, शाहू धावारे, जमुना धावारे, साखरबाई धावारे यांच्यासह आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## तुळजाभवानी महाद्वार व नवदुर्गाची विद्युत रोषणाई


**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३० सप्टेंबर -**

श्री तुळजाभवानी मातेच्या यंदाच्या शारदीय नवरात्रनवरात्रोत्सवा निमित्ताने राजेशहाजी राजमाता माँ जिजाऊ महाध्दार व नवदुर्गा विद्युत रुपात साकारली जाणार आहे.



यात राजेशहाजी महाध्दारावर दहा बाय आठ आकारात अंबाआईची विद्युत रुपात प्रतिमा साकारली आहे. तर खालील बाजूला नवदुर्गा विद्युत रुपात साकारल्या जाणार आहेत. यासाठी नवीन पध्दतीचे उजेड देणारे एलईडी बल्ब वापरले असुन १२ व्होल्टचे एसएमडी प्रकारातील सवालाख एलईडी बल्ब वापरले जाणार आहेत. फ्लेचर पध्दतीची चमकदार विद्युत प्रकाश देणारी विद्युत योजना राबवली.

टोळगे उंडाळे परिवाराची १५ वर्षापासुन मोफत सेवा पुणे येथील श्री तुळजाभवानी भक्त टोळगे उंडाळे परिवार हे मागील विद्युत रोषणाई रुपात सेवा देत असुन ही सेवा वर्षभर कार्यरत असते यांना स्थानिक



## धाराशिव फाउंडेशनचा देशाला दिशा देणारा पर्यावरणपूरक उपक्रम

### १० हजार विविध देशी वृक्षांचे केले रोपण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० सप्टेंबर -**

वृक्ष लागवड करणे व लावलेल्या सर्व वृक्षांचे जतन करणे ही काळाची गरज निर्माण झाली आहे. सर्वत्र वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते मात्र ती जतन होतात किंवा नाही याकडे दुर्लक्ष होत आहे. ही बाब पर्यावरणासाठी अतिशय धोक्याची असल्यामुळे धाराशिव फाउंडेशनच्या माध्यमातून धाराशिव तालुक्यातील वडगाव (सि) येथील सिद्धेश्वर मंदिरालगत १० एकर क्षेत्रांवर ३ हजार विविध देशी प्रजातींच्या १० हजार वृक्षांच्या रोपांची लागवड करण्यात आली. त्या रोपांचे जतन संगोपन करण्यासाठी ठिबक बसविण्यात आले असून यापैकी एक देखील वृक्ष जळणार नाही. तर लावलेल्या सर्व झाडांचे संगोपन नक्की होणार आहे. त्यामुळे वृक्षारोपण करून लावलेल्या झाडांचे संगोपन करण्याची चळवळ सर्वत्र वाढली पाहिजे असे आवाहन आमदार कैलास पाटील यांनी दि.२९ सप्टेंबर रोजी केले.

धाराशिव तालुक्यातील वडगाव (सि) येथील सिद्धेश्वर मंदिरालगत असलेल्या ओसाड जागेवर देशी असलेल्या ३ हजार प्रजातींच्या १० हजार वृक्षांचे धाराशिव शहर व परिसरातील नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील, बाळासाहेब, पुणे येथील वनश्री पुरस्कार प्राप्त देवराई फाउंडेशनचे रघुनाथ ढोले, लालासाहेब माने, नांदेड येथील ऋत फाऊंडेशनचे नांदेड शिवशंकर चापुले, पिंपरी चिंचवड येथील



आरटीओ इन्स्पेक्टर प्रकाश मुळे, पुणे येथील निसर्ग राजा मित्र जीवांचे राहुल घोलप, सुहास कदू, सुधाकर चव्हाण, एम.डी. देशमुख, काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष धीरज पाटील, उपाध्यक्ष प्रशांत पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख सतीश सोमाणी, शिवसेना शहरप्रमुख सोमनाथ गुरव, तेली समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष रवि कोरे आळणीकर, वृक्षांचे मार्गदर्शक ढोले उपस्थित होते. पुढे बोलताना आमदार पाटील म्हणाले की, गेल्या वर्षापासून वृक्ष लागवड करण्याचे नियोजन करण्यात येत होते. कारण लावलेली वृक्ष जगावीत तसेच नागरिकांना देशी व औषधीं गुणधर्म असलेल्या वनस्पतींची ओळख होऊन ती जोपासता यावीत याकडे विशेष लक्ष दिले गेले. तर जमिनीचे सपाटीकरण करून अंतर्गत रस्ते झाडे लावण्यासाठी त्याची आखणी करण्यात आली. यामध्ये पिंपळ, चिंच, आवळा, फणस, जांभूळ, वड, करंजीसह सर्व जाती धर्मात पवित्र असलेल्या वृक्षांसह ३ हजार विविध प्रजातींचा समावेश करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

वृक्ष लागवड दरवर्षी मोठ्या प्रमाणात सर्वत्र केली जाते. मात्र लावलेली ती झाडे पुढे जळाली की वाढली? याकडे कोणीच लक्ष देत नाही. वृक्षतोडीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असून लागवड करून ती जतन करण्याचे प्रमाण घटत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असून ती जतन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

# महिलांनी येणाऱ्या निवडणुकीत महायुतीचे हात बळकट करावे

## शिवसेना प्रवक्त्या ज्योतीताई वाघमारे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा/लोहारा, दि.३० सप्टेंबर -**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमुळे अनेक महिलांना आधार मिळाला आहे मात्र विरोधक या योजनेवर टीका करून ही योजना बंद पडण्याचा प्रयत्न करतात ही शरमेची बाब आहे अशा विरोधकांना येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणीने योग्य तो धडा शिकवावा असे आवाहन शिवसेनेच्या प्रवक्त्या ज्योतीताई वाघमारे यांनी आज येथील कार्यक्रमात केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेने राज्यात महिलाविषयक संवाद यात्रा सुरू केली असून त्यानिमित्त मुख्यमंत्री लाडकी बहीण संपर्क अभियानाचा मराठवाड्याचा शुभारंभ आज उमरगा येथे करण्यात आला यावेळी मुख्य मार्गदर्शक म्हणुन ज्योतीताई वाघमारे उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी माजी पंचायत समिती सदस्या उषाताई गायकवाड तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवाईताई गायकवाड, ज्योतीताई चौगुले, आकांक्षा चौगुले आदी उपस्थित होते. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते झाले.

यावेळी मार्गदर्शन करताना ज्योतीते वाघमारे म्हणाले की मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अडीच वर्षात नमो शेतकरी महासन्मान योजना, महिलांसाठी एसटीत ५० टक्के सूट, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेत महिलांना तीन गॅस सिलेंडर मोफत, महिला बचत गटांना आर्थिक मदत, मुलीच्या जन्मापासून १८ वर्षापर्यंत टप्प्याटप्प्याने एकूण एक लाख रुपयांचा निधी, मुलींना उच्च शिक्षण मोफत, मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना, अशा अनेक योजना आणून शेतकरी व सर्वसामान्यांना स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न केला आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्री लाडके बहीण योजना महिन्याला दीड हजार देणारे एकमेव मुख्यमंत्री आहेत. यापूर्वी अशी योजना का राबविले गेले नाही परंतु विरोधक यावर टीका करतात राज्यात अडीच कोटी महिलांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. दसरा दिवाळीसाठी आनंदाचा शिधा देऊन त्यांना योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. लाडकी बहीण योजना बंद पडावी म्हणून विरोधक कोर्टात गेले आहेत. मात्र यांच्या पोटात का दुखतं ? हा मोठा प्रश्न आहे. बहिणींना ही ओवाळणी आहे. मात्र विरोधक या योजनेला भिकारी म्हणतात. दीड हजार रुपये आल्यानंतर महिला आपल्या दवाखान्याच्या महिनाभराच्या गोळ्या घेऊन येतात हा त्यांचा मोठा सन्मान आहे. असा लाडका मुख्यमंत्री आजपर्यंत मिळाला नाही एवढेच नव्हे तर लाडकी बहीण हा मोठा मानसन्मान समजला जातो. विरोधक महिला सुरक्षित नाहीत अशी टीका करतात.




मात्र बदलापूर प्रकरणात अशांना शिक्षा मिळाली आहे. विरोधक त्यांना फासावर लटकवा म्हणत होते मात्र या गोळीबाराचे राजकारण करतात हे निंदनीय बाब आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या या राज्यात महिलांकडे कुणी तिरप्या नजरेने पाहणार नाही, पाहिले तर त्यांचा अक्षय शिंदे होईल असे यावेळी बोलत्याना त्या म्हणाल्या. तसेच येणाऱ्या निवडणुकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हात बळकट करण्यासाठी पुन्हा महायुती सरकारला पाठीशी राहावे असेही आव्हान त्यांनी यावेळी केले. यावेळी शिवाईताई किरण गायकवाड, आकांक्षा ताई चौगुले यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास कंटेकूरच्या सरपंच विजयाताई जमादार, दगड धानोरा ग्रा.पं.सदस्या सौ.पाटील, कोथळी सरपंच लक्ष्मीबाई सुरवसे, महिला आघाडी शहरप्रमुख लताताई भोसले, जिल्हाप्रमुख मोहन पणुरे, प्रियंका करपे, सोनकवडे ताई आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार शिवसेना महिला आघाडी तालुकाप्रमुख संध्याताई शिंदे यांनी केले. यावेळी महायुती सरकारच्या महायुती वर्षपूर्ती माहिती पुस्तकाचे वाटप यावेळी महिलांना करण्यात आले यावेळी शहर व ग्रामीण भागातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## जिल्हा मजूर सहकारी संघाची ४० वी वार्षिकसभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० सप्टेंबर -**

धाराशिव येथील स्वस्तिक मंगल कार्यालय येथे जिल्हा मजूर संघाच्या ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणुन धाराशिव जिल्हा मजूर संघाचे अध्यक्ष माजी चेअरमन संजय पाटील मजूर संघाचे माजी संचालक सतीश साळुंके माजी जिल्हा परिषद दीपक आलुरे विजय शिंगाडे पंडितराव ढोणे युवराज पाटील दिगंबर खराडे गुणवंत देशमुख देविदास भोसले यांच्या सह संघाचे संचालक अ.गफार काझी, सिद्राम जाधव ,साहेबराव पाटील, बिलाल तांबोळी ,बाळकृष्ण गोरे उपस्थित होते प्रारंभी महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी मातेच्या प्रतिमा पूजनाने या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुरुवात करण्यात आली.

यावेळी या वार्षिक सर्वसाधारण सभेत विषय पत्रिकेवरील सर्वच विषयांना एकमताने मंजुरी देण्यात आली सभेत मजूर सहकारी संस्थांना भेडसावणाऱ्या अडचणी, संस्थेचे उद्दिष्टे काम वाटप समिती कामकाज या व अशा अन्य विषयांसंदर्भात संघाचे चेअरमन नारायण नन्नवरे यांनी आपले मनोगत यावेळी व्यक्त केले.

यावेळी उपस्थित संचालक तसेच सदस्यांनी आपल्या अडीअडचणी यावेळी मनोगतातून व्यक्त केल्या. सर्वांच्या सहकार्यातून संपूर्ण मजूर सहकारी चळवळीचा व आपल्या संघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्वांचे सहकार्याची अपेक्षा आहे. जिल्हा मजूर संघाला महाराष्ट्र शासनाकडील पाटबंधारे विभाग पाणीपुरवठा नगरपालिका जिल्हा परिषद, कृषी, लघु पाटबंधारे विभागाकडील ३३ टक्के कामे मिळणे अपेक्षित असताना त्या प्रमाणात या विभागाकडून संघाकडे मजूर संस्थेस कामे वाटप करण्यासाठी कामे उपलब्ध होत नाहीत या बाबत जिल्ह्याचे नेते आमदार राणाजगजितसिंह पाटील माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या नेतृत्वखाली सबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्यासाठी आपल्या संघामार्फत शासन दरबारी प्रयत्न चालू असल्याचेही यावेळी चेअरमन नारायण नन्नवरे म्हणाले.

त्याच बरोबर जिल्ह्यातील मजूर संस्थांनी आपल्या संस्थेचे वर्गीकरण नूतनीकरण करून घ्यावे तसेच सर्व मजूर संस्थांनी जिल्हा मजूर संघाची वर्गणी नियमित भरावी असे आवाहन संघाचे चेअरमन नारायण नन्नवरे यांनी यावेळी केले सभेस जिल्हाभरातून मजूर सहकारी संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

सभेच्या यशस्वीतेसाठी संघाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले सभा अत्यंत खेळीमेळी वातावरणात ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली.

## भूकंपात मृत्युमुखी पडलेल्या मृतात्म्यास अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**कदेर, दि.३० सप्टेंबर -**

३० सप्टेंबर १९९३ रोजी झालेल्या किल्लारी येथील झालेल्या भूकंपात कित्येक लोक मृत्युमुखी पडले होते. भूकंप होऊन ३१ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय तलमोड प्रशालेच्या वतीने या परिसरामध्ये मृत्युमुखी पडलेल्या दिवंगत मृतात्म्यास अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक मोरे विराज माळी करबस, जाधव जितेंद्र राठोड नितीन, बिराजदार अश्विनी, शिक्षकेत्तर कर्मचारी मोरे प्रकाश आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पर्यटन जनजागृती समितीच्या वतीने रणजीत रणदिवे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० सप्टेंबर -**

विचारांची शिदोरी या पुस्तकाचे नुकतेच ज्येष्ठ इतिहासकार लेखक आ.ह.साळुंके यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

या बाबत पुस्तकाचे लेखक तथा पर्यटन जनजागृती संस्था धाराशिव संचलित पर्यटन विकास समितीचे कार्याध्यक्ष रणजित रणदिवे यांचा सत्कार समितीच्या वतीने करण्यात आला, रणजीत रणदिवे यांनी सर्वोत्तम भुमी पुत्र गौतम बुद्ध,बळीवंश,म-हाटा पातशहा, रावण, लोक माझे सांगाती, छत्रपती समाधीचा शोध व बोध,बोस बंधू,अशा अनेक पुस्तकाचे वाचन करुन त्यावरती अभिप्राय लिहिले व त्यातुनच विचारांची शिदोरी लिहिली गेली,या प्रेरणादायी



विचार सरणीतुन त्यांनी लिहिलेल्या पुस्तकाचा गौरव म्हणुन पर्यटन जनजागृती संस्था धाराशिव संचलित पर्यटन विकास समितीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कार केल्याबद्दल लेखक इंजि.रणजीत रणदिवे यांनी आभार व्यक्त केले.

यावेळी समितीचे अध्यक्ष युवराज नळे, सचिव देविदास पाठक, गणेश वाघमारे, अभिमान हंगरगेकर, अब्दुल लतिफ, बाबासाहेब गुळीग, इतिहासकार रविंद्र शिंदे, विजय गायकवाड, डॉ. रविराज पाटील, भागवत घेवारे सह इतर उपस्थित होते.

## अंकुरम विद्यामंदिर मध्ये रेबीज दिनाविषयी पशुवैद्यकीय विभागाची कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३० सप्टेंबर -**

शिवाजी ज्ञानविहार शिक्षण मंडळ वाशी संचलित अंकुरम विद्यामंदिर शाळेने २८ सप्टेंबर २०२४ रोजी जागतिक रेबीज डे निमित्त विद्यार्थ्यांना वाशी तालुका पशुवैद्यकीय विभाग यांच्या सहयोगाने रेबीज आजार जागृती कार्यक्रम आयोजित केला.

डॉ. प्रदीप रामेश्वर दळवे, तालुका पशुवैद्यकीय अधिकारी वाशी, डॉ. संतोष अरुण तांबडे पशुधन विकास अधिकारी,पारा, डॉ. गोविंद मंगनाळे पशुधन विकास अधिकारी तेरखेडा, डॉ. गोविंद मोरे पशुधन विकास अधिकारी तांदूळवाडी इत्यादी तज्ञ यांनी विद्यार्थ्यांना रेबीज आजाराविषयी ची माहिती दृकश्राव्य माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांना दिली.

रेबीज हा एक घातक विषाणूजन्य रोग आहे जो मानवांसह सस्तन प्राण्यांच्या मध्यवर्ती मज्जासंस्थेवर परिणाम करतो. हा विषाणू लाळेमध्ये असल्याने प्रामुख्यानं संक्रमित प्राण्याच्या चाव्याव्दारे पसरतो.



लवकर उपचार करणे महत्वाचे आहे अशी माहिती या तज्ञांनी विद्यार्थ्यांना दिली, जागतिक रेबीज दिवस दरवर्षी २८ सप्टेंबर रोजी रेबीज प्रतिबंधाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि जगभरातील या आजाराचे उच्चाटन करण्याच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देण्यासाठी पाळला जातो.

जनावरांच्या चाव्याच्या बाबतीत तत्काळ काळजी घेण्याच्या सूचना देखील तज्ञ डॉक्टरांनी दिल्या.

या वेळी संस्थेने अंतर्गत शाळा तपासणी साठी आमंत्रित केलेले बारामती च्या कॉलेज ऑफ फार्मसी चे प्रा. श्रीकांत कदम, वाशी न.प.चे नगरसेवक श्रविकास पवार, संस्थेचे अध्यक्ष डॉ. विनोद पवार, संचालक श्री विनोद माने, शाळेचे प्राचार्य संतोष चाको आणि विज्ञान शिक्षक उपस्थित होते.

## भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांचा परंडा बार असोसिएशनच्या वतीने सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० सप्टेंबर -**

भारतीय जनता पार्टीचे विधानपरिषदेचे माजी आमदार श्री. सुजितसिंह ठाकूर यांना महाराष्ट्र विधानपरिषद शतक महोत्सवी कार्यक्रमात भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते विधान परिषदेतील उत्कृष्ट भाषण पुरस्कार देण्यात आला. त्याबद्दल परंडा बार असोसिएशनच्या (विधीज्ञ मंडळ) वतीने सत्कार करुन शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी परंडा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. दत्तात्रय सुर्यवंशी, कार्याध्यक्ष ॲड. जहीर चौधरी, ॲड. सुनील शिंदे, ॲड. दादासाहेब खरसडे, ॲड. गणेश खरसडे, ॲड. संतोष सुर्यवंशी, ॲड. सुजित देवकते, ॲड. भालचंद्र औसरे, ॲड. श्रीकांत भालेराव, ॲड. विवेक काळे तसेच सर्व असोसिएशनचे सदस्य उपस्थित होते.

## अनंतदास महाराज पुण्यतिथीनिमित्त शालेय स्पर्धा उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० सप्टेंबर -**

प.पू.श्री. अनंतदास महाराज यांच्या ६१ व्या पुण्यतिथी निमित्त अनंतदास महाराज स्मारक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या शालेय विद्यार्थ्यांसाठीच्या विविध स्पर्धा शनिवार (दि.२८) रोजी आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयात उत्साहात संपन्न झाल्या.

कार्यक्रमाची सुरुवात अनंतदास महाराजांच्या प्रतिमा पुजनाने झाली. बालवाडी गटासाठी बडबडगीत व पाठांतर स्पर्धा, पहिली-दुसरी गटासाठी पाठांतर व वेशभूषा स्पर्धा, तिसरी चौथी गटासाठी कथाकथन व रंगभरण स्पर्धा, पाचवी-सहावी-सातवी गटासाठी गीतगायन, चित्रकला व हस्ताक्षर स्पर्धा, आठवी-नववी-दहावी गटासाठी भाषण, पी.पी.टी. सादरीकरण व निबंध स्पर्धा अशा गटनिहाय विविध स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धांचे परीक्षण विजया अत्रे, ज्योती तानवडे, विनया अयाचित, अपर्णा चौधरी, ज्योती चपने, सुरेश वाघमारे, डॉ. कृष्णा तेरकर, डॉ. अशोक गोरे, प्रविण अणदूरकर, अभिजीत केसकर आदींनी केले. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना मंडळाचे प्रतिनिधी गोविंदराव अयाचित



म्हणाले की, प.पू.श्री. अनंतदास महाराजांच्या कार्याचा प्रचार व प्रसार व्हावा तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा याकरिता मंडळाच्या वतीने दरवर्षी अनंतदास महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. मनिष देशपांडे यांनी केले.

## ज्ञानज्योती महिला सहकारी पतसंस्था लोहाऱ्याची दुसऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेसह तालुका महिला सक्षमीकरण स्नेह मेळावाही संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.३० सप्टेंबर -**

ज्ञानज्योती महिला सहकारी पतसंस्था लि.शाखा लोहारा २ री वार्षिक सर्वसाधारण सभा व लोहारा तालुका महिला सक्षमीकरण स्नेह मेळावा लोहारा शहरातील सप्तरंग मंगल कार्यालयात उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवतीसेना मराठवाडा निरीक्षक तथा ज्ञानज्योती महिला सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन ड. आकांक्षाताई ज्ञानराज चौगुले या तर कार्यक्रमाचे उदघाटन सौ. शिवाई किरण गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. सर्वप्रथम दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी युवती सेना मराठवाडा निरीक्षक तथा संस्थेच्या चेअरमन ड.आकांक्षाताई ज्ञानराज चौगुले यांनी सर्वसाधरण सभेचे वार्षिक अहवाल सादर केले. तसेच सौ.शिवाई किरण गायकवाड व जिल्हा सहकार विकास अधिकारी मधुकर जाधव यांनी महिलांना सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात जयभवानी महिला बचत गट तोरंबा, महिला बचत गट जेवळी, लक्ष्मी महिला बचत गट लोहारा, वैष्णवी महिला बचत गट लोहारा, हुसेना महिला बचत गट लोहारा, माऊली बचत गट खेड, मैत्री महिला बचत गट लोहारा, ज्ञानज्योती महिला बचत गट लोहारा, आदी महिला बचत गटांनी विहित मुदतीत विना विलंब कर्ज परतफेड केल्याने मान्यवरांच्या हस्ते भेट वस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला व ३ महिला बचत गटांना प्रत्येकी अडिच लाख रुपये याप्रमाणे कर्ज वाटपाचे प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. या कार्यक्रमस्थळी सभागृहाच्या बाहेरच्या बाजूस स्टॉल लावुन स्पर्श उपजिल्हा रुग्णालय सास्तूर व राष्ट्रीय व्हायरल हिपॅटायटीस (काविळ) नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत महिला व पुरुषांची मोफत आरोग्य तपासणी शिबीर, उमेद महाराष्ट्र राज्य जिवनोण्णत्ती अभियान स्वंयसहाय्यता समुहातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तुंचे विक्री व प्रदर्शन, शासकीय योजना नोंदणी कक्षामार्फत मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना व मुख्यमंत्री वयोश्री योजना याची माहिती नागरिकांना देत त्यांचे अर्ज स्वीकारण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक गटनेत्या तथा व्हाईस चेअरमन सारिका बंगले यांनी केले तर सुत्रसंचालन सुधीर येणेगुरे व आभार संस्था उपाध्यक्ष विजय वडदरे यांनी मानले. या कार्यक्रमास लोहारा तालुका प्रमुख जगन्नाथ पाटील, उमरगा तालुकाप्रमुख बळीराम सुरवसे, नगराध्यक्षा तथा संचालिका वैशालीताई खराडे, उपनगराध्यक्ष आयुब हबीब शेख, जिल्हा सहकार विकास अधिकारी मधुकर जाधव, गटनेत्या तथा व्हाईस चेअरमन सारिका प्रमोद बंगले, माजी गटनेते अभिमान खराडे, सचिव मिरा अविनाश फुलसुंदर, संचालिका सौ. सूनिता अरुण जगताप, सौ.मुक्ताताई राजेंद्र भोजने,नगरसेविका तथा संचालिका सुमन दिपक रोडगे, संचालिका मुमताज अमिन सुंबेकर, नगरसेवक अमिन सुंबेकर, नगरसेविका कमल राम भरारे, नगरसेविका शामल बळीराम माळी, नगरसेविका शमाबी आयुब शेख, नगरसेवक अविनाश माळी, नगरसेविका आरती कोरे, नगरसेविका आरती गिरी, नगरसेविका संगीता किशोर पाटील, नगरसेवक गौस मोमिन, मेडिकल असोसिएशन तालुकाध्यक्ष प्रमोद बंगले, शिवसेना शहर प्रमुख श्रीकांत भरारे, माजी नगरसेवक आयुब अब्दुल शेख, ओम कोरे, दिपक रोडगे, के.डी.पाटील, प्रशांत थोरात, नगरसेवक विजयकुमार ढगे, इंद्रजित लोमटे, नगरसेवक आरीफ खानापुरे, उपाध्यक्ष विजय वडदरे, राजेंद्र माळी, कोषाध्यक्ष अमर देशटवार, अरुण जगताप, संदिप जगताप, बबनगीरी महाराज उंडरगावकर, विनय यादव मुंबई, प्रा. शहाजी जाधव, उपसरपंच बबन फुलसुंदर, शाखा प्रमुख रमेश जाधव (नागूर), कुंडलिक सुर्यवंशी, परमेश्र्वर साळुंके, प्रशांत थोरात, सहदेव गोरे, ज्ञानेश्वर माऊली महाराज तोरंबकर, विनोद मुसांडे, सुरेश दंडगुले, सहदेव गोरे, कुंडलिक सुर्यवंशी, लक्ष्मण भुजबळ, राजेंद्र माळी, व्यंकट माळी, अशोक माळी गुरुजी, व्यंकट पाटील, शेखर सुर्यवंशी, कुलदीप गोरे, जितेंद्र कदम यांच्यासह शहर व तालुक्यातील महिला, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एकलव्य आश्रम शाळेच्या सहा खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० सप्टेंबर -**

विभागीय शालेय मॉडर्न पॅन्टॉथलॉन क्रीडा स्पर्धा ही कै. शांताराम सगने जलतरणिका जिल्हा क्रीडा संकुल श्री गुरुगोबिंदसिंघजी स्टेडीयम नांदेड येथे दिनांक २७ सप्टेंबा रोजी पार पडल्या ही स्पर्धा १७ वर्षे वयोगटातील मुला मुलींसाठी १२००मी रनिंग १०० मी स्विमिंग व नंतर १२०० मी रनिंग व १९ वर्षे वयोगटातील मुला मुलींसाठी १६००मी रनिंग २०० मी स्विमिंग व नंतर १६०० मी रनिंग अशी असून या स्पर्धेमध्ये आपल्या एकलव्य विद्या संकुलातील विद्यार्थ्यांनी अतिशय उत्तम कामगिरी करून यश संपादन केले. त्यामध्ये १७ वर्ष वयोगट मुले/मुली मध्ये ज्योतीराम पवार-द्वितीय क्रमांक, निखिल गजभार-तृतीय, कल्पना जाधव-प्रथम क्रमांक १९वर्ष वयोगट मुले/मुली मध्ये करण काळे प्रथम क्रमांक, मसू निंबाळकर द्वितीय क्रमांक, आर्या बनसोडे प्रथम क्रमांक यश संपादन केले. यश संपादन केले व या सर्व सहा खेळाडूंची पुढे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पधसाठी यांची निवड झाली आहे.

सर्व विजयी खेळाडूंचे क्रीडा प्रशिक्षक ज्ञानेश्वर भुतेकर, बालाजी क्षीरसागर, निर्मला हुग्गे यांचे संस्थेचे अध्यक्ष उद्धव काळे, कार्यवाह, विवेक अयाचीत, उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर, मुख्याध्यापक अण्णासाहेब कोल्हटकर,विठ्ठल म्हेत्रे, संस्थेचे संचालक मंडळ व क्रीडा समितीचे सर्व सदस्य व सर्व कर्मचारी यांनी अभिनंदन केले.








जिल्हा पोलिस क्रिडा स्पर्धा २०२४ च्या विजेत्या स्पर्धकांना पोलिस अधीक्षक अविनाश बारगाळ यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आला. या प्रसंगी डीवायएसपी विश्वांभर बोल्डे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उस्मान शेख, बीड शहरचे पोलिस निरीक्षक बल्लाळ, पोलिस निरीक्षक दराडे, सचिन इंगळे यांच्यासह विविध अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पोलिस ग्राऊंडवर पुरस्कार सोहळ्याचे शानदार वितरण करण्यात आले.

# शेतकरी मित्र राजेंद्र मस्केंच्या बैलगाडा शर्यतीने इतिहास घडवला

## मराठवाडा केसरीचा मानकरी आर्यन गणेशशेठ फिरंगे (बकासुर-सर्जा)

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० सप्टेंबर**

भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष, राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने बीड येथे आयोजित भव्य मराठवाडा केसरी बैलगाडा शर्यत सुमारे पन्नास हजार प्रेक्षकांच्या साक्षीने संपन्न झाली. राजेंद्र मस्के यांच्या नियोजनातून बैलगाडा शर्यतीचे मैदानाला भव्य स्वरूप आले. उत्तम व पारदर्शकपणे स्पर्धांचे नियोजन करून स्पर्धकांना सन्मानपूर्वक शर्यतीत संधी दिली. गेल्यावर्षी पेक्षा यावर्षी या मैदानाला जत्रेचे स्वरूप आले होते. मराठवाड्यातील बीड येथे झालेल्या मराठवाडा केसरी मैदानाने इतिहास घडवला.



प्रथम बक्षीस सोनालिका ट्रॅक्टर, - आर्यन गणेशशेठ फिरंगे धनगरवाडी ता. बीड यांच्या बकासुर व सर्जा बैलजोडीने साहसाने शर्यत जिंकून मराठवाडा केसरीचा मान पटकवला. तर पुढील बैलगाडा स्पर्धकांनी सहा रोख बक्षिसांचा मान पटकावला. द्वितीय बक्षीस, संजय जाधव - जालना, तृतीय बक्षीस - बापासाहेब इंदुरे, बीड, चौथे बक्षीस - बापूराव चव्हाण, नीरा, पाचवे बक्षीस - शिला गणेशशेठ फिरंगे, धनगरवाडी, सहावे बक्षीस- बुरा भाऊ शिंदे चाळीसगाव, सातवे बक्षीस - समीर पटेल ,संभाजी गीते शंकरापूर सर्व विजेत्यांचा ढाल, पुष्पगुच्छ व पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्रातील जळगाव, चाळीसगाव, छत्रपती संभाजीनगर, पुणे, इंदापूर, नगर, कल्याण, परतूर, ठाणे, सासवड, पुरंदर. बारामती, फलटण, नाशिक, माळशिरस, सांगली आदीसह बीड जिल्ह्यातील शेतकरी बांधवानी सहभाग नोंदवला. सकाळी ०८.०० वाजल्यापासून सायंकाळी ०७.०० वाजेपर्यंत बैलगाडा प्रेक्षकांची तोबा गर्दी मैदानावर होती. तळपत्या उन्हात लोकांनी शर्यतीचा आनंद लुटला. शुभारंभासाठी महंत शिवाजी महाराज, नारायणगड संस्थान नारायणगड, महंत शांतीब्रह्म नवनाथ बाबा, गोरक्षनाथ टेकडी संस्थान, महंत स्वामी योगिराज महाराज रामगड संस्थान, माजी आमदार राजेंद्र जगताप, सर्जेराव तांदळे, नवनाथ शिराळे, अशोकराव हिंगे, कल्याण काका आखाडे, नारायणराव शिंदे, सोमनाथराव माने, दिलीपशेठ लोढा, रमेश चव्हाण, लक्ष्मण काटे, ओमप्रकाश गिरी, गणेश उगले, भाऊसाहेब डावकर आदि मान्यवर उपस्थित होते. ही शर्यत यशस्वी करण्यासाठी राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. शर्यतीचे नियोजन समन्वय व सूत्र संचालन मारुती तिपाले यांनी केले.

# बीड विधानसभा पूर्व नियोजन बैठक व शिवदूत/बूथ प्रमुख मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० सप्टेंबर**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या विचारांचा वारसा पुढे घेऊन चालणारे महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय, कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब जनतेसाठी अठरा-अठरा तास काम करत असून महाराष्ट्र राज्यातील महिला-भगीनी ,शेतकरी, कष्टकरी, तरुण, गोरगरीब अशा सर्व स्तरावरील माणसांचा सक्षम आधार बनले आहेत. सर्व सामान्यांच्या हिताच्या योजना राबवत त्यांनी मी जनतेचा सेवक असल्याचे सिद्ध केले आहे. विधानसभा निवडनुका तोंडावर येऊन ठेपल्या असून आता शिवसैनिकांना महाराष्ट्र हितासाठी मुख्यमंत्री शिंदे साहेबांचे हात बळकट करण्याची वेळ आली आहे. एकनाथजी शिंदे साहेबांना पुन्हा एकदा मुख्यमंत्री बनवून महाराष्ट्रावर शिवसेनेचा भगवा आपल्याला फडकवायचा आहे त्यामुळे शिवसैनिकांनो सज्ज व्हा, हाडाची काड करून कामाला लागा असे प्रतिपादन शिवसेनेच्या उप नेत्या प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योतीताई वाघमारे यांनी बीड विधानसभा पूर्व नियोजन बैठक व शिवदूत/बूथ प्रमुख मेळाव्यात केले.

काल दु १२.०० वाजता हॉटेल नीलकमल येथे बीड विधानसभा पूर्व नियोजन बैठक शिवदूत/बूथ प्रमुख मेळावा संपन्न झाला. या मेळाव्यात शिवसेना प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योतीताई वाघमारे यांनी ऑनलाईन प्रणाली द्वारे शिवसेना महिला आघाडी, युवसेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी, शिवदूत/बूथ प्रमुख यांच्याशी संवाद साधत शिवसेनेचे पुढील ध्येय-धोरण याबाबत मार्गदर्शन केले. दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांनी देखील उपस्थित शिवदूत बूथ प्रमुख यांच्याशी संवाद साधत यंदाच्या विधानसभा निवडणुकीत आपल्या तळागाळातील माणसांची जाण असणारे मुख्यमंत्री शिंदे साहेबांच्या माघे आपल्याला ताकदीने उभा राहायचे आहे. शिंदे साहेबांना पुन्हा मुख्यमंत्री बनवण्यासाठी वज्रमुठ आवळून शिवसेनेला सत्तेत आणायचे आहे असे आवाहन केले.

# माजलगाचा स्वप्नील इंदानी एम पी एस सी परीक्षेत यशस्वी

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३० सप्टेंबर**

माजलगाव येथील संप्नील जितेंद्र इंदानी या युवकाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवत २६८ वि रँक मिळवली.स्वप्नीलचे माजलगावच्या श्री सिद्धेश्वर विद्यालयात माध्यमिक व लातूर च्या विवेकानंद महाविद्यालयात उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण झाले आहे. तो इलेक्ट्रॉनिक इंजिनियर असून कसलेही क्लासेस न लावता स्वयं अध्ययन द्वारे घरीच अभ्यास करून ही परीक्षा पास झाला.



त्याच्या या यशाबद्दल माजलगाव माहेश्वरी सभेचे तालुकाध्यक्ष उमेश जेथलिया, सचिव गोपाल मानधने, गोविंद बजाज, राजेंद्र इंदानी, जुगलकिशोर झंवर,संतोष जेथलिया, प्राकमलकिशोर लड्डा,विकास मालानी,डॉ संदीप मुंदडा,विवेक बजाज, विवेक मुंदडा, गणेश लोहिया, डॉ आनंद राठी, बालकिशन झंवर, डॉ सीताराम इंदानी यांनी यतोचित सत्कार केला.शहरात सर्व स्तरातून त्याचे कौतुक होत आहे.

# ना.अजित पवार यांच्या उपस्थित होणाऱ्या जनसन्मान यात्रेस हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे- आ.प्रकाश सोळंके,जयसिंग सोळंके

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३० सप्टेंबर**



राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांची माजलगाव येथे मंगळवार दि.१ऑक्टोंबर रोजी जनसन्मान यात्रा येणार आहे. त्यानिमित्त सकाळी दहा वाजता मंगलनाथ मैदान येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे.या जनसन्मान यात्रेस हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ.प्रकाश सोळंके व माजी जिल्हा परिषद बांधकाम सभापती जयसिंग सोळंके यांनी केले आहे.



महायुती सरकारने राज्यात जनहिताच्या अनेक योजना राबवल्या आहेत.या सर्व योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्या साठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नेते तथा उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांनी संपूर्ण राज्यात दौरा काढलेला आहेत.त्या अनुषंगाने माजलगाव मतदार संघात जनसन्मान यात्रा मंगळवार दि.१ऑक्टोंबर रोजी येत आहेत.यावेळी ना.अजित पवार यांच्या स्वागतासाठी पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून भव्य मोटार सायकल रॅली काढण्यात येणार आहे.यानंतर मंगलनाथ मैदान येथे सकाळी दहा वाजता जाहीर सभा होणार आहे.या कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे,ना. सुनील तटकरे,पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रूपालीताई चाकणकर, माजी आ.अमरसिंह पंडित,आ. आजबेकाका,मा.नगराध्यक्ष योगेश क्षीरसागर,पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश चव्हाण,यांच्यासह पक्षाच्या अनेक प्रमुख नेत्यांची उपस्थिती राहणार आहे.त्यामुळे माजलगाव मतदार संघातील नागरिकांनी या जनसमान यात्रेनिमित्त होणाऱ्या जाहीर सभेस हजारोंच्या संख्येने उपस्थिती लावावी.असे आवाहन आ.प्रकाश सोळंके यांच्यासह बीड जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती जयसिंग सोळंके यांनी केले आहे.

# नवरात्र उत्सवा निमित्य रेणुकादेवी व मुळजोगाई देवस्थान अंबाजोगाई येथे ०३ ते १६ ऑक्टोबर दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३० सप्टेंबर**

प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी नवरात्र उत्सवा निमित्य श्री रेणुकादेवी व श्री मुळजोगाई देवस्थान, अंबाजोगाई येथे ०३ ऑक्टोबर ते १६ ऑक्टोबर दरम्यान अखंड हरिनाम सोहळ्या निमित्य विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती देवस्थानचे मुख्य व्यवस्थापक व पुजारी श्री. दत्तात्रय अंबेकर व उत्सवाचे चालक नानाश्री यादव यांनी दिली आहे.

कै. मुकुंदअप्पा यादव कै. शामलाल मोदी, कै. शिवाजीराव अंबेकर, कै. बी. एन. सातपुते, कै. ताराचंद परदेशी यांच्या प्रेरणेने व वै. माधवबुवा शास्त्री, किसन महाराज पवार यांच्या आशिर्वादाने आश्विन शु.१ गुरुवार दि. ०३ ऑक्टोबर २०२४ रोजी या सोहळ्यास प्रारंभ होणार असुन सकाळी ७ वा श्री योगेश परदेशी यांच्या हस्ते घटस्थापना होईल व श्री विष्णुशेठ बजाज यांच्या हस्ते गाथा पुजनाने या महोत्सवास प्रारंभ होईल. वार्षिक महोत्सवाचे हे ३५ वे वर्ष आसुन या महोत्सव काळात सकाळी ६ ते ७ विष्णुसहस्त्रनाम ७ ते ८, श्री बाळू औसेकर यांचा सप्तशितीपाठ, ८ ते ९ अभिषेक, ९ ते १२ गाथ्यावरील भजन, ११ ते १ हरिकिर्तन, सायं. ५ ते ६ हरिपाठ, ६ ते ७ आरती या प्रमाणे दैनंदिन कार्यक्रम होणार असून या उत्सवात श्री.ह.भ.प. बाळासाहेब महाराज कुलकर्णी, श्री.ह.भ.प. विकास महाराज गडदे, श्री.ह.भ.प. गुरुवर्य अच्युत महाराज जोशी, ह भ प अमोल महाराज गोरे सोनपेठकर, ह.भ.प. डॉ. पांडुरंग महाराज तिडके, श्री.ह.भ.प. डॉ. नाथराव महाराज गरजाळे, श्री.ह.भ.प. शिवाजी महाराज ठोंबरे, श्री.ह.भ.प. गोविंद महाराज सुकरे की ना वारकरी संस्था, अंबाजोगाई), ह भ प पांडुरंग महाराज कोकाट नांदगाव, ह भ प प्रमोद महाराज आव्हाड, श्री.ह.भ.प.गजानन महाराज सुवर्णकार घाटनांदूर, श्री. ह. भ. प. श्रीकृष्ण महाराज चवार, श्री. ह. भ. प. प्रभाकर महाराज उगले यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आलेले आसुन या सप्ताहात दररोज श्री संत सावता महाराज भजनी मंडळ आनंद नगर, दत्त मंदिर भजनी मंडळ, संत ज्ञानेश्वर भजनी मंडळ, खडकपुरा भजनी मंडळ, योगायोग भजनी मंडळ, मध्यवर्ती हनुमान भजनी मंडळ, दक्षिणमुखी भजनी मंडळ हजेरी लावणार आहे.




दि. ११ ऑक्टोबर २०२४ शुक्रवार रोजी सकाळी १० वा. अशोक मोदी यांच्या हस्ते होम-हवन होवून दुपारी १ वाजता पुर्णाहुती पडेल व दुपारी ४ वा मा. तहसिलदार श्री विलास तरंगे साहेब यांच्या हस्ते श्री रेणुका देवी पालखीची आरती व मा. नगराध्यक्ष, अंबाजोगाई यांच्या हस्ते श्री मूळजोगाई देवीची आरती होऊन श्री रेणुका देवीच्या पालखी सोहळयास प्रारंभ होईल व गावाची परिक्रमा झाल्या नंतर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विनोद घोळवे यांच्या हस्ते मंदिर स्थळी आरती होऊन पालखी सोहळयाची सांगता होईल.

आश्विन शु. १५ बुधवार १६ ऑक्टोबर रोजी श्री अरुण रामकृष्ण काळे यांच्या हस्ते पुजन व श्री.ह.भ.प. गुरुवर्य किसन महाराज पवार यांचे काल्याचे किर्तन होईल. १७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत स्थानिक आराधी मेळा होऊन या सोहळ्याची सांगता होईल.

हा उत्सव यशस्वी करण्यासाठी अशोक मोदी, मनोज मोदी, सितेंद्र सातपुते, रामेश्वर रांदड, मनोज जाधव, योगेश परदेशी, प्रमोद पाटील, सौ शामल अंबेकर, श्री. आमोल घोडके, श्री. राज कुडके, गणेश अंबेकर, प्रतिक्षा अंबेकर, प्रांजली अंबेकर, परमेश्वर दोनगहु, राहुल मोदी यांच्या सह असंख्य कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

# सत्ताविस वर्षांपासून संजयनगरात विनावर्गणी दुर्गात्सव होतो साजरा

**जयभवानी दुर्गात्सव समीतीच्या अध्यक्षपदी अमोल काबळे यांची निवड कार्याध्यक्षपदी मगन परदेशी**

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.३० सप्टेंबर**




संजयनगर येथील जयभवानी ग्रुपची बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळेस जयभवानी दुर्गात्सव समितीच्या अध्यक्षपदी अमोल काबळे तर उपाध्यक्ष सतिष पवार, सचिव प्रकाश बर्डे,सह सचिव अमोल हादगुले,सघटक राजेंद्र गरड,कार्याध्यक्ष मगन परदेशी, कोषाध्यक्ष प्रकाश उपळकर, यांची जयभवानी दुर्गात्सव समीतीचे संस्थापक अध्यक्ष तथा मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी यांच्या उपस्थितीत निवड करण्यात आली.

यावेळी जयभवानी ग्रुपचे अध्यक्ष अनिल खाडेकर, रजित काबंळे,पिटु साळवे.शंकर शिदे, सदाशिव भाले,दिपक अवघड,राजेंद्र तापडीया, शेख बाबा,शेख मुददशीर, शेख नसिर, शेख ईर्शाद,विनायक गिरी,विक्रम गिरी,प्रभु सुतार, संतोष सावंत,अविनाश पंडीत,सचिन गिरी, दिनकर सुतार, संतोष सोनट्टके,दत्ता धुरंधरे, अनिल काबळे, पप्पु थोरात,साईनाथ पाटोळे,महेश सुर्यवंशी,लाला सुर्यवंशी, आकाश सुतार आदि उपस्थित होते.संजयनगर येथे १९९७ पासुन ते आज पर्यंत दुर्गा महोत्सव साजरा करण्यात येतो यासाठी याभागाचे सामाजिक कार्यक्रते मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी यानी १९९७ ला पहिल्यांदा संजयनगर भागातील सर्व जाती धर्मातील नागरीकांना एकत्र करून नवरात्र महोत्सवात जय भवानी दुर्गात्सव समीतीची स्थापना करून आज तब्बल २७ व्या वर्षात सुध्दा त्याच जोशात नवरात्र महोत्सव साजरा होत आहे.संजयनगर भागातील गोरगरीब नागरीक गेली २७ वर्षां पासुन विना वर्गणी नवरात्र महोत्सव साजरा होत आहेत जयभवानी ग्रुपचे सर्व सदस्य आप आपल्या परिस्थिती प्रमाणे वर्गणी जमा करून दुर्गात्सव साजरा करतात यासाठी महिला सुध्दा सहभाग घेऊन नवरात्र महोत्सव साजरा करत आसतात

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

लातूर
दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल

# पाथरवाडीच्या अध्यात्मिक पीठात बाल संस्कार शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ३० सप्टेंबर-**

रेणापूर तालुक्यातील पाथरवाडी येथे उभारण्यात आलेल्या श्री महादेव आणि हनुमान मंदिर अध्यात्मिक पीठ आणि भारत विकास परिषद, सिद्धेश्वर शाखा, लातूरच्या संयुक्त विद्यमाने दि.९ ते दि.१६ नोव्हेंबर या कालावधीत बालसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अध्यात्मिक पीठ प्रकल्पाचे उपाध्यक्ष नवनाथ रघुनाथ मद्दे यांनी दिली.

या शिबिरात केवळ इयत्ता पाचवी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. हे निवासी शिबीर पाथरवाडीच्या अध्यात्मिक पीठात निवासी स्वरूपात संपन्न होणार आहे.

शिबिरात मार्गदर्शन करण्यासाठी नामवंत किर्तनकार, कथाकथनकार, प्रवचनकार, उद्योजक आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची उपस्थिती लाभणार आहे. या संस्कार शिबिरात जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी व्हावेत, याकरिता अनेक शाळांच्या मुख्याध्यापकांशी संपर्क साधून त्यांना त्यांच्या विद्यालयातील विद्यार्थ्यांना शिबिरासाठी पाठवण्याची विनंतीही केली जात असल्याचे नवनाथ मद्दे यांनी सांगितले. संस्कार शिबिराच्या यशस्वीतेसाठी समाजातील सर्वच स्तरातील नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन अध्यात्मिक पीठाचे अध्यक्ष सुहास गोवर्धन, उपाध्यक्ष नवनाथ मद्दे, किशन तात्या मंदाडे, सर्वोत्तम कुलकर्णी, विलास आराध्ये गुरुजी, भंवरलाल जागींड, जगदीश तोष्णीवाल, राजन अयाचित, भूषण दाते, शंकरराव देशमुख, विशाल अयाचित, बालाजीराव बिराजदार, गोविंदराव मोटेगावकर, रमेश मद्दे आदींनी केले आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त




### वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्काराने पत्रकार प्रशांत शेटे सन्मानित

**चाकूर, दि. ३० सप्टेंबर-**

चाकूर येथील पत्रकार प्रशांत शेटे यांना महाराष्ट्र राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने देण्यात येणारा वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार एका विशेष कार्यक्रमात राज्याचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते सपत्नीक देऊन सन्मानित करण्यात आले. व्यासपीठावर राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे, शिक्षक आमदार विक्रम काळे, कृषी विभागच्या सचिव जयश्री भोज, कृषी आयुक्त रवींद्र बिनवडे उपस्थित. प्रशांत शेटे यांनी शेतीविषयक त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या विविध यशोगाथा व कृषी विभागाच्या विविध योजनेची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी माध्यम म्हणून योग्य भूमिका बजावल्याबद्दल त्यांना महाराष्ट्र शासनाच्यावतीने कृषी मित्र पुरस्कार फेब्रुवारीमध्ये जाहीर झाला होता. रोख रक्कम एक लाख २० हजार रुपये सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. कृषी विभागाच्या वतीने मुंबई येथे आयोजित विशेष समारंभात पुरस्काराचे वितरण करण्यात आले. प्रशांत शेटे यांना कृषी विभागाचा शासकीय पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



### महाराष्ट्र विद्यालय पतसंस्थेची वार्षिक सभा उत्साहात

**निलंगा, दि. ३० सप्टेंबर-**

तालुक्यातील औराद शहाजानी येथील शारदोपासक शिक्षण संस्था संचलित महाराष्ट्र विद्यालय वेतनोपार्जक सेवकांची सहकारी पतसंस्थेची ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पतसंस्था चेअरमन किशोर गुंड तर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य दयानंद जाधव व मुख्याध्यापक चंद्रकांत वलांडे उपस्थित होते. चेअरमन किशोर गुंड यांनी पतसंस्था मागील वर्षात नफ्यात आली असल्याचे सांगितले. तसेच सामूहिक प्रयत्नांतून अग्रगण्य पतसंस्था म्हणून नावारूपास आणण्यासाठी संचालक मंडळ कटिबद्ध असल्याचे सांगून सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिले. सभेचे प्रास्ताविक व अहवाल पत्रिका वाचन, वार्षिक लेखाजोखा, अंदाजपत्रक सादर करताना आपल्या पतसंस्थेला मागील अनेक वर्षापासून ऑडिट 'अ' वर्ग मिळाला असून पतसंस्था सहकार विभागाच्या सर्व नियमांचे पालन करून चालविण्यात येत असल्याचे प्रतिपादन पतसंस्था सचिव बालाजी मरळे यांनी केले. पतसंस्थेवर सभासदांचा विश्वास वाढला असल्याचे सांगून संचालक मंडळाचे कौतुक प्रा. विजय पवार यांनी केले. याप्रसंगी उपाध्यक्ष शोभा बिराजदार, संचालक शंकर वलांडे, मंगेश शिंदे, दिगंबर सावरे, रमेश थेटे, मोईन आळंदकर, विशाल ओहळ, द्वारका वानखेडे आदींसह सभासद उपस्थित होते.

### शिरूर आनंतपाळ तहसील परिसरात दलालांची मनमानी; शेतकऱ्यांची लूट

**येरोळ, दि. ३० सप्टेंबर-**

शिरूर अनंतपाळ तहसील कार्यालयाबाहेर दुकाने टाकून बसलेल्या स्टॅम्प विक्रेत्यांकडून गेले अनेक दिवसांपासून स्टॅम्प विक्रीच्या व्यवसायातून मोठ्या प्रमाणात शेतकरी मजूरांकडून आगाऊ पैसे घेऊन चांगलीच लुट केली जात असून तालुका प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष असल्याने स्टॅम्प विक्रीतून विक्रेते लुट करीत असल्याचे शेतकरी, मजूर,गरजू नागरिक यांच्या तक्रारारी वाढत आहेत.

शिरूर अनंतपाळ तहसील कार्यालयाच्या परिसरात सात-आठ स्टॅम्प विक्रेते आहेत. सध्या कषी शासनाकडून शेतकऱ्यांना अनुदान देण्याचे जाहीर करण्यात आले असून सोबतच शासनाकडून खरीप पिके नुकसान अतिवृष्टीचे अनुदान शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे.यासाठी कषी विभाग व तलाठी कार्यालयाकडून शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा करण्यासाठी मयत व्यक्तीचे वारस, अज्ञान वारस,सामाईक शेती क्षेत्र नावावरील शेतकरी यांच्याकडून वारस संमती शपथ पत्र शंभर रुपयांच्या स्टॅम्प ड्युटीवर वकिलांकडून नोटरी करुन दाखल करण्याच्या सूचना देण्यात आले आहेत. आसे अल्प शेती मजूर, शेतकरी स्टॅम्प पेपर वर शपथ पत्र घेण्यासाठी तहसील बाहेील स्टॅम्प विक्रेत्यांकडे गर्दी करीत आहेत याचाच फायदा घेत स्टॅम्प विक्रेते शंभर रुपयाचे स्टॅम्प (बॉन्ड) वीस, तीस आगाऊ रुपये घेऊन बॉन्ड विक्री करीत असल्याचे शेतकरी, मजूरांच्या तक्रार असून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे सामान्य शेतकऱ्यांना लुटत असल्याचे नाराजीने बोलून दाखवत आहेत , नोटरी वकिल, ऑनलाईन व्यावसायिकही मनमानी पैसे घेऊन गरीब शेतकरी, मजूर यांना लुटत असून याकडे स्थानिक तालुका प्रशासन व पुढारी यांनी तात्काळ दखल घेऊन हि लुट थांबवून व्यावसायिकांना दराचे फलक लावण्याचे आदेश देऊन शेतकऱ्यांची लुट, थांबवावी आशी मागणी येरोळ, दैठणा, सुमठाणा, चामरगा, बोळेगाव, साकोळ, पांढरवाडी जाभंळवाडी हाणमंतवाडी येथील शेतकऱ्यांनी केली आहे.

# 'किल्लारी'चे विस्तारीकरण लवकरच

## आ. अभिमन्यू पवार; किल्लारी कारखान्याची वार्षिक सभा

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि.३० सप्टेंबर -**



अवसायनातीला कारखाना सुरु करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारची मदत मिळत आहे. कारखान्याच्या कार्यक्षेत्राचा विचार करुन दाखल केलेल्या प्रस्तावास राज्य सरकारने मंजुरी दिली असून गाळप क्षमतेत वाढ होणार आहे. यामुळे येणाऱ्या काळात कारखान्याचे विस्तारीकरण लवकरच करुन आधुनिक मशनरीची जोड दिली जाणार असल्याचे प्रतिपादन आ. अभिमन्यू पवार यांनी केले .

किल्लारी सहकारी साखर कारखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. त्यावेळी आ.पवार बोलत होते.भाजपचे तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे, प्रा सुधीर पोतदार, युवराज गायकवाड, उपनिबंधक संपत जाधव, उपनिबंधक प्रविण फडणीस, बाजार समितीचे संचालक गोविंद भोसले, सुनील देशमुख, सुभाष भोसले, बालाजी निकम, संजय कुलकर्णी उपस्थित होते.

आ. अभिमन्यू पवार म्हणाले, किल्लारी साखर कारखाना सुरु करणे अशक्यप्राय असल्याचे अनेक कारखानदारांचे म्हणणे असतानाही आव्हान स्विकारुन पुन्हा नव्याने उभारण्याचा चंग बांधला आहे. यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोलाची साथ दिली. तसेच आ. ज्ञानराज चौगुले यांनी खांद्याला खांदा लावून काम केले आहे. यापुढील काळात आपण सर्वांनी अपेक्षित अशी साथ दिली तर किल्लारी साखर कारखान्याला गतवैभव मिळवून देऊ, अशी ग्वाही आ. अभिमन्यू पवार यांनी दिली.

कारखाना हंगाम सुरू करताना अनेक अडचणी आल्या काही नैसर्गिक तर काही कृत्रिम होत्या पण निळकंठेश्वरच्या मनात किल्लारी कारखाना पुनर्जीवित व्हावा, हीच इच्छा असल्याने त्यांनी हा कारखाना पुन्हा उभा करण्यासाठी ताकद दिली. आपल्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना आपल्या हक्काचा कारखाना राहावा. यासाठी हा कारखाना सहकारात सुरू करण्याचा निर्णय घेऊन तो महायुती सरकारच्या माध्यमातून मार्गी लागला आहे. शेतकऱ्यांची लूट होऊ नये म्हणून किल्लारी सुरू करण्याचा निर्णय घेतला असून शेतकरी, सभासदांनी साथ द्यावी, असे आवाहन आ. अभिमन्यू पवार यांनी केले.

राष्ट्रपती द्रौपती मुर्मू यांच्या हस्ते महाराष्ट्र विधानसभेतील उत्कृष्ट भाषण पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल आ. अभिमन्यू पवार यांचा किल्लारी साखर कारखान्याच्या वतीने सत्कार करण्यात आला.

### कारखाना परिसरात व्यापारी संकुलाची उभारणी करणार : आ. पवार

कारखाना परिसरात व्यापारी संकुल उभारणीच्या दुष्टीने त्याचे डिझाईन तयार करण्यात आले आहे.नव्याने व्यापारी संकुल उभारणी करीत असताना येथील कोणत्याही व्यापाऱ्याला वाऱ्यावर सोडले जाणार नसल्याचे सांगून सभासदांनी या सर्व कामासाठी अपूर्ण भाग पूर्ण करून जमा करावा . असे आवाहन यावेळी बोलताना आमदार अभिमन्यू पवार यांनी केले आहे



# श्रीकिशन सोमाणी विद्यालयात पालकांसाठी ग्रंथालय

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ३० सप्टेंबर-**

श्रीकिशन सोमाणी विद्यालयात पालकांसाठी ग्रंथालय सुरू करण्यात आले आहे.

महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी पालकांसाठी पुस्तके उपलब्ध असतात. यावेळी ६५ पालकांनी पुस्तके घरी वाचण्यासाठी नेली. यामध्ये विशेष म्हणजे माता पालकांचा सहभाग अधिक होता. विद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन संवर्धित व्हावी यासाठी, नेहमीच विविध उपक्रम घेतले जातात. विद्यार्थ्यांबरोबरच आता पालकांमध्येही वाचनाची आवड निर्माण करण्याचा, ती जोपासण्याचा प्रयत्न केला जात आहे. आपल्या पालकांच्या हातात पुस्तके दिसल्यास विद्यार्थीही आपोआप पुस्तकाकडे वळतील व त्यांचे वाचन वाढेल, याच उद्देशाने मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांनी हा उपक्रम सुरु केला आहे.

विद्यालयाचे ग्रंथपाल नितीन उपरे यांनी ग्रंथ वितरणाचे पूर्ण नियोजन केले आहे. लक्ष्मी सातपुते या शिक्षिका याकामी त्यांना मदत करतात. अनोख्या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर यांनी अभिनंदन केले.

# नियमित कर्ज भरणा करणाऱ्या कर्जदारांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ३० सप्टेंबर-**

एखाद्या पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नियमितपणे कर्ज भरणा करणाऱ्या कर्जदारांची सत्कार करणे हा अतिशय सुरेख आणि कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ज्येष्ठ संचालक अशोकराव गोविंदपूरकर यांनी केले.

लातूर येथील वीर माहेश्वर अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटीची चौथी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी उत्साहपूर्ण आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या सर्वसाधारण सभेत प्रमुख पाहुणे म्हणून अशोकराव गोविंदपूरकर बोलत होते. यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष कीर्तिकुमार देवणीकर उपाध्यक्ष विजयकुमार मठपती सचिव अशोक मठपती, संचालिका महादेवी स्वामी, श्रीदेवी स्वामी यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात दिवंगत सभासदांना श्रध्दांजली वाहून करण्यात आली. प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करुन ४ थी वार्षिक सभेला रीतसर सुरुवात आली. या प्रसंगी पतसंस्थेच्या हितचिंतक सभासद, नियमित कर्ज भरणाऱ्या कर्जदारांना, पिग्मी एजंटांचा व पतसंस्थेच्या कर्मचाऱ्यांचा शाल, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या सर्वसाधारण सभेचे प्रास्ताविक सचिव अशोक मठपती यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी आगामी आर्थिक वर्षात १० वी व १२ वीच्या ९५ टक्के गुण मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. ५००० देऊन सन्मान करण्यात येणार असल्याचे व संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक विश्वनाथप्पा सावळे यांनी १० वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना रोख रक्कम देणार आहेत असे सांगितले.



पतसंस्थेच्या वार्षिक अहवालाचे वाचन अध्यक्ष कीर्तिकुमार देवणीकर केले. तर उपाध्यक्ष विजयकुमार मठपती यांनी नफ्याचे विवरण स्पष्ट केले व ५ टक्के लाभांशाची घोषणा केली. ताळेबंद व तेरीज पत्रकाचे वाचन व्यवस्थापक अमोल हलगरकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवकांत स्वामी व कुमार स्वामी गणाचार्य यांनी तर आभार प्रदर्शन इंजिनिअर विजयकुमार चोळखणे यांनी केले. या सर्वसाधारण सभेसाठी पतसंस्थेचे संचालक विजयकुमार चोळखणे, बसवराज स्वामी लिंबाळकर, बसवराज स्वामी चिट्टे, विजयकुमार चिट्टे, विवेकानंद स्वामी, वैजनाथ स्वामी, व्यवस्थापक अमोल हलगरकर उपस्थित होते

### श्रद्धा गालफाडे हिची जेएसडब्ल्यू एनर्जी पावर जनरेशन कंपनीमध्ये निवड

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. ३० सप्टेंबर-**



रेणापूर तालूक्यातील पानगाव येथील श्रद्धा राजेभाऊ गालफाडे हिची जेएसडब्ल्यू एनर्जी पावर जेनरेशन कंपनीमध्ये निवड करण्यात आली.श्रद्धा चे प्राथमिक शिक्षण जि. प. प्राथमिक शाळा इनामवाडी येथे झाले. माध्यामिक शिक्षण तिरुपति विद्यालयाच्या अध्यक्ष पानगाव येथे झाले.व उच्च माध्यमिक शिक्षण शिवाजी महाविद्यालय रेणापुर येथे झाले. नंतर शासकीय तंत्र निकेतन धाराशीव येथुन अभियांत्रिकीचे सिव्हील डिप्लोमा पूर्ण झाल्यानंतर जे.एस. डब्ल्यू.एनर्जी पावर जनरेशन कंपनी मध्ये निवड झाल्याने पानगावकरांतुन कौतुक केले जात आहे.

# जागतिकीकरणाच्या स्पर्धेत टिकण्यासाठी व्यापाऱ्यांनी अपडेट रहावे : कोरे

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. ३० सप्टेंबर-**

उद्योग व्यापार क्षेत्रात जागतिकरणाने मोठे बदल झाले आहत. या स्पर्धेत भारतीय व्यापारी टिकला पाहिजे म्हणून बदलत्या काळानुसार त्यांना प्रशिक्षित करणे गरजेचे आहे. त्यासाठी महाराष्ट्रातील सर्व फार्मासिस्ट बांधवांना महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिलच्या वतीने विविध कोर्सच्या माध्यमातून ट्रेनिंग दिली जात असल्याचे प्रतिपादन स्टेट फार्मसी कौन्सिलचे सदस्य मनोहर कोरे यांनी केले.

महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिल व लातूर जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने निलंगा येथील महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी येथे आयोजित रिफ्रेश कोर्स ट्रेनिंग कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केमिस्ट संघटनेचे जिल्हा अध्यक्ष रामदास भोसले होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून अन्न व औषध प्रशासनाचे विभागाचे सहाय्यक आयुक्त बळीराम मरेवाड, औषध निरीक्षक स्वाती कुपकर, प्राचार्य डॉ. एस.एस. पाटील, प्राचार्य डॉ. भागवत पौळ, संघटनेचे जिल्हा सचिव अरुण सोमाणी, जिल्हा उपाध्यक्ष अनिल स्वामी, जिल्हा उपाध्यक्ष ओम प्रकाश बाहेती, अतुल कोटलवार, नागेश स्वामी, अंकुश भोसले, निलंगा तालुका अध्यक्ष बालाजी थेटे, औसा तालुका अध्यक्ष संजय भालकीकर, शिरूर अनंतपाळ तालुका अध्यक्ष प्रदीप पाटील उपस्थित होते. यावेळी अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त बळीराम मरेवाड यांनी तरुण पिढी नशेच्या आहारी जाणार नाही याची काळजी फार्मासिस्टनी काळजी घेतली पाहिजे नार्कोटिक्स ड्रगचा लोक गैरवापर करून घेत आहेत.

कायद्याचे पालन करून व्यवसायिकांनी आपला व्यवसाय करावा मरेवाड यांनी नार्कोटिक्स ड्रगसह इतर औषध प्रशासनाच्या विविध कायदेविषयक सविस्तर असे मार्गदर्शन केले. तर प्रा प्रदीप भोसले, डॉ पद्मजा गिराम, फार्मासिस्ट कौन्सिलचे ट्रेनर भूषण माळी, प्राचार्य डॉक्टर एस एस पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी तालुका संघटनेचे सचिव राजेंद्र धुत, सोमनाथ आग्रे, वैभव पाटील, हंसराज शिंदे, बाबुराव महाजन, अनिल धुमाळ, दत्ता पाटील, विकास साळुंके, ओम आग्रे, हर्षवर्धन सातपुते, विशाल नेलवाडे, संजय माने, राजप्पा शंकद, दिपक नाईक, संजय पवार, भाग्यश्री मंजरीकर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा सतीश हानेगावे यांनी केले तर आभार सोमनाथ आग्रे यांनी मानले.

# बाभळगाव येथे रामलीलाचे आयोजन

## दसरा महोत्सव; ३ ते १२ ऑक्टोंबरपर्यंत आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ३० सप्टेंबर-**

भारतीय संस्कृतीचा आधारस्तंभ असलेल्या रामायणाचे अद्वितीय सौंदर्य अनुभवण्याची संधी सर्व लातूरकरांना मिळणार आहे. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्वामी श्री भुवनेश्वर वशीष्ठजी महाराज यांच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या वाणीत रामलीला सादर केली जाणार आहे. या रामलीला कार्यक्रमाचे आयोजन बाभळगाव येथे दसरा महोत्सवानिमीत्त करण्यात आले आहे. राम लीलाचे आयोजन नवरात्र महोत्सव समिती, ग्रामपंचायत, सेवा सोसायटी, तंटामुक्ती ग्राम समिती व ग्रामस्थ बाभळगाव यांच्या वतीने हे भव्य आयोजन ३ ते १२ ऑक्टोबर दरम्यान श्री व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, मैदान, बाभळगाव येथे करण्यात आले आहे. या राम लीला कार्यक्रमाचा लाभ सर्व भाविकांनी घ्यावा असे आवाहन नवरात्र महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

भारतीय महाकाव्यांतील रामायण हे प्रसिद्ध ऋषी वाल्मिकी यांनी लिहिलेले आहे. हा प्रसिद्ध धर्मग्रंथ संस्कृतमध्ये काव्यात्मक स्वरूपात रचला गेला. रामायण ही वाईटावर चांगल्याच्या विजयाची कथा आहे, जिथे भगवान रामाने आपली पत्नी सीतेला वाचवण्यासाठी राक्षस राजा रावणाचा वध केला. हे महाकाव्य भारतीय संस्कृतीतील आदर्श आहे. यावर श्री भुवनेश्वर वशीष्ठजी महाराज रामलीला सादर करणार येणार आहेत, यामध्ये ३० पेक्षा अधिक कलावंत आहेत. स्वामी भुवनेश्वर वशीष्ठजी यांची रामलीला केवळ एक कथा नाही, तर भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवणारी एक आध्यात्मिक यात्रा आहे. त्यांच्या रामलीलेतून रामायणातील प्रत्येक पात्र आपल्यासमोर जिवंत होईल. रामायणावरील ही रामलीला केवळ एक कथा नाही, तर आपल्या आयुष्याला दिशा देणारा एक मार्गदर्शक आहे, असे स्वामीजी म्हणाले.



श्री रामलीला कार्यक्रमाचे आयोजन अध्यक्ष, नवरात्र महोत्सव समिती, ग्रामपंचायत सरपंच प्रिया सचिन मस्के, उपसरपंचं गोविंद देशमुख, विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन महादेव गंगाराम जटाळ, व्हा. चेअरमन शिवाजी आप्पाराव जाधव, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष शिवराज नागोराव देशमुख व ग्रामस्थ बाभळगाव यांच्याकडून तयारी करण्यात येत आहे. श्री व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, मैदान बाभळगाव येथे ३ ते १२ ऑक्टोंबर दरम्यान दररोज सायंकाळी ७ वाजता ते रात्री १० वाजता पर्यंत ही रामलीला होणार आहे. या रामलीला कार्यक्रमाची सुरुवात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजनाने होणार आहे. सर्व दैनदीन कार्यक्रम वेळेवर सुरु होणार आहेत. पावसाची शक्यता पाहता भावीकांनी सोबत छत्री आणावी. नवरात्र महोत्सव बाभळगाव निमीत्त आयोजीत केलेल्या या रामलीला कार्यक्रमाचा सर्व भावीकभक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा माजी पालकमंत्री आ. अमित देशमुख यांनी केले आहे.

# लातूर जिल्हा रुग्णालयासाठी माझं लातूर परिवार आक्रमक

### सलग दुसऱ्या दिवशी प्रतिकात्मक भिक मागो आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ३० सप्टेंबर-**

शासनाने लातूर जिल्हा रुग्णालयासाठी मंजुरी दिली, अध्यादेश ही काढला पण जागेचा निधी दिला नाही. माझं लातूर परिवाराच्या वतीने शासनाचा निषेध करत प्रतिकात्मक भिक मागून निधी संकलन करण्याचे आंदोलन सुरू केले आहे. सलग दुसऱ्या दिवशी हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला तृप्ती देसाई यांनी पाठिंबा देत आंदोलनात सहभाग नोंदवला. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, कृषीमंत्री, आरोग्य मंत्री यांच्यासह स्थानिक आमदार, खासदार यांचे मुखवटे घालून मागितली भीक.

लातूर जिल्हा रुग्णालयासाठी भिक मागत निधी संकलन हे प्रतिकात्मक आंदोलन करण्यात येत आहे. काल मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, कृषीमंत्री, आरोग्यमंत्री जिल्हा रुग्णालयासाठी लातूरात भिक मागत होते. आज या सर्वांसोबत स्थानिक जिल्ह्यातील सर्व आमदार, खासदार भिक मागत होते. या प्रश्नी लातूरकरांना फसवत असलेले पालकमंत्री आणि आरोग्य मंत्री भिक मागताना हालगी वाजवत असलेले दृश्य लातूरकर बघत होते. शहरातील अशोक हॉटेल ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या रस्त्यावर प्रतिकात्मक भिक मागून सरकारचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला पाठिंबा देत तृप्ती देसाई यांनी ही आंदोलनात सहभाग घेतला. शासनाने लवकरात लवकर हा प्रश्न निकाली काढावा अशी मागणी त्यांनी केली.